१०३ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवा काळ

NAVAKAL

• पुणे, शुक्रवार १ ऑगस्ट, २०२५ • वर्ष-४, अंक-३१५, पाने-८, किंमत : ₹ ६

• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 4, Issue - 315, Marathi - Daily - Pune, 1 August, 2025 Page- 8 Price- Rs. 6/-

24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com

## आज मध्य रेल्वे मोटरमनची बैठक



**मुंबई** - मध्य रेल्वे प्रशासनाकडून घातलेल्या नियमांमुळे लोकल रेल्वे मोटरमनचा असंतोष चव्हाट्यावर आला. या पार्श्वभूमीवर मोटरमन संघटनांनी आंदोलनाची भूमिका घेतली. उद्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे यासंदर्भात महत्त्वाची बैठक आयोजित केली आहे. ही बैठक मोटरमन असोसिएशनच्या नेतृत्वात होणार असून विविध संघटनांचे प्रतिनिधी यामध्ये सहभागी होणार आहेत. प्रशासनाकडून मोटरमन केबिनमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यास सुरुवात केली आहे. यासोबतच वेळेपेक्षा अधिक कामाचा ताण, अपुरी विश्रांती आणि इतर निर्बंध यामुळे मोटरमन मानसिक दबावरवाली काम करत असल्याची तक्रार संघटनांकडून होत आहे.

## साखळी बॉम्बस्फोटानंतर मालेगाव स्फोटातील सर्व आरोपी निर्दोष! एकही पुरावा नाही

**मालेगाव येथे २९ सप्टेंबर २००८ मध्ये बॉम्बस्फोट झाला. या स्फोटात ६ जणांचा मृत्यू झाला. महत्त्वाचे म्हणजे हिंदू आतंकवाद असा नवा शब्द यात निर्माण झाला कारण अभिनव भारत , बडे लष्करी अधिकारी आणि साध्वी यात आरोपी होते . आज या अत्यंत महत्त्वाच्या खटल्यात विशेष न्यायालयाने सर्व सात आरोपींना निर्दोष ठरवले. इतकेच नव्हे तर एटीएस आणि एनआयए सारख्या भक्कम सरकारी यंत्रणांनी तपास करूनही एकाही आरोपीच्या विरोधात त्यांना ठोस पुरावा देता आला नाही. मुंबई साखळी स्फोटातील सर्व आरोपी नुकतेच याच कारणाने निर्दोष सुटल्यानंतर पुन्हा एकदा तसाच निर्णय झाल्याने तपास यंत्रणांवरच संशय निर्माण झाला आहे.**

■ मुंबई

**मालेगाव** खटल्याचा निकाल एनआयए विशेष न्यायालयाने १७ वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर आज दिला. यात सर्व ७ आरोपींना पुराव्याअभावी निर्दोष घोषित केले. या थक्क करणाऱ्या निकालामुळे स्फोट नक्की कोणी केला, असा प्रश्न निर्माण झाला आहे. या निकालाच्या विरोधात सरकार अपील करणार का हा प्रश्नही विचारला » पान ८ वर

### करकरे यांनी सादर केलेले पुरावे

१) भोपाळ येथे एप्रिल २००८ मध्ये हिमानी सावरकर, दयानंद पांडे, प्रज्ञा सिंग, कर्नल पुरोहित व इतर आरोपींची बैठक झाली. ही बैठक अभिनव भारत संघटनेच्या तत्कालीन प्रमुख हिमाणी सावरकर यांच्या अध्यक्षतेत झाली. याच बैठकीत मालेगावमध्ये मुस्लीम समुदाय बहुसंख्य असल्यामुळे तेथे स्फोट करण्याचे निश्चित झाले.त्याच बैठकीत कर्नल पुरोहित यांनी स्वत: पुढाकार घेऊन आरडीएक्स पुरवणार असल्याचे सांगितले. त्याचवेळी प्रज्ञा सिंह ठाकूर यांनी पुरोहित आरडीएक्स देणार असतील तर मी बॉम्बस्फोट घडवणारे दोन चांगले लोक देते असे म्हटले. या बैठकीचे व्हिडिओ व ऑडिओ चित्रीकरण दयानंद पांडे यांनीच केले.

२) इंदूर येथे जून २००८ मध्ये दुसरी बैठक झाली. त्याठिकाणी प्रज्ञा सिंह ठाकूर या रामचंद्र कलसंगरा आणि संदीप डांगे या दोघांना घेऊन आल्या. त्या दोघांना दयानंद पांडे यांच्या स्वाधीन केले.

३) पुन्हा इंदूर येथेच जुलै २००८ मध्ये तिसरी बैठक झाली. त्यावेळी प्रज्ञा सिंह ठाकूर यांनी दयानंद पांडे यांच्याकडे तक्रार केली की, मी दोन खात्रीचे लोक दिले, पण तुमचे कर्नल पुरोहित त्यांना आरडीएक्स देत नाहीत. त्यांना याबाबत सूचना द्या. त्यानंतर पांडे यांनी कर्नल यांना त्या » पान ८ वर

### न्यायालयाने नोंदवलेली निरीक्षणे

न्यायालयाने नमूद केले की,

१) बॉम्ब ज्या मोटरसायकलला लावला होता, ती मोटरसायकल प्रज्ञा सिंह ठाकूर यांची असल्याचे पुरावे नाही.
२) फॉरेन्सिक अहवालात मोटरसायकलच्या चेसिसचा संपूर्ण क्रमांक सापडलेला नव्हता. शिवाय, साध्वी प्रज्ञा यांनी दोन वर्षांपूर्वीच संन्यास घेतला होता आणि भौतिक वस्तूंपासून निवृत्त झाल्या होत्या.
३) कर्नल पुरोहित यांनी काश्मीरमधून आरडीएक्स आणले किंवा बॉम्ब तयार केला याबाबत कोणताही ठोस पुरावा सरकारकडून सादर झालेला नाही.
४) पुरोहित यांनी अभिनव भारत संस्थेची रक्कम वापरली , पण ती स्फोटासाठी वापरल्याचा पुरावा नाही.
५) आरोपींच्या मोबाईलमध्ये काही पुरावे आढळले नाहीत
६) आरोपींवर युएपीए लावणे योग्य नव्हते.
७) तपास यंत्रणांनी पंचनामा नीट केला नाही.
८) बॉम्बस्फोट त्या मोटरसायकलवर झाल्याचा पुरावा नाही.
९) गोळीबारानंतर रिकाम्या पुंगळ्या सापडल्या नाहीत.
१०) हाताचे ठसे सापडले नाहीत.
११) बैठकांमध्ये कट शिजल्याचा पुरावा नाही. » पान ८ वर

## अमेरिका-पाक तेल करार ट्रम्पचा भारताला दुसरा झटका



■ नवी दिल्ली

**भारतावर** २५ टक्के आयातशुल्क लागू करणारे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी आज पाकिस्तानशी तेल भागीदारीचा करार केल्याची घोषणा करून भारताला दुसरा झटका दिला. या करारानुसार अमेरिका आणि पाकिस्तान संयुक्तपणे विशाल तेलसाठे विकसित करणार आहे. या भागीदारीमुळे पाकिस्तान एक दिवस भारतालाही तेल विकेल, असेही ट्रम्प यांनी म्हटले आहे.

ट्रम्प यांनी एक्सवर पोस्ट करत म्हटले की, आम्ही पाकिस्तानसोबत एक करार केला आहे ज्यामध्ये अमेरिका आणि पाकिस्तान संयुक्तपणे तेथील विशाल तेल साठ्यांचा विकास करतील. या भागीदारीसाठी एका तेल कंपनीची निवड केली जाईल. कदाचित एक दिवस ते (पाकिस्तान) भारतालाही तेल विकतील.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सध्या टोकाची भारतविरोधी भूमिका घेत आहेत. » पान ७ वर

## महादेव मुंडे हत्या प्रकरणात एसआयटी चौकशीचे आदेश

### ज्ञानेश्वरी मुंडेंनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट

■ मुंबई



परळीतील व्यापारी महादेव मुंडे हत्या प्रकरणात २१ महिन्यानंतर ही आरोपींना अटक करण्यात आलेली नाही. या प्रकरणात आता विशेष तपास पथक स्थापन करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. आज महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी कुटुंबासह मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन न्यायाची मागणी केली. या वेळी भाजपा आमदार सुरेश धसही उपस्थित होते.

महादेव मुंडे यांची परळी तहसील कार्यालय परिसरात २१ महिन्यांपूर्वी हत्या करण्यात आली होती. या प्रकरणाचा तपास एसआयटी व सीआयडीमार्फत करण्यात यावा, या मागणीसाठी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी अनेक वेळा उपोषण, आंदोलन केले. तसेच त्यांनी कुटुंबासह दोन वेळा बीड पोलीस अधीक्षक कार्यालयाबाहेर आत्महत्येचा प्रयत्नदेखील केला होता. आज फडणवीस यांची भेट घेऊन त्यांनी या प्रकरणाची संपूर्ण माहिती दिली. तसेच महादेव मुंडे यांचा शवविच्छेदन अहवाल आणि फोटोदेखील दाखवले.

या भेटीनंतर सुरेश धस म्हणाले की, आयपीएस पंकज कुमावत यांच्या अध्यक्षतेखाली हत्या प्रकरणात एसआयटी स्थापन करण्याचे आदेश पोलीस महासंचालकांना देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. बीडमधील गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या लोकांना तांदळातील खड्यासारखे बाजूला काढा, असेही आदेश त्यांनी दिले आहेत. महादेव मुंडे यांच्या घरापासून परळीच्या लोकप्रतिनिधींचे घर ५०० मीटरवर आहे. ते अजून त्यांच्या कुटुंबाला का भेटले नाहीत?

## खड्ड्यांचा १५ हजारांचा दंड रद्द गणेश मंडळांना दिलासा

■ मुंबई

**सार्वजनिक** गणेशोत्सव मंडप उभारण्यासाठी रस्त्यावर खड्डे खणल्यास १५,००० रुपयांचा दंड आकारण्याचा निर्णय मुंबई महापालिकेने रद्द केला आहे. आता जुन्या नियमानुसार केवळ २,००० रुपये शुल्क आकारले जाईल. या निर्णयामुळे सार्वजनिक गणेश मंडळांना मोठा दिलासा मिळाला आहे.

एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना २०२४ मध्ये झालेल्या गणेशोत्सव नियोजन बैठकीतच मंडपासाठी खड्डे खणणाऱ्या मंडळांकडून शुल्क न आकारण्याचे निर्देश महापालिकेला दिले होते. मात्र, यंदा महापालिकेने १५,००० दंडाचे पत्रक काढले होते. या दंडाला बृहन्मुंबई सार्वजनिक गणेशोत्सव समन्वय समितीने तीव्र विरोध केला. या विरोधाची दखल घेत राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांना त्वरित आदेश देत हा दंड रद्द करण्याचे निर्देश दिले. या निर्णयामुळे सार्वजनिक गणेश मंडळांना मोठा दिलासा मिळाला आहे. समितीचे अध्यक्ष ॲड. नरेश दहिबावकर यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे जाहीर आभार मानले.

## एकनाथ शिंदे दिल्लीमध्ये असताना राज्यात फडणवीस-पवार यांची बैठक

■ मुंबई



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे दिल्ली दौऱ्यावर गेले असतानाच मुंबईत सह्याद्री अतिथीगृहावर दिवसभर राजकीय हालचालींना प्रचंड वेग आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यात दोन वेळा बैठक झाली. तर माजी मंत्री धनंजय मुंडे, खासदार सुनील तटकरे आणि रुपाली चाकणकर यांच्या उपस्थितीने राष्ट्रवादीतील हालचालींविषयी अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.

सकाळी अजित पवार यांनी वर्षा बंगल्यावर मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेतली. दोघांमध्ये जवळपास २० मिनिटांची चर्चा झाली. त्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस सह्याद्री अतिथीगृहात पोहोचताच राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे त्यांच्या भेटीला आले. काही वेळातच अजित पवारही सह्याद्रीवर दाखल झाले. तिघांमध्ये तिथे एक बैठक पार पडली. बैठक सुरू असतानाच माजी कृषी मंत्री धनंजय मुंडेही सह्याद्रीवर पोहोचले. मात्र काही मिनिटांतच ते निघून गेले. लगेचच राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्षा रुपाली चाकणकर सह्याद्रीवर दाखल झाल्या. या बैठकीनंतर सुनील तटकरे आणि अजित पवार यांच्यात एक स्वतंत्र बैठक झाली. दरम्यान धनंजय मुंडे यांनी कालदेखील सह्याद्री अतिथीगृहात मुख्यमंत्र्यांची भेट घेतली होती. त्यानंतर संध्याकाळी देवेंद्र फडणवीस यांनी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची भेट घेतली.

## मिठी नदी घोटाळ्याप्रकरणी मुंबईत ८ ठिकाणी ईडीचे छापे

■ मुंबई

मिठी नदीतील गाळ काढण्याच्या कंत्राटात झालेल्या कथित अनियमितता आणि निधीच्या गैरवापराच्या आरोपांवरून सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) मुंबईत आठ ठिकाणी छापेमारी केली. बनावट सामंजस्य करार सादर करणाऱ्या काही कंत्राटदारांच्या कार्यालयांवर ही कारवाई करण्यात आली आहे.

या प्रकरणी तीन पालिका अधिकारी, पाच कंत्राटदार, तीन मध्यस्थ आणि दोन कंपन्यांविरोधात आझाद मैदान पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कथित गैरव्यवहारामुळे मुंबई महापालिकेला सुमारे ६५ कोटी ५४ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा आरोप आहे. यापूर्वी या प्रकरणात अभिनेता दिनो मोरियाचीही चौकशी करण्यात आली होती. कंत्राटदारांनी बनावट कागदपत्रे सादर करून पालिकेची फसवणूक केल्याचे उघड झाले आहे. याच मुद्यावरून पावसाळी अधिवेशनात शिंदे गट आणि ठाकरे गटात वादही झाला होता. त्यामुळे या कारवाईमागे महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाला अडचणीत आणण्याचा राजकीय हेतू असल्याची चर्चा सुरू आहे.

## ॲंटिलिया विरोधातील याचिका फेटाळली मुकेश अंबानींना दिलासा



■ मुंबई

**उद्योगपती** मुकेश अंबानी यांच्या ॲंटिलिया निवासस्थानाच्या भूखंड विक्रीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळून लावली. या प्रकरणातील कायदेशीर मुद्दा आधीच निकाली निघालेला असल्याने याचिकेत हस्तक्षेपाची गरज नाही, असे स्पष्ट करत मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठाने याचिकाकर्त्याला झटका दिला.

ही याचिका जालना येथील रहिवासी अब्दुल मतीन यांनी २००७ मध्ये दाखल केली होती. त्यांनी २००३ साली दक्षिण मुंबईतील अल्टामाउंट रोडवरील ४५३२.३९ चौरस मीटर भूखंड ॲंटिलिया कमर्शियलला विक्री करण्यासंदर्भात अनियमितता झाल्याचा आरोप केला होता. तसेच संबंधित जमीन महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाच्या अखत्यारीत असल्याचा दावा करत ती वक्फ बोर्डाकडे परत देण्याची मागणी केली होती.

हे प्रकरण २०१७ पर्यंत न्यायप्रविष्ट होते. त्यानंतर १० वर्षांनी २०२५ मध्ये हस्तक्षेप अर्ज दाखल करण्यात आला. दहा वर्षांनंतर आता यात काय उरले यावर सुनावणी घेण्यासाठी असा प्रश्न खंडपीठाने सुनावणी दरम्यान याचिकाकर्त्याच्या वकिलाला विचारला. मूळ भूखंड करिबॉय इब्राहिम खोजा यतीमखाना ट्रस्टच्या मालकीचा होता. हा ट्रस्ट धर्मनिरपेक्ष स्वरूपाचा असल्यामुळे तो वक्फ बोर्डाच्या कक्षेत येत नसल्याचे ॲंटिलिया कमर्शियलच्या वतीने सांगण्यात आले. विक्रीपूर्वी सर्व कायदेशीर परवानगी घेतल्याचा दावा ज्येष्ठ वकील मिलिंद साठे यांनी केला.

## खासगी वैद्यकीय महाविद्यालयांचे १० टक्के ईडब्ल्यूएस आरक्षण रद्द

■ मुंबई

खासगी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी (ईडब्ल्यूएस) १० टक्के आरक्षण लागू करण्याचा निर्णय अखेर सरकारने रद्द केला आहे. यंदा प्रवेश प्रक्रिया पूर्वीच्या पद्धतीने होणार आहेत. जागा वाढवल्याशिवाय ईडब्ल्यूएस आरक्षणाची अंमलबजावणी होणार नसल्याचे वैद्यकीय शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.

यापूर्वी सरकारी, सरकारी अनुदानित आणि पालिकेच्या वैद्यकीय कॉलेजांमध्येच हे आरक्षण लागू होते. यंदा सीईटी सेलने एमबीबीएस, बीडीएस, बीएएमएस, बीएचएमएस, बीयुएमएस, बीएनवायएस, बीपीटीएच आदी वैद्यकीय शाखेच्या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी माहिती पुस्तिका आणि प्रवेशाचे वेळापत्रक २३ जुलैला जाहीर केले. यामध्ये सरकारी, सरकारी अनुदानित, पालिका, वगळता खासगी अल्पसंख्याक विनाअनुदानित वैद्यकीय कॉलेजांमध्ये १० टक्के ईडब्ल्यूएस आरक्षण जाहीर केले होते. त्याआधी कोणतीही अधिसूचना, शासन निर्णय वा जाहीर घोषणा नव्हती. त्यामुळे अनेक पालकांसाठी हा प्रकार उल्लेख धक्कादायक होता. विद्यार्थ्यांचे पालक आणि शिक्षण क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी तीव्र आक्षेप घेतला होता. वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये ईडब्ल्यूएस प्रवर्गाचे १० टक्के आरक्षण लागू केल्यास खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या जागा कमी होतील, अशी भीती पालक आणि विद्यार्थ्यांनी व्यक्त केली होती. » पान ७ वर

## मणिपूरमधील राष्ट्रपती राजवटीला मुदतवाढ

■ नवी दिल्ली

**वांशिक** दंगलींनी होरपळलेल्या मणिपूरमधील राष्ट्रपती राजवटीला आणखी सहा महिन्यांची मुदतवाढ देण्याच्या निर्णयाला लोकसभेत विरोधकांच्या गदारोळात मंजुरी देण्यात आली.

तत्कालीन मुख्यमंत्री एन. बिरेन सिंह यांनी राजीनामा दिल्यानंतर दुसऱ्याच दिवशी १३ फेब्रुवारी २०२५ रोजी राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली. आता ही मुदत १३ फेब्रुवारी २०२६ पर्यंत वाढवण्यात आली आहे.केंद्रीय गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांनी यासंबंधीचा प्रस्ताव लोकसभेत मांडला. त्याला सरकारने बहुमताच्या बळावर मंजुरी दिली.

## शेअर बाजारात तीव्र चढ-उतार दोन्ही निर्देशांक घसरणीसह बंद

■ मुंबई

**अमेरिकेचे** राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय मालावर २५ टक्के आयातशुल्क लागू करण्याचा निर्णय जाहीर केल्यानंतर त्याचे पडसाद देशांतर्गत शेअर बाजारात उमटले. आज शेअर बाजारात तीव्र चढ-उतार पहायला मिळाले. दिवसअखेर दोन्ही प्रमुख निर्देशांक घसरणीसह बंद झाले.

मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स २९६ अंकांनी घसरून ८१,१८५.५८ अंकांवर तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक निफ्टी १०० अंकांच्या घसरणीसह २४,७५० अंकांवर बंद झाला. बँक निफ्टी २०० अंकांनी घसरून ५५,९५० अंकांवर बंद झाला. आज मिड आणि स्मॉल कॅप कंपन्यांच्या समभागांमध्ये मोठी घसरण झाली. दुसरीकडे ग्राहकोपयोगी उत्पानदनांच्या क्षेत्रातील कंपन्यांच्या समभागांत मोठी खरेदी झाली. त्याचा बाजाराला आधार मिळाला.

## खेवलकरांच्या अडचणी वाढणार? फोनमध्ये आक्षेपार्ह चॅट व फोटो

■ पुणे

**पुण्यातील** रेव्ह पार्टी प्रकरणात अटक करण्यात आलेले खडसेंचे जावई प्रांजल खेवलकर आणि इतर चार आरोपींची कोठडी संपल्यानंतर त्यांना आज शिवाजीनगर न्यायालयात हजर करण्यात आले. यावेळी पोलिसांनी न्यायालयात दावा केला की, प्रांजल खेवलकर यांच्या फोनमध्ये आक्षेपार्ह चॅट आणि व्हिडीओ सापडले आहेत. यामुळे त्यांच्या अडचणी वाढणार आहेत.

### १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

खेवलकर यांनी एका महिलेचा नाचतानाचा व्हिडीओ दुसऱ्या आरोपीला पाठवला होता आणि त्या चॅटमध्ये ऐसा माल चाहिए असा मजकूर होता. त्यानंतर पोलिसांनी दोन दिवसांच्या पोलीस कोठडीची मागणी केली, मात्र न्यायालयाने सर्व आरोपींना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली.

माहिती तपास अधिकाऱ्यांनी न्यायलयात सांगितले की, प्रांजल खेवलकर यांनी एका महिलेचा नाचतानाचा व्हिडिओ दुसऱ्या आरोपीला पाठवला होता. त्या व्हिडिओत 'ऐसा माल चाहीए' असे शब्द वापरण्यात आले असून, संबंधित महिला आरोपी आणि प्रांजल गेल्या दोन वर्षांपासून संपर्कात आहेत. हा अंमली पदार्थ त्यांनी आणला. परंतु कुठून आणला हे सांगत नाहीत. गेल्या दोन वर्षांपासून प्रांजल त्या हॉटेलमध्ये नियमित जाऊन पार्टी करतात. या प्रकरणातील आणखी एक आरोपी राहुल नावाचा आहे, तो सध्या फरार आहे. प्रांजल यांच्या मोबाईलमध्ये अनेक आक्षेपार्ह गोष्टी, व्हिडिओ व माहिती » पान ७ वर

## बिहार मतदारयादी पडताळणी इंडिया आघाडीचे संसदेत आंदोलन

■ नवी दिल्ली

**बिहारमध्ये** सुरू असलेल्या मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरावलोकन (एसआयआर) प्रक्रियेच्या विरोधात आज इंडिया आघाडीने संसद संकुलातील मकरद्वाराजवळ आंदोलन केले. या आंदोलनात काँग्रेस पक्षप्रमुख सोनिया गांधी, समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव, काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियंका गांधी- वाड्रा यांच्यासह विरोधी पक्षांचे अनेक खासदार सहभागी झाले होते. त्यांच्या हातात एसआयआर लोकशाहीवर घाव असा मजकूर असलेले फलक होते. यावेळी संविधान वाचवा, लोकशाहीची हत्या थांबवा, अशा घोषणा देत केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. या आंदोलनाआधी विरोधी पक्षनेत्यांची संसद भवनात एक महत्त्वपूर्ण बैठक झाली. या बैठकीत चालू अधिवेशनात सरकारला कोणत्या मुद्यांवर घेरायचे यासंबंधी रणनीती ठरवण्यात आली.

या आंदोलनानंतर लोकसभा आणि राज्यसभेचे कामकाज सुरु झाल्यानंतर विरोधकांनी बिहार मतदारयादी पडताळणीवर चर्चा करण्याची मागणी करत गोंधळ घातला. त्यामुळे दोन्ही सभागृहाचे कामकाज २ वाजेपर्यंत तहकूब केले.

# छोट्या जाहिराती

संपर्क करा ८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

घरकामासाठी महिला / मुली / मुले (भरपूर पगार) राहण्याची - खाण्याची सोय) **9820234040** (ठाणे) {NC251722}

विलेपार्ले (पश्चिम) येथे मिठीबाई कॉलेजमध्ये प्यून (महिला-पुरुष) पाहीजेत.पत्ताः- 414, ई - विंग, 4 था माळा, झी-शान,एम. जी. रोड, विलेपार्ले (पूर्व). मो. **9820426010, 9833313217** {NC251777}

कुरिअर कंपनीमध्ये पिकअप व डिलिव्हरीसाठी त्वरीत मुले पाहिजेत. ठिकाण-फोर्ट, दादर, लोअरपरेल, वडाळा, नवीमुंबई. दररोज रोख 600 + प्रवास खर्च. Speedman Express 191-B, 9th Cavel Cross Lane, 1st Floor, Dr. Viegas Street, Near Barretto High School, Chirabazar, Mumbai - 400002. Note - फोन न करता ऑफिसमध्ये येणे. {NC251577}

अंधेरी येथे सुरक्षारक्षक पाहिजेत. पगार 26219/- + अधिक सुविधा **9224216144 / 9869576582** {NC251779}

मुंबई सेंट्रल पेस्ट कंट्रोल कंपनीकरिता अनुभवी / बिनअनुभवी मुले पाहिजेत. **49737937 / 9321005152** {NC251755}

पॅकिंग मटेरियलच्या कामासाठी मुले/मुली पाहिजेत. कोहिनूर मिल चाळ, बिल्डिंग नंबर 1/17 महात्मा जोतिबा फुले मार्ग, दादर पूर्व. **7977308471** {NC251729}

ठाणे, भिवंडी, वाशी, पनवेल, मुलुंड याठिकाणी ड्रायव्हर पाहिजेत पगार 16,000/- (टी.आर लायसेन्स आवश्यक) आणि तसेच मारुती इको कार्गो/ टाटा एस/ टाटा ४०७/ टाटा ७०९/ आयशर या मॉडेलच्या वाहनांची आवश्यकता आहे. संपर्कः **8655344090/ 9029824131** {NC251625}

सिक्युरिटी हाऊसकीपिंग कंपनीला- सेल्स / मार्केटिंग मॅनेजर, BDM, अकाउंट, टेलिकॉलर, एरिया मॅनेजर, फील्ड ऑफिसर, सिक्युरिटीगार्ड / सुपरवायजर हाऊसकीपिंग मुले/ मुली पाहिजेत - **9223380568/ 69** {NC251649}

## पाहिजेत

मॉलमध्ये / पॅकिंगमध्ये मुले/मुली अर्जंट पाहिजेत. पगार 15,000/- - 18,000/- **(9702640118)** {NC251732}

कंपनीत डस्टिंग आणि जेवण बनविण्यासाठी महिला पाहिजे. संपर्क - **9820930362** {NC251714}

ऑफिस बॉय / असिस्टंट / हाउसकीपिंगसाठी महिला/ पुरुष पाहिजे. (मालाड वेस्ट ) - **9136731541** {NC251696}

इलेक्ट्रीक कामासाठी हेल्पर, वायरमन पाहिजेत. पगार 12000/- ते 21000/- गाडीभाडे मिळेल. **9820432870 / 9819017461** {NC251768}

फोर्ट मध्ये प्रिंटिंग प्रेससाठी हेल्पर पाहिजे. संपर्क - **9819529922** {NCC250049}

**पुणे येथील प्रिंटींग प्रेससाठी खालील कर्मचारी हवे आहेत.**
१.ऑपरेटर यू व्ही प्रींटीग मशीन ६ रंगी कोटींगसह पीपी पीव्हीसी पेट मटेरियलवर छपाईचा अनुभव. २.फिडरमेन. ३.बॉयलर. ४.ॲटोमेटीक पंचीग मशीन ऑपरेटर,फाईलिंगचे काम येणे अत्यावश्यक. ५. बॉब्स्ट फोल्डर ग्लुअर मशीन ऑपरेटर. सर्व जागांसाठी ३-४ वर्ष अनुभव आवश्यक. पुणे येथे निवास व्यवस्था (सिंगल) केली जाईल.
**भेटा किंवा लिहा :**
**युनायटेड मल्टीकलर प्रिंटर्स प्रा. लि.**
२६४/४, रिव्हर व्ह्यू को-ऑप. हाऊसिंग सोसायटी, शनिवार पेठ, पुणे -४११ ०३०.
unitedprinters@rediffmail.com
Mo.No. 93250 97894, 9822082648

तरुण ऑफिस प्यूनची आवश्यकता आहे. 33, प्रॉस्पेक्ट चेंबर (अॅनेक्स) 3 रा माळा, पीठा स्ट्रीट, पी. एम. रोड, फोर्ट, मुंबई - 400001. संपर्क - **9869658771** संपर्क आणि मुलाखत वेळ : शुक्र दि. 01/08/2025 सकाळी 11 ते संध्या - 5 वाजेपर्यंत फक्त {NC250744}

नविन हॉस्पिटलकरिता हाऊसकिपिंग महिला व पुरुष पाहिजेत. सुरज वॉटर पार्कजवळ ठाणे (वेस्ट), **8180091545 / 9270429106** {NC251803}

SBI बँकेत ऑफिस कामासाठी लोकांची भर्ती 15,000/- ते 35,000/- **9702279241** {NC251804}

चॉकलेट कंपनीमध्ये अर्जंट भरती (बस सुविधा) पगार 18300 - 24800 : **9167759871** {NC251805}

## Situation Vacant

REQUIRED MALE / FEMALE OFFICE ASSISTANT AT MIRAROAD FOR PVT. LTD. FIRM **8097641616** {NC251781}

A.C.T. Vidyalaya Samooh
**MAHARASHTRA BAL VIKAS HIGHSCHOOL**
APPLICANTS ARE INVITED FOR PVT.GOVT. AIDED HINDI MEDIUM HIGH SCHOOL MINORITY STATUS
**REQUIRE**
**Teachers for HINDI Med**
B.Sc B.Ed Sci/Maths for IX-X
B.A B.Ed SocialScience for IX–X
B.A. B.PEd for Phy. Education for IX-X
B.A., B.Sc D.Ed/B.Ed for VI–VIII
**CTET/II TET Compulsory**
HIN/ENG/MATHS/SCI./SOCIAL SCI
The appointment shall be as a Shikshan Sevak for 3 years as per Government Rules
**INTERVIEW Day & Date**
**Saturday 2nd Aug**
**bet. 10AM to 12 Noon**
Add : V.G.Nagar, Opp. Bldg No.22, PMGP Colony, Mankhurd, Mum-43

Wanted Computer operator (Male / Female) Graduate / Undergraduate, below 30, Fresher Welcome, send your CV on Whatsapp **8169822945 / 9833905062,** Walk in Interview : All Maharashtra Law Reporter, 3 Little Gift, 19th Road, Khar (W), Mumbai - 400052. {NCC250050}

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवलीः **9820627580 / 9820904646** {NC251417}

## नर्सिंग कोर्स

गव्हर्नमेंट मान्यता, 10वी/12वी पास नापास मुले-मुलींसाठी पेशंटकेअर / डिप्लोमा पेशंट केअर/मेडिकल लॅबोरेटरी / DMLT/X-RAY टेक्निशियन / ऑपरेशन थिएटर / Physiotherapy कोर्स करिता संपर्क : Dr. SHRIVASTAV :- **9769116609 / 9702029738** LMP Paramedical Institute. Borivali West {NC251485}

## व्यवसायविषयक

शाळांना लागणारी स्टेशनरी बनवणाऱ्या नामवंत मॅन्युफॅक्चरींग कंपनीला मुंबई/ पालघर जिल्ह्यात कमिशन वरती काम करणारे विश्वासू पुरुष/ महिला पाहिजेत. ज्या ठिकाणी राहता त्याच विभागात काम करून महिन्याला लाखो रुपये कमवण्याची सुवर्णसंधी अधिक माहितीसाठी प्रत्यक्ष भेटाः **8693009342/ 9082787983** {NC251443}

## व्यसनमुक्ती


दारू सोडवा दारू, तंबाखू गुटखा सिगारेट औषधे उपलब्ध डॉ. नागरगोजे मो. **9765609769** {NC251656}




# नाना शंकरशेट परोपकारी व्यक्तिमत्त्व

**३१ जुलै रोजी मुंबईचे शिल्पकार नाना शंकरशेट यांची १६०वी पुण्यतिथी आहे. त्या निमित्ताने त्यांचे स्मरण**

**चंद्रशेखर दाभोळकर**



भारतात प्रवासी रेल्वे सुरू करण्यासाठी सिंहाचा वाटा घेतलेल्यांपैकी नामदार नाना शंकरशेट हे एक अग्रगण्य नांव आहे.सन १८५३ मध्ये दि.१६ एप्रिल या दिवशी तत्कालीन बोरीबंदर (नंतरचे व्हिक्टोरिया टर्मिनस व आताचे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस) ते ठाणे या दरम्यान पहिली प्रवासी रेल्वे धावली.दानशूर नानांनी त्यांच्या हवेलीत काही रेल्वे विभागही ठेवले होते. ग्रेट इंडियन पेनिन्सुलर रेल्वे (आता मध्य रेल्वे) चे संचालक असलेल्या नानांनी इंडियन रेल्वे असोसिएशनची सह-स्थापना केली होती.

हीच रेल्वे पुढे मुंबईची जीवनवाहिनी ठरलीच. परंतु तमाम मुंबईच नव्हे तर देशवासीयांचा अविभाज्य भाग बनली !

भारतीय रेल्वे सुरू करण्यात जगन्नाथ (नाना ) शंकरशेट यांचा सिंहाचा वाटा होता आणि म्हणूनच नाना शंकरशेट यांना भारतीय रेल्वेचे जनक म्हणून संबोधिले जाते.

हाच दिवस पुढे रेल्वे दिन म्हणून साजरा होऊ लागला.भारतीय रेल्वे आणि नाना शंकरशेट यांचा घनिष्ट संबंध आहे. आर्थिक राजधानीचे शहर बनलेल्या मुंबई शहराच्या सर्वांगीण विकासासाठी नानांनी अथक परिश्रम घेतले.नाना शंकरशेट यांनी मुंबई शहराच्या विकासात आणि मूलभूत सुविधांमध्ये मोलाचे योगदान दिले. मुंबई शहराच्या विकासासाठी त्यांनी अनेक इमारती, रस्ते, आणि इतर पायाभूत सुविधा उभारल्या, ज्यामुळे शहराची ओळख एक आधुनिक शहर म्हणून झाली.

शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, आणि दळणवळण यांसारख्या क्षेत्रांमध्ये त्यांनी केलेल्या कार्यामुळेच मुंबईचा विकास झाला. आधुनिक मुंबईचे ते खरेखुरे शिल्पकार होते.

ते एक द्रष्टे समाजसुधारक होते आणि त्यांनी समाजातील अनेक रूढीवादी गोष्टींना विरोध करत, लोकांच्या कल्याणासाठी काम केले. शिक्षण क्षेत्रात क्रांती करत मुंबईत मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. उच्च शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी त्यांनी मुंबई विद्यापीठाच्या स्थापनेत महत्त्वाची भूमिका बजावली.

आज सर्व जाती धर्माचे ,सर्वच गटांतील लोक वास्तव्य करत असलेल्या व सर्वांना हवीहवीशी वाटणाऱ्या मुंबईतील घडामोडींची जागतिक स्तरावर दखल घेतली जाते त्याचा पाया नानांनी रचला!

शहराच्या विकासाबरोबर त्यांनी सामाजिक समस्यांकडे लक्ष देऊन शैक्षणिक, आर्थिक समाजरचना सुदृढ करण्यासाठी अभ्यासक वृत्तीने तन, मन,धनाने झटण्याचा ध्यास घेतला होता.

या राष्ट्रपुरुषाच्या पाऊलखुणा मुंबईतील प्रत्येक महत्त्वाच्या वास्तूत आहेत. मुंबई महानगरपालिका,जे. जे.स्कूल ऑफ आर्ट्स, ग्रँड मेडिकल कॉलेज,जिजामाता उद्यान ,एल्फिन्स्टन कॉलेज ,नानांच्या कार्याच्या गौरवासाठी त्यांच्या जिवंतपणीच पुतळा बनविण्याचे काम सुरू झाले आणि हा पूर्णाकृती पुतळा आजही ज्या ठिकाणच्या प्रवेशद्वारावर विराजमान आहे ,तो टाऊन हॉल,अनेक शासकीय इमारती, म्युझियम्स इत्यादी वास्तू उभारणीत सक्रिय सहभाग घेऊन आपले समकालीन मित्रवर्य जमशेदजी जिजिबॉय, भाऊ दाजी लाड आदींच्या समवेत नानांनी मुंबई घडवली.

भारतात रेल्वे सुरू करण्यासाठी अतुलनीय समर्पणाची दखल घेत ब्रिटिशांनी बसवलेल्या मुंबईतील मध्य रेल्वेच्या मुख्यालयाबाहेर त्यांचा अर्धपुतळा त्यांच्या उल्लेखनीय कार्याची साक्ष देत आहे.मुंबई महानगरपालिका सभागृहातील त्यांचे तैलचित्रदेखील या वास्तूच्या स्थापनेसाठी केलेल्या अथक प्रयत्नांची ,त्यांच्या कार्याची ओळख आजच्या पिढीला प्रोत्साहित करते.

आधुनिक मुंबईच्याच नव्हे तर भारताच्याही विकासात एक महत्त्वाचे ठरलेले नानांचे व्यक्तिमत्व एक समाजसुधारक, परोपकारी आणि दूरदर्शी असे होते !


नानांनी सामाजिक सुधारणांद्वारे समाजाच्या, विशेषतः असुरक्षित वर्गाच्या, उन्नतीसाठी सक्रियपणे काम करत असताना बॉम्बे प्रेसिडेन्सीमध्ये सती प्रथा रद्द करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

ते मुंबईच्या विधान परिषदेत नामांकित झालेले पहिले भारतीय होत.

नानांचा विविध आर्थिक उपक्रमांमध्ये सहभाग आणि भारताच्या अर्थव्यवस्थेच्या कृषी स्वरूपाची त्यांची प्रगल्भ समज, नंतरच्या नेत्यांना भारताच्या आर्थिक भविष्याची कल्पना करत असताना प्रभावित करून गेली.

एकेकाळी ब्रिटिश राजवटीत विविध समाजपयोगी उपक्रमांना आर्थिक सहकार्याचा हात देणारे नाना अल्पायुषी ठरले असले तरी, इतक्या कमी काळात त्यांच्या कार्याचा आवाका आभाळाएवढा आहे. नानांच्या पेहरावातील पगडी मुंबई विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभात पदवी धारण केलेल्या विद्यार्थ्यांना परिधान केली जाते, तेव्हा विद्यार्थ्यांना होणारा आनंद निश्चितच गगनात मावेनासा असून शब्दांत अवर्णनीय असावा! पगडी धारण केलेला प्रत्येक विद्यार्थ्याला नानांसारखे कार्य करण्याची प्रेरणा लाभो,हीच सदिच्छा!

नामदार नाना शंकरशेट यांच्या कार्याचा उचित गौरव करण्यासाठी कोणाचीही 'ना' नाही तरीही त्यांच्या अष्टपैलू कार्याची ओळख पुढील पिढीसाठी स्फूर्तीदायी ठरावी या उद्देशाने मुंबईतील वडाळा येथील रखडलेले त्यांचे स्मारक जाचक अटी शर्ती विना लवकरच पूर्णत्वास जाईल आणि मुंबई सेंट्रल टर्मिनसच्या नामकरणाचा राज्य सरकारने नाना शंकरशेट मुंबई टर्मिनस असा मंजूर करून केंद्राकडे पाठविलेला प्रस्ताव, ३१ जुलै रोजी संपन्न होणाऱ्या नामदार नाना शंकरशेट यांच्या १६० व्या पुण्यतिथी दिनाचे औचित्य साधून केंद्र सरकारकडून मंजूर होईल आणि तमाम नानाप्रेमींची प्रतीक्षा संपुष्टात येईल!, अशी आशा बाळगू या!



# आजचे राशी भविष्य

शुक्रवार दि.१ ऑगस्ट २०२५

ज्योतिष पंडीत अर्चना तारू

| | |
|---|---|
| मेष | कामानिमित्त दूरच्या प्रवासाचे योग येतील. नोकरीसाठी अधिक प्रयत्न करावे लागतील. प्रेमविवाह उत्सुक मंडळींना अनुकूल दिवस राहील. |
| वृषभ | नोकरीमध्ये सहकाऱ्यांशी पटवून घ्यावे लागेल. जोडीदाराकडून आर्थिक सहाय्य मिळेल. स्वादिष्ट भोजनाचा आस्वाद घ्याल. |
| मिथुन | कार्यक्षेत्रात काही बदल फायदेशीर ठरू शकतात. स्वतःमधील कलाकौशल्य विकसित करण्यासाठी प्रयत्नशील राहाल. कौटुंबिक जबाबदारी वाढेल. |
| कर्क | कार्यक्षेत्रात नवीन करारमदार करण्याचे योजाल. भावंडांशी पटवून घ्यावे लागेल. आरोग्याच्या तक्रारींकडे दुर्लक्ष नको. |
| सिंह | काहींना अचानक प्रवासाचे योग येतील. मित्रमंडळींकडून भेटवस्तू वस्तू मिळतील. सरकारी कामांमध्ये नियमांचे पालन करणे आवश्यक राहील. |
| कन्या | अधिक उत्साहाने कार्यरत राहाल. व्यवसायामध्ये नवीन गुंतवणूक करण्याचे मनात येईल. विरोधकांवर मात करण्यात यश मिळेल. |
| तूळ | अधिक उत्साहाने कार्यरत राहाल. एखादी नवीन कल्पना मनात येईल. प्रेमविवाहास उत्सुक असणाऱ्यांना अनुकूल दिवस. |
| वृश्चिक | कामानिमित्त प्रवासाचे योग येतील. खर्चाचे प्रमाण वाढेल. जोडीदाराच्या आरोग्याच्या तक्रारी उद्भवू शकतात. |
| धनु | कार्यक्षेत्रात अधिक मेहनत घ्यावी लागेल. सहकाऱ्यांशी पटवून घ्यावे लागेल. विवाहोत्सुक मंडळींना अनुकूल परिस्थिती. |
| मकर | व्यवसायामध्ये आर्थिक उलाढाल करताना सावधगिरी बाळगावी. नोकरीत एखादी जबाबदारी स्वीकारावी लागेल. स्वत:ला खाण्याची बंधने पाळावी लागतील. |
| कुंभ | एखाद्या धार्मिक सहलीचे आयोजन कराल. कार्यक्षेत्रातील तुमच्या योजनांबाबत गुप्तता राखा. संततीचे सौख्य लाभेल. |
| मीन | एखाद्या महत्त्वाच्या कामांमध्ये अचानक अडचणी येऊ शकतात. स्वत:च्या आरोग्याची काळजी घेणे आवश्यक. वाहने जपून चालवावीत. |


**वाचकांना सूचना**

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वत:च्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.- **मॅनेजर, 'नवाकाळ'**


## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र सह्याद्री — दीपलक्ष्मी विकली लॉटरी — सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर गुरुवार • सोडत क्रमांक 31 • तिकीट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 31/07/2025

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- : **SD-08 : 1798** — चिराग एन्टरप्रायझेस, नाशिक

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 1000/- | 1421 | 2299 | 2332 | 4341 | 4478 | 4883 | 5077 | 5168 | 5665 | 5899 |
| तिसरे बक्षिस रु. 500/- | 1241 | 1950 | 2284 | 2842 | 3853 | 3959 | 5150 | 5457 | 5530 | 5659 |

चौथे बक्षीस रु. 400/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1005 | 2024 | 2930 | 4117 | 4729 |
| 1010 | 2118 | 2932 | 4194 | 4946 |
| 1155 | 2210 | 2982 | 4247 | 5079 |
| 1190 | 2287 | 3009 | 4265 | 5363 |
| 1195 | 2322 | 3030 | 4332 | 5478 |
| 1237 | 2578 | 3078 | 4384 | 5522 |
| 1304 | 2672 | 3118 | 4402 | 5615 |
| 1388 | 2726 | 3237 | 4459 | 5685 |
| 1470 | 2780 | 3359 | 4461 | 5708 |
| 1630 | 2781 | 3598 | 4470 | 5745 |
| 1848 | 2826 | 3719 | 4645 | 5758 |
| 2011 | 2929 | 3914 | 4646 | 5875 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र गजलक्ष्मी गुरु विकली लॉटरी — सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर गुरुवार • सोडत क्रमांक 31 • तिकीट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 31/07/2025

पहिले बक्षिस रु. 10,000/- : **GL-02 : 4129**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 0136 | 0172 | 0681 | 1140 | 1458 | 2974 | 3590 | 7389 | 7444 | 8908 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0141 | 0824 | 2161 | 2875 | 4856 | 5218 | 5354 | 7242 | 7527 | 9099 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0741 | 1039 | 2045 | 2226 | 2584 | 3357 | 5789 | 7079 | 7200 | 7497 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पाचवे बक्षिस रु. 300/- | 0898 | 1811 | 2352 | 3320 | 4097 | 5014 | 5938 | 7209 | 7997 | 8783 |
| 0007 | 0904 | 1848 | 2385 | 3338 | 4245 | 5024 | 6136 | 7223 | 8017 | 8839 |
| 0010 | 0912 | 1867 | 2423 | 3344 | 4254 | 5102 | 6227 | 7267 | 8029 | 8857 |
| 0020 | 0984 | 1882 | 2525 | 3356 | 4355 | 5198 | 6327 | 7274 | 8034 | 8894 |
| 0037 | 1005 | 1910 | 2580 | 3380 | 4375 | 5362 | 6346 | 7294 | 8088 | 8899 |
| 0063 | 1032 | 1920 | 2591 | 3399 | 4378 | 5403 | 6426 | 7327 | 8097 | 8938 |
| 0184 | 1079 | 1929 | 2651 | 3532 | 4433 | 5408 | 6460 | 7334 | 8104 | 8978 |
| 0203 | 1103 | 1987 | 2668 | 3576 | 4438 | 5522 | 6568 | 7375 | 8139 | 9005 |
| 0204 | 1111 | 2002 | 2671 | 3578 | 4460 | 5556 | 6615 | 7379 | 8168 | 9093 |
| 0295 | 1149 | 2019 | 2692 | 3613 | 4484 | 5557 | 6628 | 7387 | 8319 | 9151 |
| 0310 | 1195 | 2078 | 2702 | 3638 | 4519 | 5581 | 6640 | 7448 | 8378 | 9289 |
| 0332 | 1214 | 2136 | 2782 | 3653 | 4622 | 5597 | 6668 | 7619 | 8401 | 9390 |
| 0407 | 1309 | 2195 | 2792 | 3724 | 4640 | 5599 | 6686 | 7695 | 8404 | 9449 |
| 0490 | 1319 | 2209 | 2841 | 3792 | 4641 | 5627 | 6829 | 7710 | 8488 | 9509 |
| 0502 | 1427 | 2243 | 2864 | 3835 | 4671 | 5758 | 6879 | 7747 | 8505 | 9616 |
| 0563 | 1448 | 2266 | 2946 | 3837 | 4764 | 5845 | 6919 | 7761 | 8540 | 9695 |
| 0631 | 1612 | 2273 | 2964 | 3842 | 4820 | 5884 | 7013 | 7784 | 8572 | 9726 |
| 0651 | 1731 | 2285 | 2983 | 3886 | 4847 | 5905 | 7017 | 7793 | 8594 | 9809 |
| 0761 | 1762 | 2323 | 3073 | 3900 | 4917 | 5913 | 7047 | 7847 | 8668 | 9890 |
| 0870 | 1763 | 2328 | 3257 | 3921 | 4940 | 5920 | 7192 | 7907 | 8747 | 9901 |
| 0887 | 1777 | 2342 | 3307 | 4013 | 4974 | 5935 | 7207 | 7942 | 8748 | 9945 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## शुभ राशी दि. १/०८/२०२५

| | | |
|---|---|---|
| ९ | २ | ७ |
| १२ | २४ | ७४ |
| १७ | २९ | ७९ |
| १८० | १३८ | १३३ |
| २७० | १२९ | १७९ |

## महाराष्ट्र आकर्षक पुष्कराज विकली लॉटरी — सोडत दर गुरुवारी — तिकीट किंमत रु. 50/- — सोडत क्र. 31 — सोडत दिनांक 31/07/2025

पहिले सामाईक बक्षिस रु. 8 लाख : **AP-07 : 3549** — महाराजा असोसिएट्स - इचलकरंजी, प्रिन्स एजन्सी - मुंबई यांचा मार्फत

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- : **4367** — महावीर लॉटरी सेंटर - कोल्हापूर, श्री गणेश एन्टरप्रायझेस - दादर, मुंबई

| बक्षिस | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 1083 | 2006 | 2193 | 2364 | 3624 | 4746 | 6943 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1568 | 3094 | 3893 | 6516 | 6550 | 7543 | 7570 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1040 | 3320 | 3525 | 4246 | 4344 | 7180 | 7496 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 1651 | 2474 | 2544 | 3231 | 4337 | 4633 | 5376 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सातवे बक्षीस रु.100/- (सर्व मालिकांसाठी) | | 1915 | 2326 | 2945 | 3364 | 3939 | 4476 | 5062 | 5575 | 5964 | 6638 | 7127 | 7663 |
| | | 1918 | 2327 | 2966 | 3365 | 3955 | 4477 | 5070 | 5576 | 5983 | 6640 | 7146 | 7667 |
| | | 1919 | 2328 | 2976 | 3367 | 3973 | 4481 | 5085 | 5578 | 6018 | 6641 | 7169 | 7676 |
| 1012 | 1482 | 1961 | 2357 | 2992 | 3368 | 3978 | 4484 | 5101 | 5582 | 6029 | 6661 | 7179 | 7678 |
| 1015 | 1510 | 1964 | 2362 | 3025 | 3373 | 3979 | 4485 | 5112 | 5586 | 6048 | 6664 | 7192 | 7690 |
| 1060 | 1511 | 1969 | 2400 | 3030 | 3380 | 3999 | 4487 | 5115 | 5587 | 6061 | 6670 | 7203 | 7697 |
| 1089 | 1516 | 1978 | 2416 | 3035 | 3391 | 4018 | 4491 | 5128 | 5596 | 6062 | 6678 | 7212 | 7720 |
| 1096 | 1527 | 1991 | 2421 | 3036 | 3402 | 4034 | 4496 | 5133 | 5597 | 6065 | 6680 | 7228 | 7721 |
| 1098 | 1568 | 1996 | 2428 | 3068 | 3452 | 4074 | 4515 | 5134 | 5613 | 6067 | 6682 | 7237 | 7725 |
| 1100 | 1571 | 1998 | 2459 | 3073 | 3453 | 4091 | 4518 | 5157 | 5614 | 6083 | 6683 | 7260 | 7737 |
| 1114 | 1593 | 2034 | 2471 | 3076 | 3474 | 4093 | 4545 | 5197 | 5615 | 6086 | 6693 | 7266 | 7738 |
| 1124 | 1601 | 2040 | 2482 | 3083 | 3510 | 4094 | 4574 | 5215 | 5645 | 6096 | 6700 | 7271 | 7740 |
| 1131 | 1610 | 2051 | 2514 | 3099 | 3522 | 4114 | 4613 | 5235 | 5658 | 6106 | 6712 | 7272 | 7747 |
| 1133 | 1611 | 2067 | 2523 | 3100 | 3533 | 4129 | 4614 | 5319 | 5665 | 6116 | 6716 | 7279 | 7760 |
| 1136 | 1620 | 2077 | 2539 | 3104 | 3543 | 4134 | 4637 | 5338 | 5671 | 6168 | 6744 | 7292 | 7761 |
| 1148 | 1627 | 2100 | 2588 | 3122 | 3563 | 4148 | 4643 | 5355 | 5685 | 6200 | 6765 | 7307 | 7762 |
| 1165 | 1633 | 2123 | 2612 | 3126 | 3573 | 4154 | 4664 | 5378 | 5687 | 6222 | 6786 | 7309 | 7765 |
| 1174 | 1636 | 2125 | 2639 | 3127 | 3602 | 4204 | 4684 | 5381 | 5692 | 6246 | 6790 | 7327 | 7778 |
| 1177 | 1650 | 2127 | 2640 | 3136 | 3603 | 4232 | 4688 | 5406 | 5698 | 6251 | 6863 | 7353 | 7784 |
| 1183 | 1671 | 2138 | 2652 | 3163 | 3643 | 4243 | 4697 | 5423 | 5721 | 6260 | 6890 | 7355 | 7785 |
| 1189 | 1677 | 2165 | 2700 | 3181 | 3684 | 4245 | 4714 | 5430 | 5802 | 6262 | 6900 | 7370 | 7788 |
| 1190 | 1681 | 2196 | 2702 | 3205 | 3689 | 4254 | 4748 | 5461 | 5826 | 6276 | 6915 | 7377 | 7794 |
| 1207 | 1701 | 2206 | 2733 | 3217 | 3708 | 4261 | 4763 | 5468 | 5834 | 6285 | 6921 | 7380 | 7797 |
| 1214 | 1731 | 2211 | 2734 | 3220 | 3732 | 4262 | 4784 | 5476 | 5853 | 6309 | 6931 | 7384 | 7798 |
| 1216 | 1734 | 2218 | 2749 | 3255 | 3759 | 4336 | 4835 | 5490 | 5855 | 6326 | 6964 | 7385 | 7799 |
| 1228 | 1746 | 2221 | 2785 | 3282 | 3769 | 4384 | 4841 | 5501 | 5856 | 6331 | 6969 | 7412 | 7807 |
| 1266 | 1755 | 2223 | 2817 | 3283 | 3771 | 4389 | 4846 | 5505 | 5858 | 6336 | 6981 | 7431 | 7815 |
| 1310 | 1799 | 2227 | 2821 | 3299 | 3787 | 4393 | 4858 | 5506 | 5875 | 6361 | 6982 | 7472 | 7824 |
| 1313 | 1801 | 2236 | 2822 | 3300 | 3801 | 4403 | 4904 | 5507 | 5884 | 6362 | 7011 | 7490 | 7830 |
| 1315 | 1810 | 2237 | 2832 | 3307 | 3814 | 4408 | 4959 | 5522 | 5898 | 6364 | 7016 | 7493 | 7848 |
| 1316 | 1812 | 2251 | 2842 | 3311 | 3837 | 4433 | 4970 | 5523 | 5899 | 6378 | 7028 | 7500 | 7865 |
| 1371 | 1817 | 2252 | 2855 | 3315 | 3871 | 4434 | 4978 | 5524 | 5905 | 6429 | 7030 | 7507 | 7877 |
| 1390 | 1839 | 2253 | 2867 | 3317 | 3894 | 4441 | 4997 | 5536 | 5908 | 6463 | 7072 | 7527 | 7880 |
| 1398 | 1845 | 2255 | 2911 | 3320 | 3903 | 4448 | 4998 | 5545 | 5938 | 6565 | 7074 | 7538 | 7907 |
| 1401 | 1857 | 2264 | 2920 | 3325 | 3923 | 4455 | 5019 | 5547 | 5947 | 6570 | 7089 | 7577 | 7928 |
| 1417 | 1869 | 2276 | 2925 | 3330 | 3928 | 4461 | 5050 | 5552 | 5952 | 6583 | 7107 | 7581 | 7966 |
| 1420 | 1875 | 2292 | 2929 | 3333 | 3930 | 4465 | 5051 | 5554 | 5954 | 6600 | 7111 | 7582 | 7986 |
| 1429 | 1889 | 2309 | 2933 | 3344 | 3931 | 4469 | 5052 | 5555 | 5955 | 6616 | 7112 | 7586 | 7989 |
| 1457 | 1911 | 2325 | 2938 | 3347 | 3936 | 4474 | 5060 | 5565 | 5956 | 6636 | 7115 | 7587 | 7990 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# पलूस पालिकेवर ८ ऑगस्टला दूषित पाणी फेक मोर्चा काढणार

सांगली

पलूस शहरातील नागरिकांना गेल्या काही दिवसापासून दूषित स्वरूपाचा पाणीपुरवठा सुरू आहे. अनेकदा तक्रारी करूनही पालिका दुर्लक्ष करीत असल्याने दलित महासंघ मोहिते गटाच्या वतीने ८ ऑगस्ट रोजी पलूस नगरपालिका कार्यालयावर दूषित पाणी फेक मोर्चा काढणार असल्याचा इशारा दिला आहे.

दलित महासंघ मोहिते गटाचे राज्याध्यक्ष प्रशांत केदार, जिल्हा संपर्क प्रमुख युनुस कोल्हापूरे, राज्य उपाध्यक्ष निशांत आवळेकर यांनी यासंदर्भात मुख्याधिकारी उर्मिला राशिणकर यांना निवेदन दिले. या निवेदनात म्हटले आहे की, पलूस शहरासह परिसरातील १४ गावांना पाणीपुरवठा करण्यासाठी कुंडल प्रादेशिक योजना अस्तित्वात आहे.परंतु कुंडल येथे असणारा पाणी शुद्धीकरण प्लांट नादुरुस्त झाला असून त्याचे दुरुस्तीकाम अपूर्ण आहे. तसेच पाणी शुद्धीकरण प्रक्रियेला अधिकच्या २ लाख लिटर लागणाऱ्या पाण्याचा तुटवडा आहे. कुंडल येथील साटपा करण्यात येणाऱ्या टाक्यांमध्ये केवळ टी.एल.सी. पावडर व तुरटीचा वापर करून जुजबी पाणी शुद्धीकरण केले जात आहे. कुंडल येथून येणारे पाणी पलूस टाक्यांमध्ये टाकल्यावर पलूस नगरपालिका त्यावर कोणतीही प्रक्रिया न करता तसेच दूषित स्वरूपाचे पाणी नागरिकांना पिण्यासाठी पुरवते. पलूस पालिका प्रशासनाकडे स्वतःची पाणी शुद्धीकरणाची कोणतीही व्यवस्था व यंत्रणा नाही. परिणामी पलूस शहराला अशुद्ध पाणीपुरवठा होत आहे.

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — गणेशलक्ष्मी गौरव विकली लॉटरी — सोडत सायं. 5:00 वाजता

सोडत दर गुरुवार • सोडत क्रमांक 31 • तिकीट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 31/07/2025

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- : **MG-02 : 9222** — महावीर लॉटरी सेंटर, कोल्हापूर

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 1219 | 1790 | 2013 | 2322 | 2536 | | | | | |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 1060 | 1131 | 2812 | 3181 | 3208 | 5226 | 5315 | 6726 | 7239 | 7850 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0032 | 0103 | 1677 | 2749 | 3848 | 4122 | 5862 | 7321 | 7555 | 8533 |

पाचवे बक्षीस रु. 200/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 0029 | 0923 | 1741 | 2802 | 4261 | 5448 | 6382 | 7391 | 8295 | 9098 |
| 0031 | 1110 | 1839 | 2824 | 4264 | 5500 | 6497 | 7406 | 8380 | 9215 |
| 0038 | 1129 | 1866 | 2872 | 4424 | 5515 | 6561 | 7607 | 8381 | 9245 |
| 0060 | 1142 | 2036 | 3139 | 4446 | 5556 | 6579 | 7748 | 8467 | 9255 |
| 0067 | 1162 | 2108 | 3213 | 4547 | 5565 | 6591 | 7797 | 8507 | 9316 |
| 0069 | 1180 | 2156 | 3312 | 4583 | 5693 | 6663 | 7944 | 8528 | 9360 |
| 0074 | 1213 | 2372 | 3381 | 4665 | 5755 | 6669 | 7996 | 8627 | 9400 |
| 0088 | 1251 | 2376 | 3395 | 4750 | 5797 | 6725 | 8063 | 8691 | 9442 |
| 0098 | 1311 | 2433 | 3595 | 4762 | 5936 | 6982 | 8089 | 8697 | 9458 |
| 0412 | 1376 | 2522 | 3658 | 5006 | 5959 | 7110 | 8114 | 8729 | 9460 |
| 0536 | 1441 | 2636 | 3725 | 5052 | 6076 | 7117 | 8118 | 8748 | 9808 |
| 0573 | 1501 | 2662 | 3731 | 5080 | 6116 | 7299 | 8158 | 8788 | 9817 |
| 0702 | 1523 | 2707 | 3868 | 5182 | 6205 | 7320 | 8236 | 8842 | 9904 |
| 0760 | 1625 | 2723 | 4221 | 5252 | 6277 | 7371 | 8266 | 8892 | 9969 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# ऑनलाईन बेटिंग! अभिनेता प्रकाश राज यांची ईडीकडून चौकशी

■ हैदराबाद

**ऑनलाईन** बेटिंग आणि जुगार चालवणाऱ्या ॲप्सची जाहिरात केल्याप्रकरणी अंमलबजावणी संचलनालयाने (ईडी) दाखल केलेल्या मनी लाँडरिंगच्या खटल्यात प्रसिध्द दाक्षिणात्य अभिनेता प्रकाश राज यांची ईडीने सुमारे चार तास कसून चौकशी केली.



आपण ऑनलाईन बेटिंगशी संबंधित ॲपशी २०१६ मध्ये करार केला होता. मात्र त्यानंतर आपल्याला त्या कंपन्यांबद्दल खरी माहिती कळली. त्यामुळे नैतिकदृष्ट्या अयोग्य वाटल्याने आपण त्या कंपन्यांकडून मानधन स्वीकारले नाही. त्यानंतर आपण अशा प्रकारच्या कोणत्याही ॲपची जाहिरात केलेली नाही, असे आपण आपल्या जबाबात सांगितले, असे ईडीच्या कार्यालयातून बाहेर पडल्यानंतर माध्यमांशी बोलताना प्रकाश राज यांनी सांगितले.

राजकीय सूड भावनेने तुम्हाला या प्रकरणात गोवण्यात आले आहे असे वाटते का, असे माध्यमांच्या प्रतिनिधींनी विचारले असता 'नाही' असे उत्तर प्रकाश राज यांनी दिले.

अधिकाऱ्यांनी त्यांचे काम केले. मी एक नागरिक म्हणून माझे कर्तव्य केले. अधिकाऱ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची मी उत्तरे दिली. यामध्ये कसलाही राजकीय संबंध नाही, असे प्रकाश राज म्हणाले.

देश विदेश

# गाझाबाबत द्विराष्ट्र तोडग्याला संयुक्त राष्ट्रात भारताचा पाठिंबा

■ न्यूयॉर्क

**गाझावरून** सुरु असलेल्या इस्त्रायल आणि पॅलेस्टीनच्या संघर्षावर द्विराष्ट्र तोडग्याला भारताने पाठिंबा दिला. संयुक्त राष्ट्रातील भारताचे प्रतिनिधी राजदूत पी. हरिष यांनी भारताच्या भूमिकेचा पुनरुच्चार केला आणि गाझामध्ये लवकरात लवकर मानवतावादी मदत उपलब्ध करून देण्याची मागणी केली. गाझामधील समस्येवर संयुक्त राष्ट्राच्या उच्चस्तरिय परिषदेमध्ये ते बोलत होते. दोन्ही बाजूंनी थेट संवाद साधण्याच्या गरजेवरही त्यांनी भर दिला. आपले प्रयत्न आता उद्देशपूर्ण संवाद आणि राजनयिकतेद्वारे दोन-राज्य उपाय कसे आणायचे आणि संघर्ष करणाऱ्या दोन्ही बाजूंना एकमेकांशी थेट संवाद साधण्यासाठी कसे आणायचे यावर केंद्रित असले पाहिजेत, असे ते म्हणाले. गाझामधील बिघडत चाललेल्या मानवतावादी परिस्थितीवर त्यांनी प्रकाश टाकला, मृतांचा आकडा, नुकसान झालेल्या वैद्यकीय सुविधा आणि २० महिन्यांहून अधिक काळ शाळेबाहेर असलेल्या मुलांच्या स्थितीला त्यांनी अधोरेखित केले. गाझामधील मानवी आपत्ती अखंड सुरू आहे. मानवतावादी मदत कोणत्याही अडथळ्यांशिवाय मिळायला हवी.

# इराणचे राष्ट्राध्यक्ष पेझेश्कियान रविवारपासून पाकिस्तान दौऱ्यावर

■ तेहरान

**इराणचे** राष्ट्राध्यक्ष डॉ. मसूद पेझेश्कियान २ ऑगस्टपासून दोन दिवसांच्या पाकिस्तान दौऱ्यावर जाणार आहेत. पेझेश्कियान काही वर्षांत पाकिस्तानला भेट देणारे दुसरे इराणचे राष्ट्राध्यक्ष असतील. सुरुवातीला जुलैच्या शेवटच्या आठवड्यात हा दौरा नियोजित होता. एप्रिल २०२४ मध्ये इब्राहिम रईसी यांनी पाकिस्तानचा ३ दिवसांचा अधिकृत दौरा केला. रईसी यांच्या हेलिकॉप्टर अपघातात मृत्यू होण्याच्या एक महिना आधी झालेल्या या दौऱ्यादरम्यान त्यांनी लाहोर आणि कराचीलाही भेट दिली होती. इराण राष्ट्राध्यक्षांचे राजकीय सल्लागार मेहदी सनाई यांनी एक्सवरील एका पोस्टमध्ये म्हटले आहे की, पंतप्रधान शेहबाज शरीफ यांच्या निमंत्रणावरून डॉ. पेझेश्कियान शनिवारी पाकिस्तानला भेट देतील. सांस्कृतिक आणि व्यापारावर अधिकृत बैठका आणि चर्चा होतील. प्रांतीय आणि सीमा सहकार्य विकसित करणे आणि व्यापार देवाणघेवाण वाढवणे आहे.

# गुवाहाटी हिट अँड रन प्रकरण अभिनेत्री नंदिनी कश्यप अटकेत

■ नवी दिल्ली



**आसामच्या** गुवाहाटीतील ओदलबक्रा परिसरात २५ जुलैच्या रात्री भरधाव कारच्या धडकेत गंभीर जखमी झालेल्या समीउल हक (२१) या तरुणाचा २९ जुलै रोजी उपचारादरम्यान मृत्यू झाला. या प्रकरणी हिट अँड रनच्या आरोपाखाली आसामी अभिनेत्री नंदिनी कश्यप हिला अटक करण्यात आली आहे. समीउल हा नलबारी पॉलिटेक्निकचा विद्यार्थी असून, तो गुवाहाटी महानगरपालिकेच्या नाईट शिफ्टमध्ये स्ट्रीटलाईट दुरुस्तीचे काम करत होता. काम करत असताना भरधाव वेगात असलेल्या कारने त्याला जोरदार धडक दिली. अपघातानंतर कार ड्रायव्हर न थांबता घटनास्थळावरून पळाला. सीसीटीव्ही फुटेजमधून अपघातावेळी ही कार अभिनेत्री नंदिनी कश्यप चालवत असल्याचे स्पष्ट झाले. अपघातानंतर समीउलला तत्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

# अ. भा. मराठी साहित्य परिषद प्रदेशाध्यक्षपदी संभाजीराजे भोसले

■ तंजावर



**छत्रपती** शिवाजी महाराज यांचे सावत्र बंधू श्रीमंत छत्रपती व्यंकोजीराजे भोसले (तंजावर, तामिळनाडू) यांचे थेट १३ वे वंशज श्रीमंत युवराज संभाजीराजे भोसले यांची 'अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदे'च्या तामिळनाडू प्रदेशच्या प्रदेशाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. श्रीमंत युवराज संभाजीराजे भोसले यांनी सांगितले की, श्रीमंत छत्रपती सरफोजीराजे दुसरे यांनी मराठी, तमिळ, कन्नड, तेलगू आदी भाषांतील पहिले नाटक लिहिले आहे. त्यांनी एकूण ३५ ग्रंथांचे लेखन केले. बहुभाषा पंडित असा त्यांचा लौकिक आहे. तंजावर संस्थानच्या राजवाड्यात सरस्वती ग्रंथालय हे सर्वात मोठे ग्रंथालय म्हणून प्रसिद्ध आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या 'शिवभारत' ग्रंथाच्या खंडासह अनेक दूर्मिळ ग्रंथसंपदेचे जतन केले आहे.

# सौदी अरेबियातील रिअल इस्टेट परदेशी कंपन्यांसाठी खुले होणार

■ रियाध



**सौदी** अरेबिया सरकारने रिअल इस्टेट क्षेत्र आता परदेशी नागरिकांसाठी आणि कंपन्यांसाठी खुले करण्याचे ठरवले. २०२६ पासून हा निर्णय लागू होणार आहे. यासाठी एक कायदा देखील मंजूर करण्यात आला असल्याचे सौदी अरेबिया सरकारने सांगितले.

सरकारच्या या निर्णयामुळे परदेशी गुंतवणूकदार रियाध, जेद्दाह आणि सौदीच्या इतर अनेक भागांमध्ये रिअल इस्टेटमध्ये मालमत्ता खरेदी करू शकणार आहे. मक्का आणि मदीनासारख्या पवित्र शहरांत गुंतवणूक करण्यास बंदी असणार आहे. या शहरांमध्ये गुंतवणूकीसाठी काही महत्वाच्या अटी पूर्ण कराव्या लागतील. सौदीच्या व्हिजन २०३० चा भाग म्हणून सौदी अरेबियाच्या क्राऊन प्रिन्स मोहम्मद बिन सलमान यांनी हा निर्णय घेतला. सौदीचे गृहमंत्री माजिद बिनी अब्दुला यांनी या निर्णयामुळे सौदी अरेबियाच्या रिअल इस्टेटमध्ये परदेशी गुंतवणूक वाढ होईल, असे म्हटले. याचा उद्देश सौदीच्या शहरांना जागतिक गुंतवणूकदार केंद्र बनवण्याचा असल्याचे अब्दुला यांनी सांगितले.

# मराठी भाषा व संस्कृती संरक्षण विद्रोहीतर्फे रविवारी परिषद


■ मुंबई

**महाराष्ट्रासह** दक्षिणेकडील राज्यांमध्ये पहिलीपासून हिंदी सक्ती करण्याच्या हालचालींच्या विरोधात विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या वतीने राज्यव्यापी मराठी भाषा व संस्कृती संरक्षण परिषद आयोजित करण्यात आली आहे. संयुक्त महाराष्ट्राचे शिल्पकार लोकशाहीर कॉ. अण्णाभाऊ साठे आणि क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या जयंतीच्या निमित्ताने ही परिषद ३ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता छत्रपती संभाजीनगरमध्ये होणार आहे. या परिषदेचे उद्घाटन प्रा. डॉ. दीपक पवार यांच्या हस्ते होणार आहे. दिवसभर चालणाऱ्या या कार्यक्रमात उद्घाटन सत्रासोबतच दोन परिसंवाद, एक खुला मंच आणि एक कवी संमेलन आयोजित करण्यात आले आहे.

# अंमली पदार्थ शोधणाऱ्या 'लुसी'चा हृदयविकाराने मृत्यू

■ सांगली

**सांगली** जिल्हा पोलीस दलातील अंमली पदार्थ शोधक श्वान 'लुसी' हिचा हृदयविकार आणि किडनीच्या आजाराने मृत्यू झाला. 'लुसी'ने गेल्या आठ वर्षांत अनेक गुन्हे उघडकीस आणून पोलिसांना मदत केली होती. तिच्या निधनाने पोलीस दलात शोककळा पसरली आहे. पोलिसांनी मानवंदना देत तिला निरोप दिला.



२४ जुलै रोजी लुसी आजारी पडली. तिने खाणेपिणे बंद केले. तिला तातडीने मिरजेतील पशुवैद्यकीय दवाखान्यात दाखल करण्यात आले. तिथे किडनी व हृदयविकाराचा आजार समोर आला. अखेर काल बुधवारी सकाळी तिने अखेरचा श्वास घेतला.श्वानपथकातील कर्मचाऱ्यांनी लुसीला श्रद्धांजली वाहिली. त्यानंतर बंदुकीच्या फैरी झाडून तिला अखेरचा निरोप देण्यात आला. यावेळी अनेकांना अश्रू अनावर झाले होते. लुसीचे हस्तक अंमलदार म्हणून तौफिक सय्यद व विनोद थोरात काम पाहत होते. दोघेही प्रशिक्षण काळापासून तिच्यासोबत होते. त्यामुळे त्यांच्यात वेगळेच नाते तयार झाले होते. त्यांना तिचा लळा लागला होता. लुसीच्या मृत्यूने त्यांना मोठा धक्का बसला होता. लुसीला अखेरचा निरोप देताना त्यांचे अश्रू थांबत नव्हते. जर्मन शेफर्ड जातीची श्वान 'लुसी' हिचा जन्म २ जुलै २०१७ रोजी झाला होता. १६ नोव्हेंबर २०१७ ते २६ मे २०१८ या कालावधीत तिने राजस्थानच्या अलवर येथील श्वान प्रशिक्षण केंद्रात अंमली पदार्थ शोधक म्हणून प्रशिक्षण पूर्ण केले.प्रशिक्षणानंतर ती सांगली पोलीस दलात दाखल झाली. आठ वर्षे तिने अत्यंत जबाबदारीने सेवा बजावली.२० ऑक्टोबर २०२० रोजी इस्लामपूर पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात २३ लाखांहून अधिक किमतीचा गांजासाठा जप्त करण्यात आला होता.

# मुंबईत सोमवारपासून अत्याधुनिक टपाल प्रणालीची अंमलबजावणी

■ मुंबई

**डिजिटल** उत्कृष्टतेकडे वाटचाल करत आणि राष्ट्र उभारणीच्या प्रक्रियेत महत्त्वाचा टप्पा गाठत टपाल विभागाने अत्याधुनिक ॲडव्हान्स्ड पोस्टल टेक्नॉलॉजी (एपीटी) प्रणाली सुरू करण्याची घोषणा केली आहे. येत्या ४ ऑगस्टपासून मुंबई उत्तर विभागातील सर्व टपाल कार्यालयांमध्ये ही प्रणाली लागू केली जाणार असून, यामध्ये अंधेरीपासून वांद्र्यापर्यंतचा टपाल परिसर समाविष्ट आहे.

या प्रणालीच्या सुरळीत अंमलबजावणीसाठी २ ऑगस्ट रोजी कार्य बंद ठेवण्यात येणार आहे. या दिवशी संबंधित टपाल कार्यालयांमध्ये कोणताही सार्वजनिक व्यवहार होणार नाही. डेटा स्थलांतर, प्रणालीची वैधता तपासणी आणि नव्या यंत्रणेची जुळवणी यांसाठी ही तात्पुरती सेवा स्थगिती आवश्यक असल्याचे टपाल विभागाकडून सांगण्यात आले.

एपीटी प्रणालीमुळे टपाल सेवा अधिक कार्यक्षम, ग्राहकस्नेही आणि वेगवान होणार आहे. सेवांचा सुधारित अनुभव, जलद वितरण आणि आधुनिक कार्यपद्धती यामुळे टपाल विभागाच्या डिजिटल परिवर्तनात मोठी भर पडणार आहे.

# पी. एन. पाटलांचे चिरंजीव अजित पवारांच्या राष्ट्रवादीत

■ कोल्हापूर



**काँग्रेसचे** निष्ठावंत नेते तथा दिवंगत आमदार पी. एन. पाटील यांचा राजकीय वारसा सांभाळणारे त्यांचे चिरंजीव तथा जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राहुल पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये (अजित पवार गट) प्रवेश करण्याचे निश्चित केले आहे. काल राहुल पाटील यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची देवगिरी बंगल्यावर भेट घेऊन राष्ट्रवादीत प्रवेश करण्यावर शिक्कामोर्तब केले. त्यांचा पक्षप्रवेश ऑगस्ट महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात करवीर विधानसभा मतदारसंघात मोठे शक्तिप्रदर्शन करत होणार आहे.

पी. एन. पाटील यांच्या हयातीतच राहुल हे भाजपा किंवा राष्ट्रवादीत प्रवेश करतील अशा चर्चा सुरू होत्या. पी. एन. यांच्या निधनानंतर राहुल यांच्या राजकीय भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले होते. अखेर, मंत्री हसन मुश्रीफ यांच्या मध्यस्थीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राहुल यांना बारामती येथे भेटीचे निमंत्रण दिले होते. त्यावेळी झालेल्या चर्चेनंतर, आपल्या मतदारसंघातील प्रमुख कार्यकर्त्यांशी आणि नेत्यांशी चर्चा करून अंतिम निर्णय घेणार असल्याचे राहुल यांनी स्पष्ट केले होते. त्यानुसार, राहुल यांनी गेल्या काही दिवसांत करवीर मतदारसंघातील जिल्हा परिषद व पंचायत समिती गटनिहाय प्रमुख कार्यकर्त्यांच्या बैठका घेतल्या. भोगावती साखर कारखान्याचे संचालक आणि पी. एन. यांचे खंदे समर्थक असलेल्या शिलेदारांशी चर्चा करून त्यांनी राष्ट्रवादीत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला.

# नांदेडमध्ये तरुणीचे अपहरण व्हिडिओ व्हायरल! आरोपी अटक

**नांदेड** - नांदेड शहरात दोन तरुणांनी एका मुलीचे दुचाकीवरून अपहरण केल्याचा धक्कादायक प्रकार झाला. या घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाला. याप्रकरणी पोलिसांनी एका आरोपीला अटक केल्याची माहिती आहे. व्हायरल व्हिडिओमध्ये दोन तरुण दुचाकीवरून तरुणीच्या अपहरणाचा प्रयत्न करत आहेत आणि त्यातील एक तरूण मुलीच्या गळ्याला घट्ट धरून ओढत नेत असल्याचे दिसते. ती तरुणी त्यांचा प्रतिकार करत ओरडत असल्याचे दिसते.

या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ आरोपींचा पाठलाग केला. पोलिसांपासून वाचण्यासाठी आरोपींनी पळून जाण्याच्या प्रयत्नात तरुणीला रस्त्याच्या मधोमध फेकून दिले. आरोपीनी घटनास्थळावरून पळ काढला. परंतु पोलिसांनी काही तासातच एका आरोपीला देगलूर नाका भागातून अटक केली.

# शाळेच्या रस्त्यासाठी ग्रामस्थांचे १५ ऑगस्टला उपोषण आंदोलन

**तहसिलदारांना निवेदन सादर**

■ दोडामार्ग

**सिंधुदुर्ग** जिल्ह्यातील दोडामार्ग तालुक्यातील सर्वाधिक विद्यार्थ्यांची संख्या असलेली सावंतवाडा येथील पी. एम. श्री जिल्हा परिषद शाळा तब्बल ३३ वर्षांपासून रस्त्यासारख्या मूलभूत सोयींपासून वंचित आहे. रस्ता नसल्याने पालक आणि विद्यार्थी त्रस्त आहेत. रस्त्याच्या मागणीसाठी आता सर्व ग्रामस्थ येत्या १५ ऑगस्ट रोजी दोडामार्ग तहसील कार्यालय येथे लाक्षणिक उपोषण करणार आहेत. यासंदर्भातील निवेदन नुकतेच तहसीलदारांना देण्यात आले.

सावंतवाडा येथील शाळेची जमीन अद्याप जिल्हा परिषदेच्या नावावर झालेली नाही. त्यामुळे शाळेच्या परिसरात कुठलाही विकासात्मक उपक्रम हाती घेता आलेला नाही. शाळेच्या परिसरात कोणतेही काम



करायचे असल्यास त्याला स्थानिक स्तरावर विरोधाचा सामना करावा लागतो. या गंभीर समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी व शाळेला हक्काचा रस्ता आणि जमीन जिल्हा परिषदेच्या नावावर करून घेण्यासाठी १५ ऑगस्ट रोजी सकाळी ९.०० वाजता तहसीलदार कार्यालय येथे लाक्षणिक उपोषण केले जाणार आहे.

# पर्यावरणपूरक इंधनासाठी मुंबईतील ४२ बेकऱ्यांचा अर्ज

■ मुंबई

**उच्च** न्यायालयाच्या आदेशानंतर कोळसा व लाकूड जाळणाऱ्या पारंपरिक बेकऱ्यांना पर्यावरणपूरक इंधन वापरण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार मुंबई महापालिकेच्या पर्यावरण विभागाने पुढाकार घेत गॅस कंपनीसोबत बैठकांचे आयोजन केले आणि पर्यावरणपूरक इंधनाच्या वापरासाठी उपाययोजना राबवण्यास सुरुवात केली. याला प्रारंभिक यश लाभले असून, आतापर्यंत शहरातील ४२ बेकरी मालकांनी पीएनजी (पाइप्ड नॅचरल गॅस) या इंधनासाठी अर्ज केले आहेत.

कोळसा आणि लाकूड जाळणाऱ्या बेकऱ्यांमुळे वाढत्या प्रदूषणाचा प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर पर्यावरण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी उर्वरित बेकरी मालकही लवकरच पीएनजी इंधनासाठी पुढाकार घेतील, असा विश्वास व्यक्त केला आहे.

# कबुतरांना खाद्य देणाऱ्यांविरुद्ध पोलिसांत गुन्हे दाखल करा

■ मुंबई

**मुंबईत** कबुतरांना खाद्य न घालण्याबाबत कोणताही दिलासा देण्यास उच्च न्यायालयाने नकार दिला आहे. या आदेशानंतरही कबुतरांना खाद्य घालण्यात

**न्यायालयाचे आदेश**

येत असेल आणि याबाबत पालिकेच्या कर्मचाऱ्यांना कर्तव्य बजावण्यात अडथळा आणला जात असेल, तर अशा व्यक्तींविरोधात पोलिसांत तक्रार नोंदवा, असे आदेशही न्यायालयाने पालिकेला दिले. सरकारच्या निर्देशानुसार पालिकेने कबुतरांना खायला घालण्यास बंदी घातली आहे. परंतु अशा बंदीमुळे कबुतरांचा मृत्यू होत असल्याने त्यांना खाद्य घालण्यापासून रोखू नये, अशी मागणी



करणारी याचिका पल्लवी पाटील, स्नेहा विसरारिया आणि सविता महाजन यांनी उच्च न्यायालयात दाखल केली आहे. या याचिकेवर न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.यावेळी बंदी असतानाही खाद्य घातले जात असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले. खंडपीठाने याची गंभीर दखल घेत तीव्र नाराजी व्यक्त करत संबंधितांवर बीएनएस कायद्यांतर्गत पोलिसांत गुन्हे दाखल करण्याचे आदेश पालिकेला दिले. न्यायालयीन आदेशाचा चुकीचा अर्थ काढू नये, माणसांच्या आरोग्यापेक्षा महत्त्वाचे काहीही असू शकत नाही, असे निरीक्षण खंडपीठाने नोंदवले. त्याचवेळी मुंबईतील कबुतरखाने पाडकाम कारवाई करण्यापासून मज्जाव करण्याचे दिलेले आदेशही न्यायालयाने कायम ठेवले.

# नांदणीमधील महादेवी हत्तीणीसाठी ग्रामस्थांचा जिओवर बहिष्कार

■ कोल्हापूर

**कोल्हापूरच्या** शिरोळ तालुक्यातील नांदणी मठातील महादेवी हत्तीणीला पोलीस बंदोबस्तात गुजरातमधील वनतारा येथे सुपूर्द केल्यानंतर जिल्ह्यात तीव्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत. या निर्णयावर संतप्त झालेल्या नांदणी ग्रामस्थांनी जिओ नेटवर्कवर बहिष्कार टाकत जिओचे सिम इतर नेटवर्कला पोर्ट करणे सुरू केले.

यासंदर्भातील एक ऑडिओ क्लिप व्हायरल झाली आहे. या क्लिपमध्ये एक ग्रामस्थ जिओच्या प्रतिनिधीला म्हणाले की, आमच्या घरातील एक व्यक्ती गेल्यासारखा आमच्यावर दुःखाचे संकट आले आहे.यामुळे आम्ही जिओ कार्ड पोर्ट करत आहोत. अंबानी कुटुंबाने धार्मिक भावना दुखावल्या आहेत. शिरोळ तालुक्यातील हजारो नागरिक आता सिम पोर्ट करणार आहेत. आमचा संदेश अंबानींपर्यंत पोहचावा. दरम्यान, महादेवी हत्तीणीला पुन्हा नांदणीत आणण्याच्या मागणीसाठी लोकप्रतिनिधींनी आजपासून सह्यांची मोहीम सुरू केली असून या मोहिमेला ग्रामस्थांचा पाठिंबा मिळाला आहे.

# हतनूर धरणाचे १४ दरवाजे उघडले

■ जळगाव

**जळगाव** जिल्ह्यातील भुसावळमधील महत्त्वाचे समजले जाणारे हतनूर धरण सध्या भरले असल्याने धरणाचे १४ दरवाजे उघडण्यात आले. त्यामुळे तापी नदी पात्रात २१,७५४ क्यूसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू आहे. या पाण्याच्या विसर्गामुळे नदीकाठच्या गावांना संभाव्य धोका निर्माण होऊ नये म्हणून प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे. नदीच्या आसपास राहणाऱ्या नागरिकांनी योग्य ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन हतनूर धरण प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# उल्हासनगरात स्वतःला पेटवून आत्महत्या

■ उल्हासनगर

**उल्हासनगरमधील** सोसायटीत टेरेसवर एका व्यक्तीने स्वतःला जाळून घेतले. विजयकुमार भोजवानी असे मृत व्यक्तीचे नाव आहे. ते कॅम्प नंबर ५ च्या गांधी रोड भागातील लक्ष्मीनारायण पॅलेस या इमारतीतील रहिवासी होते. काल रात्रीच्या सुमारास ते गच्चीवर गेले. यावेळी त्यांनी आपल्यासोबत ज्वलनशील पदार्थ नेले होते. यानंतर काही वेळातच त्यांनी स्वतःला पेटवून घेतले. गच्चीवर कुणीतरी किंचाळत असल्याचे सोसायटीतील रहिवाशांच्या लक्षात येताच त्यांनी गच्चीकडे धाव घेतली. त्यांनी यावेळी आग विझवण्याचे अथक प्रयत्न केले. मात्र, तोपर्यंत भोजवानी मोठ्या प्रमाणावर भाजले होते. याची माहिती पोलिसांना मिळताच त्यांनी घटनास्थळी पोहचून भोजवानी यांना रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. दरम्यान, भोजवानी यांनी स्वतःला पेटवून आत्महत्या का केली, याचा तपास पोलीस करत आहेत.

# राज्यातील पाच आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

**अजीज शेख धुळ्यात जाणार**

■ मुंबई

**राज्यात** स्वराज संस्थेच्या निवडणुका होणार असून त्याआधी विविध क्षेत्रातील प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बदल्या होत आहेत. आज राज्यातील पाच भारतीय प्रशासकीय सेवा (आयएएस) अधिकाऱ्यांची बदली करण्यात आली आहे. यापूर्वी राज्यातील आठ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी करण्यात आले होते.

व्यवस्थापकीय संचालक अजीज शेख यांची बदली मुंबईहून धुळे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी या पदावर झाली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी अशीमा मित्तल यांची बदली नाशिक येथून जिल्हाधिकारी जालना या पदावर झाली आहे. जिल्हाधिकारी श्रीकृष्णनाथ पांचाळ यांची बदली जालना येथून ठाणे जिल्हाधिकारी या पदावर झाली आहे. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांची बदली अप्पर मुख्य सचिव महसूल मंत्रालय, मुंबई आणि अप्पर मुख्य सचिव, दिव्यांग कल्याण विभाग अनिल डिग्गीकर यांची बदली अपर मुख्य सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई या पदावर झाली आहे. काही दिवसांपूर्वी सरकारने काही अधिकाऱ्यांची पदोन्नती केली होती, तर २० अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या होत्या.

# डी फार्मसीच्या विद्यार्थिनीची गळफास घेऊन आत्महत्या

■ छत्रपती संभाजीनगर

**छत्रपती** संभाजीनगरमधील सिडको एन-७ भागातील ग्रिव्हिल कॉलनीत एका डी फार्मसीच्या विद्यार्थिनीने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना काल दुपारी १२:३० च्या सुमारास घडली. ती मूळची जालन्यातील रहिवासी होती. ती डी फार्मसीच्या तिसऱ्या वर्षात शिकत होती.

कल्याणी छत्रपती संभाजीनगरमधील श्री साई इन्स्टिट्युटमध्ये डी फार्मसीचे शिक्षण घेत होती. ती एक ते दीड वर्षांपासून तीन मैत्रिणींसह भाड्याच्या घरात राहत होती. नेहमीप्रमाणे तिच्याच्या मैत्रिणी सकाळी १० च्या सुमारास महाविद्यालयात गेल्या. तेव्हा ती खोलीतच होती. प्रॅक्टिकल संपल्याने तिघी मैत्रिणी महाविद्यालयातून दुपारी १२:३० च्या सुमारास परत आल्या. तेव्हा दरवाजा उघडत नसल्याने त्यांनी खिडकीतून डोकावून पाहिले असता, त्यांना ती फॅनला ओढणीच्या साह्याने गळफास घेतल्याच्या स्थितीत दिसली.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

|| न मे भक्त प्रणश्यति ||

# डिजिटल व्यवहारांचे धक्के आणि धोके

**भारताला** जगाची अर्थसत्ता व्हायची आहे. गेल्या तीन वर्षात पाचव्या क्रमांकावरून चौथ्या क्रमांकावर भारत पुढे सरकला आणि येत्या वर्षभरात भारत जगातील तिसरी आर्थिक महासत्ता होईल अशी भाकितं वर्तवली जात आहेत. जगातील ज्या काही आर्थिक महासत्ता आहे त्यात अमेरिका, चीन, रशिया या देशांचा नंबर लागतो. गेली अनेक वर्ष विकसित देश म्हणून ही राष्ट्रे ओळखली जातात. त्यांच्या या विकासात तंत्रज्ञानाचा सर्वाधिक वापर हे प्रमुख कारण ठरते. २०१९ ला कोरोनाच्या भीतीपोटी भारतात डिजिटल व्यवहारांना सुरूवात झाली. एकमेकांना स्पर्शही करायचा नसल्याने देशभरातले लाखो आर्थिक व्यवहार हे नाईलाजाने का होईना पण ऑनलाईन होऊ लागले. त्याचे अनेक फायदे पुढच्या दीड दोन वर्षामध्ये समोर आले. कोणतेही विशेष प्रयत्न न करता डिजिटल व्यवहारांना एवढे यश आले असेल तर प्रयत्नपूर्वक अधिकाधिक व्यवहार डिजिटल किंवा ऑनलाईन व्हावेत. याबाबत सरकारने काही अधिकृत निर्णय घेतले. आणि सुरूवातीच्या काळात या डिजिटल व्यवहारांवर कोणतेही शुल्क बँकांनी आकारू नयेत असा निर्णय घेतला. त्याचा परिणाम सकारात्मक झाला. आणि अधिकाधिक आर्थिक व्यवहार हे तंत्रज्ञानाच्या माध्यमातून होऊ लागले. अक्षरशः गेल्या महिन्याभरातली डिजिटल पेमेंटसची संख्या लक्षात घेतली तर ती जवळपास १ लाख ८४० करोड एवढी होते. त्यातून तब्बल २४ लाख करोडचे व्यवहार किंवा उलाढाल झाल्याचे समोर आले आहे. २४ लाख करोडची डिजीटल पद्धतीने झालेली उलाढाल ऐतिहासिकच नव्हे तर विक्रमी म्हणता येते. याचे अनेक दूरगामी परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर होऊ लागले आहेत. परंतु ज्या कारणांसाठी सरकारने डिजीटल व्यवहारांना प्रोत्साहन दिले. त्याची कारणमिमांसा किंवा विश्लेषण केले तर या डिजिटल व्यवहारातले काही धोके अजूनही कायम असल्याचे लक्षात येते. म्हणजे चोवीस लाख करोडचा टप्पा गाठणे हा या डिजिटलचा नक्कीच धक्का आहे. परंतु त्याचा गैरव्यवहारांसाठी होणारा उपयोग तितकाच धोकादायकही आहे.

**चोवीस लाख कोटींचे विक्रमी व्यवहार**

प्रामुख्याने डिजिटल व्यवहारांचे तीन प्रमुख लाभ लक्षात येतात. एक म्हणजे व्यवहारांमध्ये वेग येतो. अधिकाधिक पारदर्शकता राहाते आणि चलन छपाईवर होणारा खर्चदेखील कमी होतो. २४ लाख कोटींचे व्यवहार ऑनलाईन झाल्याने तितक्या नोंटाचा किंवा चलनाचा वापर कमी झाला हे त्यातले अध्यारूत सत्य आहे. व्यवहारांमधला वेग वाढतो म्हणजेच कमीत कमी काळात अधिकाधिक व्यवहार होऊ शकतात. आणि पैशांच्या देवाणघेवाणासाठी खूपच कमी कालावधी लागत असल्याने ज्याच्याकडे आपण बाजारातले खेळते भांडवल म्हणून बघतो. ते भांडवलही वेळच्या वेळी उपलब्ध झाल्याने अर्थचक्राला नकळतपणे गती येते. भारताला आर्थिक महासत्ता व्हायचे असेल तर अर्थव्यवहारामध्ये तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करणे खूप गरजेचे आहे. एवढेच नव्हे तर ज्याला आपण ई गव्हर्नन्स म्हणतो म्हणजे कागदपत्र किंवा फाईलींशिवाय अनेक प्रकारचे प्रशासकीय कामे घडून येतात. जर सामान्य माणसाने या डिजीटल व्यवहारांना इतक्या मोठ्या प्रमाणावर पांठिबा दिला असेल तर केंद्र आणि राज्य सरकारांनी आपापले व्यवहार अधिकाधिक तंत्रज्ञानाधिष्ठित केले पाहिजेत. त्याची काही प्रमाणात सुरूवात झालेली आहे. परंतु नोकरशाहीइतकी हुशार असते की सरकारी कामातल्या दिरंगाईची सवय आणि भ्रष्टाचार या दोन्ही गोष्टी टिकून राहाव्यात हाच त्या नोकरशाहीचा प्रयत्न असतो. म्हणून आर्थिक व्यवहार प्रचंड वेगाने डिजिटल होत आहेत. आता केंद्र आणि राज्य सरकारांनी प्रशासनामध्येसुद्धा डिजीटल होण्याची आवश्यकता आहे. कोणत्याही प्रकारच्या तंत्रज्ञानावर आधारित सुधारणा किंवा विकास घडून आला त्या त्यावेळी तो प्रत्यक्षात आणण्यामध्ये सर्वसामान्य जनतेने नेहमीच पुढाकार घेतलेला आहे. या डिजिटल व्यवहारांवर शुल्क आकारण्याचा तुघलकी प्रकारही अजून पाहायला मिळतो. खरे तर त्याच्यावर कोणतेही शुल्क आकारता कामा नये. सगळेच व्यवहार ऑनलाईन असल्यामुळे बँकांच्या खर्चांमध्ये मोठी कपात होते. कर्ज व्यवहार अन्य छोट्या मोठ्या व्यवहारांकरीता बँकांकडून शुल्क आकारले जाते पण दैनंदिन स्तरावर युपीआय किंवा डिजीटल पेमेंटस जर पूर्ण शुल्क रहित केले तर त्याला लोकांचा आर्थिक पाठिंबा मिळू शकेल.

**काळ्या पैशाचे काय?**

डेबिट कार्ड किंवा क्रेडीट कार्ड वापरले किंवा ऑनलाईन पैसे पाठवले तर त्याच्यावर बँकांकडून विशिष्ट प्रमाणात सेवाशुल्क आकारले जाते. भारतासारख्या मोठी लोकसंख्या असलेल्या देशात व्यवहारांची व्याप्ती वाढवायची असेल तर त्याला वेगवेगळ्या पद्धतीने अधिक प्रोत्साहन दिले पाहिजे. मात्र या डिजिटल व्यवहारांचे धोकेही समोर येत असतात. खरे तर भ्रष्टाचार कमी व्हायला हवा आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे काळ्या पैशाला लगाम घालता आला पाहिजे. इतक्या प्रमाणावर डिजिटल व्यवहार होत असूनही देशात काळा पैसा निर्माण होण्याचे प्रमाणही तितकेच आहे. निवडणुकांच्या काळात ज्याप्रमाणात रोख रकमा सापडतात. किंवा वेगवेगळी सरकारी कामे करून घेण्याकरीता होणारी छुपी लाचखोरी अजूनही कायम आहे. जर डिजिटल व्यवहारांना इतके चांगले प्रोत्साहन मिळत असेल तर काळ्या पैशाची नाकेबंदी होणे तितकेच स्वाभाविक ठरते. या डिजीटल व्यवहारांचाच फायदा घेत आज सायबर क्राईम मोठ्या प्रमाणावर वाढत आहेत. तंत्रज्ञानाचाच वापर करून डेबिट क्रेडीट कार्डाचे पिन नंबर चोरले जातात आणि त्यातून परस्पर पैसे काढण्याचे प्रकार होतात. ऑनलाईन जुगाराच्या प्रकारांचाही धुडगुस पाहायला मिळतो. म्हणजे जुगार खेळण्यासाठी आता कोणत्याही अड्ड्यावर किंवा क्लबवर जाण्याची गरज नाही. घरबसल्या ऑनलाईन जुगार खेळता येतो आणि त्याचे डिजिटल पद्धतीने पेमेंटही होते. यातून विकसित होत असलेले हे धोके वेळीच लक्षात घेतले पाहिजेत.

## सुविचार


**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

**स्तुतीत लपलेलं खोटं आणि टिकेत लपलेलं सत्य
ज्याला कळालं त्यालाच चांगल्या आणि वाईटाची ओळख आपोआप समजते.**

## पंचांग

**शुक्रवार, १ ऑगस्ट २०२५**
**शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर**

**श्रावण शुक्ल अष्टमी**
**नक्षत्र : स्वाती**



**रवी उदय- ०६-१७**
**रवी अस्त- १९-१३**

**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० तूळ**

**दुर्गाष्टमी, दुर्वाष्टमी; जरा जिवंतिका पूजन; वनमहोत्सव दिन, लोकमान्य टिळक पुण्यतिथी, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जन्मदिन**

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)


संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः navakal.1923@gmail.com
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती



### साबुदाणा रबडी



★ **साहित्य :-**
१ कप साबुदाणा, १ लिटर फुल-क्रीम दूध, १-२ चमचे तूप, अर्धा कप साखर, ५-१० बदाम, ८-१० मनुके, ८-१० काजू, १ टीस्पून हिरवी वेलची पावडर, २-३ केसरचे धागे

★ **कृती :-**
साबुदाणा स्वच्छ पाण्यात धुवून १५ मिनिटे भिजवा., चिकटू नये म्हणून गाळून घ्या आणि प्लेटवर पसरवा. एका पॅनमध्ये दूध उकळवा, नंतर त्याचे प्रमाण निम्मे करा. दुधात साबुदाणा घाला आणि ५-७ मिनिटे वारंवार ढवळत राहा, जोपर्यंत ते रबडीसारखे घट्ट होत नाही तोपर्यंत शिजवा. साखर आणि बारीक चिरलेली सुकी मेवे मिसळा. साबुदाणा पूर्णपणे शिजला आहे याची खात्री करा; आवश्यक असल्यास कमी आचेवर जास्त वेळ शिजवा. वेलची पावडर आणि केशर घाला, नंतर गॅस बंद करा. चवीसाठी, सुके मेवे घालण्यापूर्वी तुपात हलके तळा.वाढण्यापूर्वी फ्रीजमध्ये थंड करा.





# १९ वर्षांखालील भारतीय क्रिकेट संघ जाहीर २१ सप्टेंबरपासून ऑस्ट्रेलियाचा दौरा सुरु

**१४ वर्षीय युवा फलंदाज वैभव सूर्यवंशीचा ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी १९ वर्षांखालील भारताच्या संघात समावेश करण्यात आला.भारत-ऑस्ट्रेलियाच्या १९ वर्षांखालील संघांत २१ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या ३ एकदिवसीय आणि २ कसोटी सामने खेळवले जातील.**

■ मुंबई

वैभवने यापूर्वी भारतात ऑस्ट्रेलियाविरुद्ध कसोटी मालिका खेळली आहे आणि इंग्लंड दौऱ्यावरही त्याने शानदार कामगिरी केली.इंग्लंडमध्ये त्याने ५ एकदिवसीय सामन्यांमध्ये ३५५ धावा केल्या. ज्यामध्ये एका शतकाचा समावेश होता.वैभवने ५२ चेंडूत शतक ठोकून एक विक्रमही केला. भारताच्या १९ वर्षांखालील संघ विरुद्ध ऑस्ट्रेलियाच्या १९ वर्षांखालील संघ यांच्यातील पहिला एकदिवसीय सामना २१ सप्टेंबरला खेळला जाईल.मालिकेतील दुसरा एकदिवसीय सामना २४ सप्टेंबरला आणि तिसरा एकदिवसीय सामना २६ सप्टेंबर रोजी खेळला जाईल.त्यानंतर दोन्ही संघ २ कसोटी सामन्यांच्या मालिकेत भिडतील.मालिकेतील पहिला चार दिवसांचा कसोटी सामना ३० सप्टेंबर ते ३ ऑक्टोबर दरम्यान खेळला जाईल. दुसरा आणि शेवटचा कसोटी सामना ७ ऑक्टोबर ते १० ऑक्टोबर दरम्यान खेळला जाईल.तिन्ही एकदिवसीय सामने नॉर्थम्प्टनशायर येथे खेळले जातील तर पहिली कसोटी देखील त्याच ठिकाणी खेळली जाईल, तर दुसरी कसोटी मॅके येथे होईल.



**भारताचा अंडर-१९ संघ :**

आयुष म्हात्रे(कर्णधार), विहान मल्होत्रा (उपकर्णधार), वैभव सूर्यवंशी, वेदांत त्रिवेदी, राहुल कुमार, अभिज्ञान कुंडू (यष्टीरक्षक), हरवंश सिंग (यष्टीरक्षक), आरएस अम्ब्रिस, कनिष्क चौहान, नमन पुष्पक, हेनिल पटेल, डी दीपेश, किशन कुमार,अनमोलजीत सिंग, खिलन पटेल, अमान मोहन. स्टँडबाय खेळाडू:युधाजित गुहा, लक्ष्मण, बीके किशोर, अलंकृत रापोल, अर्णब बुग्गा.

## भारताचा बॅडमिंटनपटू लक्ष्य सेनची आगेकूच

■ मकाऊ

मकाऊ ओपन बीडब्ल्यूएफ सुपर ३०० बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष एकेरी गटात भारताच्या लक्ष्य सेनने सिंगापूरच्या वॉर्डोयोचा १४-२१, २१-१४ आणि १७-२१ असा पराभव करत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश मिळवला. भारताच्या तरुण मन्नेपल्लीने देखील उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली आहे.त्याने सीवाय लीवर २१-१९, १४-२१ आणि २०-२२ असा विजय संपादित केला. भारताच्या ए. शेट्टीला पराभवाचा सामना करावा लागला. जे.होहने त्याला १८-२१, १६-२१ अशी मात दिले.

## झिम्बाब्वे कसोटी संघात ब्रेंडन टेलर परतला

■ हरारे

आयसीसीच्या भ्रष्टाचार विरोधी आणि डोपिंग विरोधी नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल साडेतीन वर्षांच्या निलंबनाची शिक्षा पूर्ण केल्यानंतर ३९ वर्षीय ब्रेंडन टेलर झिम्बाब्वे कसोटी संघात परतला. त्याने भारतीय व्यावसायिकाने २०१९ मध्ये दिलेल्या स्पॉट-फिक्सिंगच्या ऑफरची माहिती वेळेत दिली नव्हती. त्यामुळे जानेवारी २०२२ मध्ये बंदी घालण्यात आलेल्या टेलरला ७ ते ११ ऑगस्टदरम्यान बुलावायो येथील क्वीन्स स्पोर्ट्स क्लब येथे होणाऱ्या न्यूझीलंडविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यासाठी झिम्बाब्वे संघात समाविष्ट करण्यात आले. त्यावेळी टेलरला कोकेनच्या सेवनाशी संबंधित डोप चाचणीत अपयशी ठरल्याबद्दल एक महिन्याची निलंबनाची शिक्षाही देण्यात आली होती.२०१९मध्ये कोकेनच्या सेवनाशी संबंधित असलेल्या डोप चाचणीत दोषी ठरल्यामुळे त्याला एक महिन्याची निलंबनाची शिक्षा सुनावण्यात आली होती. शिक्षेपूर्वी तो रेड-बॉल क्रिकेटमध्ये चांगल्या फॉर्ममध्ये होता. त्याने शेवटच्या ३ कसोटी डावात ९२, ८१ आणि ४९ धावा केल्या होत्या.



## भरत अरुण एलएसजीच्या गोलंदाजी प्रशिक्षकपदी सामील

■ लखनौ

कोलकाता नाईट रायडर्सशी संबंध तोडणारे भारताचे माजी गोलंदाजी प्रशिक्षक भरत अरुण यांना लखनौ सुपर जायंट्सने (एलएसजी) त्याच पदावर नियुक्त केले. अधिकृत घोषणा होण्याची वाट पाहत असली तरी अरुण एलएसजीत सामील झाले आणि लवकरच औपचारिक घोषणा अपेक्षित असल्याचे फ्रँचायझीच्या जवळच्या सुत्राने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले. अरुण गेल्या काही वर्षांपासून केकेआरशी संबंधित होते.परंतु २०२५ मध्ये आठव्या स्थानावर खराब कामगिरी केल्यानंतर शाहरुख खान या मालकीच्या फ्रँचायझी प्रशिक्षक स्टाफमध्ये फेरबदल करण्याच्या प्रक्रियेत आहे. त्यामुळे चंद्रकांत पंडीत आणि अरुण हे दोन्ही अनुभवी खेळाडू वेगळे झाले.त्याप्रमाणे गेल्या आवृत्तीत सातव्या स्थानावर राहिलेल्यानंतर एलएसजी देखील त्यांच्या सपोर्ट स्टाफमध्ये बदल करत आहे.



## राज्यस्तरीय कबड्डी पंच शिबीर आजपासून रत्नागिरीत होणार

■ मुंबई

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिशनच्या मान्यतेने रत्नागिरी जिल्हा कबड्डी असोसिएशन व रत्नागिरी तालुका हौशी कबड्डी असोसिएशन यांच्या विद्यमाने राज्यस्तरीय श्रेणी कबड्डी पंच शिबिराचे आयोजन करण्यात आले. रत्नागिरीतील नाचणे रोड येथील दैवज्ञ भवन येथे १ ते ३ ऑगस्ट या कालावधीत घेण्यात आले.

या शिबिरात पुरुषोत्तम प्रभू हे शारीरिक तंदुरुस्तीवर,डॉ. वीणा शेलटकर(खवळे) या पंचांचा आहार व प्रथमोपचार आणि आकाश राठोड हे मानसोपचार, एकाग्रता आणि संतुलन यावर मार्गदर्शन करणार आहेत. त्यासोबत मिनानाथ धानजी, सदानंद माजलकर, डॉ.माधव शेजूळ,प्रा.नवनाथ लोखंडे, दत्ता झिजुर्डे, मालोजी भोसले, शशिकांत राऊत हे नियमांची उजळणी, शिट्टीचे प्रकार व सिंग्नलिग,बाद व साखळी पद्धतच्या सामन्यांची भाग्यपत्रिका कशी तयार करावी?, निर्णयावर समज-गैरसमज, पंचांच्या निर्णयाबाबत शंका कुशंका, सामनाधिकाऱ्यांचे कार्य व कर्तव्य,शंका निरसन यावर मार्गदर्शन करतील.

## आशियाई बॉक्सिंग स्पर्धेसाठी भारताचे ४० खेळाडू जाहीर

■ नवी दिल्ली

बँकॉकमध्ये होणाऱ्या १९ आणि २२ वर्षांखालील आशियाई बॉक्सिंग चॅम्पियनशिपसाठी भारताने ४० सदस्यांचा संघ जाहीर केला.२६ देशांतील ३९६ बॉक्सरचा सहभाग असणारी ही स्पर्धा आशियाई बॉक्सिंग, वर्ल्ड बॉक्सिंग आणि थायलंड बॉक्सिंग असोसिएशनच्या सहकार्याने आयोजित केली.यामध्ये १९ वर्षांखालील (२००७ ते २००८दरम्यान जन्मलेले) आणि २२ वर्षांखालील (२००४ ते २००६ दरम्यान जन्मलेले)असे २ वयोगटातील खेळाडू सहभागी होतील आणि ऑलिम्पिक शैलीतील बॉक्सिंग नियमांनुसार पुरुष आणि महिला दोन्ही संघ स्पर्धा करतील.भारतीय संघात दोन्ही विभागांत प्रतिभेचे उत्तम मिश्रण आहे. तीन वेळा आशियाई चॅम्पियन आणि दोन वेळा राष्ट्रीय चॅम्पियन विश्वनाथ सुरेश हे या संघाचे नेतृत्व करत आहेत.

## भारतीय फुटबॉल संघ ताजिकिस्तानशी भिडणार

■ नवी दिल्ली

नेशन्स फुटबॉल करंडक २९ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर या कालावधीत खेळवण्यात येणार आहे.या स्पर्धेच्या ब गटात भारतीय संघाचा समावेश असून या गटामध्ये ताजिकिस्तान, इराण आणि अफगाणिस्तान या तीन देशांशी भारताला दोन हात करावे लागणार आहेत. भारताचा सलामीचा सामना ताजिकिस्तानशी होणार आहे.ही लढत २९ ऑगस्टला होणार आहे.

एएफसी आशियाई चषक पात्रता फेरीआधी भारतीय फुटबॉल संघाला या स्पर्धेद्वारे कसून सराव करता येणार आहे. भारताचा सलामीचा सामना ताजिकिस्तानशी झाल्यानंतर त्यांना १ सप्टेंबर रोजी इराणशी लढावे लागणार आहे. भारताचा सामना ४ सप्टेंबर रोजी अफगाणिस्तानशी होईल. अ अ गटात उझबेकिस्तान, किर्गिस्तान, तुर्कमेनिस्तान, ओमान या देशांचा समावेश करण्यात आला आहे. अ आणि ब अशा दोन गटात साखळी फेरीच्या लढती पार पाडणार आहेत.गटातील अव्वल दोन देश प्लेआफमध्ये पोहोचणार अ व ब या दोन गटातून अव्वल दोन देश प्लेआफसाठी पात्र ठरणार आहे.



## यंग इंडिया मिनिथॉन शर्यतीच्या अधिकृत टी-शर्टचे अनावरण

■ ठाणे

ॲथलिड्स तर्फे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सहकार्याने ३ ऑगस्ट रोजी लघु पल्ल्याच्या यंग इंडिया मिनिथॉन शर्यतीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ठाण्याचे माजी महापौर संजय शिंदे यांच्या हस्ते या शर्यतींच्या अधिकृत टी शर्टचे अनावरण केले.२ लाख रुपयांची रोख बक्षिसे असलेल्या या स्पर्धेत १२ वर्षांखालील मुले-मुलींकरिता २ किलोमीटर,१५ वर्षाखालील मुले, मुलींसाठी ३ किलोमीटर अंतराची शर्यत ठाणे जिल्हास्तरीय असणार आहे. ठाण्यातील शाळांमधून येणाऱ्या १२,१५ आणि १९ वर्ष वयोगटाच्या धावपटूंना मोफत देण्यात आला आहे.४५ वर्षावरील गटाची ३ किलोमीटर अंतराची शर्यत सर्वासाठी खुली आहे. १९ वर्षाखालील मुले, मुलीकरिता ५ किलोमीटर आणि खुल्या गटाकरिता ७.१ किलोमीटर अंतराची शर्यतही सर्वासाठी आहे.

## ३८व्या राष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धा जळगावात उद्यापासून होणार

■ जळगाव

जळगाव येथे ३८ व्या राष्ट्रीय बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन २ ते ८ ऑगस्ट २०२५ दरम्यान जळगावच्या जैन हिल्स परिसरातील आकाश ग्राऊंडमध्ये होणार आहे.बाल चमूंचा हा बुद्धिबळ महासंग्राम जळगाव जिल्हा बुद्धिबळ असोसिएशन आणि जैन स्पोर्ट्स अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने आणि महाराष्ट्र राज्य बुद्धिबळ संघटनेच्या मान्यतेने व अखिल भारतीय बुद्धिबळ महासंघ यांच्या मार्गदर्शनात होणार आहे. यातील फिडे मानांकन प्राप्त ४०० खेळाडूंचा समावेश आहे. ही बुद्धिबळ अजिंक्य स्पर्धेत एकूण ११ फेऱ्या होणार असून आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ महासंघाने आखलेल्या नियमावलीनुसार ही स्पर्धा पार पडेल.

# जालनात महापौर भाजपचाच कैलास गोरंट्यालांचा दावा

■ जालना

**आगामी** काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मराठवाड्यात काँग्रेसला धक्का बसला आहे. जालना जिल्ह्यातील काँग्रेसचे माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी आज भाजपात प्रवेश केला. जालना महानगरपालिकेची स्थापना झाल्यानंतर ही पहिलीच निवडणूक असणार आहे.

या निवडणुकीत जालना मनपावर पहिला महापौर भाजपाचाच असेल असा दावा कैलास गोरंट्याल यांनी केला आहे. गोरंट्याल यांच्या प्रवेशप्रसंगी भाजपाचे



प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि खासदार अशोक चव्हाण हेही उपस्थित होते. पक्ष जो आदेश देईल, तो मी काटेकोरपणे पाळणार आहे. भाजपामध्ये प्रवेशाचा विचार अनेक वर्षांपासून सुरू होता. आज योग्य मुहूर्त मिळाला.

# औसामध्ये शासकीय रुग्णवाहिकेला आग

■ लातूर

**लातूरच्या** औसा येथील ग्रामीण रुग्णालयाच्या शासकीय रुग्णवाहिकेला आज अचानक आग लागली. या आगीत संपूर्ण रुग्णवाहिका जळून खाक झाली. रुग्णालयाच्या आवारातच ही आग लागल्याने काही काळ परिसरात भीतीचे वातावरण होते.

रुग्णवाहिकेतून अचानक धुराचे लोट दिसून आल्याने चालकाने तत्काळ घटनेची माहिती अग्निशमन विभागाला दिली. काही वेळातच अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी आगीवर नियंत्रण मिळवले.या आगीत रुग्णवाहिकेचे १०० टक्के नुकसान झाले असले तरी सुदैवाने कुठलीही जीवितहानी झाली नाही.

# म्हाडाच्या संक्रमण शिबिरांवर तिसऱ्या डोळ्याची नजर

■ मुंबई

**म्हाडाच्या** मालकीच्या संक्रमण शिबिरातून होणाऱ्या घुसखोरीला रोखण्यासाठी म्हाडाने उशीरा का होईना आता रामबाण उपाय शोधला आहे. शिबिरांतील घरांच्या सुरक्षेसाठी सीसीटिव्ही कॅमेरे बसविले जाणार आहेत. अशी माहिती एका वरिष्ठ अधिकाऱ्यांने दिली. मुंबईसह उपनगरात विविध ठिकाणी म्हाडाची अंदाजे ५२ संक्रमण शिबिराच्या इमारती आहेत. यामध्ये सद्यस्थितीत जवळपास २० हजार खोल्या आहेत. यापूर्वी काही खोल्यांमधून मोठ्या प्रमाणात घुसखोरी झाल्या आहेत. काही घुसखोरांनी परस्पर संक्रमण शिबिरातील खोल्या विकल्याच्या घटना समोर आल्या आहेत. मात्र अशा घुसखोरांची ओळख पटवून घराबाहेर काढणे कठीण होते. असे सांगून म्हाडा मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातील अधिकारी पुढे म्हणाला म्हाडाच्या परवानगी शिवाय संक्रमण शिबिरातील खोल्यांमध्ये कुणी वास्तव्यास आला आहे का? कुणी घुसखोरी केली आहे का? यावर सीसी टिव्हीच्या कॅमेऱ्यांच्या माध्यमातून लक्ष ठेवणे सोपे होईल.

# भंडारा जिल्हा बँक निवडणूक महायुतीची एकहाती सत्ता

■ भंडारा

**तब्बल** ९ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर पार पडलेल्या भंडारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत महायुतीने एकहाती सत्ता मिळवली आहे. न्यायालयीन प्रक्रियेमुळे रखडलेल्या सहा जागांचे निकाल आज जाहीर करण्यात आले आणि या सहाही जागांवर महायुतीने बाजी मारली.

या निवडणुकीतील पहिल्या टप्प्यात दोन दिवसांपूर्वी १५ जागांचे निकाल जाहीर झाले होते. त्यामध्ये महायुतीने ११ जागांवर विजय मिळवला होता, तर काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या नेतृत्वाखालील परिवर्तन पॅनलला केवळ ४ जागांवर समाधान मानावे लागले होते. आज जाहीर झालेल्या सहा निकालांमध्ये अजित पवार गटाचे माजी राज्यमंत्री आणि भंडारा जिल्हाध्यक्ष नाना पंचबुद्धे यांनीही मोठ्या मताधिक्क्याने विजय मिळवला आहे. या निकालामुळे भंडारा जिल्हा सहकारी बँकेवर महायुतीचे पूर्ण वर्चस्व प्रस्थापित झाला असून, परिवर्तन पॅनलला मोठा धक्का बसला आहे.

# राष्ट्रवादीचे नेते गरुड यांच्या घराबाहेर जादूटोण्याचा प्रकार

■ पुणे

**पुण्यातील** तळेगाव दाभाडे येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे (सामाजिक न्याय विभाग) जिल्हाध्यक्ष सुहास गरुड यांच्या घराबाहेर एका महिलेने जादूटोण्याचा प्रकार केल्याचे उघडकीस आले आहे. या घटनेचा व्हिडीओ सध्या समाज माध्यमांवर फिरत असून चर्चेचा विषय ठरला आहे. या प्रकारानंतर गरुड यांनी पोलीस संरक्षणाची मागणी केली असून यासंदर्भात एक लेखी अर्ज तळेगाव पोलिसात दिला आहे.

मी समाजासाठी इनाम जमीन प्रकरणातील जुन्या केस पुन्हा सुरू केल्या आहेत. त्यामुळे रागातून माझ्या राहत्या घरासमोर जादूटोण्याचा प्रकार करण्यात आला. ही घटना २९ जुलै रोजी रात्री १० ते १०.३० च्या सुमारास घडली. सीसीटीव्ही फुटेजमध्ये एक महिला साडी परिधान करून घराच्या प्रवेशद्वाराच्या आत आलेली

**व्हिडीओ व्हायरल**

दिसत आहे. ती हळदी-कुंकू लावलेला लिंबू व इतर वस्तू गाडीवर फेकून पळून जाताना दिसत आहे. या महिलेची ओळख पटली असून तिचे नाव कमल पांडुरंग भेगडे असे आहे. ती जीवन पांडुरंग भेगडे या गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तीची आई आहे. जीवन याने ७ वर्षांची कारावासाची शिक्षा भोगली आहे. या प्रकारामुळे माझ्या व माझ्या कुटुंबाच्या जीवाला धोका आहे. त्यामुळे पोलीस प्रशासनाने आम्हाला तत्काळ संरक्षण द्यावे. तसेच कमल व तिच्या कुटुंबावर गुन्हा दाखल करावा. भविष्यात माझ्या किंवा माझ्या कुटुंबियांच्या जीवाला काही झाले, तर कमल व तिच्या कुटुंबाला जबाबदार धरावे, असे या अर्जात म्हटले आहे. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

# शिराळा तालुक्यातील जीर्ण पूल अचानक कोसळला

■ शिराळा

**तालुक्यातील** करुंगली-गुंडगेवाडीला जोडणारा डाव्या कालव्यावरील पूल जीर्ण झाल्याने अचानक कोसळला. गेल्या महिनाभरापासून हा पूल वाहतुकीसाठी बंद केल्यामुळे मोठा अनर्थ टळला.



वारणा डाव्या कालव्यावरील या पुलामुळे करुंगली - गुंडगेवाडी, खोतवाडी गावे जोडली गेली होती. गेल्या महिन्यात हा पूल धोकादायक झाला होता. त्यामुळे दुर्घटना घडण्याची शक्यता होती. या बातम्या काही स्थानिक वृत्तपत्रातून प्रसिद्ध झाल्यानंतर संबंधित विभागाने हा पूल वाहतुकीसाठी बंद केला होता. त्यानंतर हा पूल कोसळल्याची घटना घडली आहे. हा पूल कोसळल्यामुळे वरील अनेक वाड्या-वस्त्यांचा संपर्क तुटला आहे. या गावांना जोडणाऱ्या पर्यायी पुलाची व्यवस्था तातडीने करावी, अशी मागणी ग्रामस्थांमधून होत आहे.

# मुंबई विमानतळावर ८ कोटींचा गांजा जप्त

■ मुंबई

**मुंबईतील** छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमाशुल्क (कस्टम) विभागाच्या अधिकाऱ्यांनी ८ कोटी रुपयांचा गांजा जप्त केला. ही कारवाई काल आणि आज करण्यात आली. यात ४ आरोपींना अटक करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर बँकॉकहून आलेल्या विमानात तीन संशयास्पद प्रवाशांना सीमाशुल्क अधिकाऱ्यांनी थांबवले होते. त्यांच्या सामानाची झडती घेतली असता, १.९९० किलो गांजा आढळला.याची किंमत बाजारात सुमारे २ कोटी रुपये आहे. मुंबई विमानतळावर आज ही बँकॉकहून विमान आले होते. यातील एका प्रवाशाकडून ६.२२ किलो गांजा जप्त करण्यात आला. याची बाजार किंमत ६ कोटी रुपये आहे. याबाबत पोलिसांनी सांगितले की, आरोपींनी हे गांजाचे पाकीट काळ्या आणि पारदर्शक व्हॅक्यूम सीलबंद पाकिटामध्ये टाकून ते ट्रॉली बॅगमध्ये लपवले होते. या संशयित प्रवाशांना एनडीपीएस कलम, १९८५ अंतर्गत अटक करण्यात आली असून पुढील कारवाई सुरू करण्यात आली आहे.

# उपराष्ट्रपतीच्या निवडणुकीसाठी इलेक्टोरल कॉलेजची तयारी पूर्ण

■ नवी दिल्ली

**उप राष्ट्रपती** जगदिप धनखड यांच्या तडकाफडकी राजानाम्यानंतर नव्या उप राष्ट्रपतींच्या निवडीसाठी निवडणूक प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यासाठी इलेक्टोरल कॉलेजची तयारी पूर्ण झाल्याची माहिती आज निवडणूक आयोगाने एक्स पोस्टद्वारे दिली. या पोस्टनंतर उपराष्ट्रपती निवडणुकीच्या प्रक्रियेला औपचारिक गती मिळाली आहे लवकरच निवडणुकीची अधिसूचना जारी होण्याची शक्यता आहे.काही दिवसांपूर्वी उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी प्रकृती अस्वास्थ्याच्या कारणास्तव पदाचा राजीनामा दिला. त्यांच्या राजीनाम्यानंतर केवळ काही दिवसांत आयोगाने निवडणूक प्रक्रियेची तयारी पूर्ण केली. उपराष्ट्रपतीपदासाठी होणाऱ्या निवडणुकीत लोकसभा व राज्यसभा सदस्य, राज्यसभेतील नामनिर्देशित सदस्य मतदार सहभागी असतात. आयोगाने यादी अद्ययावत करून राज्य आणि केंद्रशासित प्रदेशानुसार क्रमबद्ध स्वरूपात अंतिम रूपात तयार केली आहे. निवडणूक आयोगाकडून लवकरच निवडणुकीची अधिसूचना जाहीर होणार आहे. त्यानंतर उमेदवारी अर्ज दाखल करणे, छाननी आणि मतदानाच्या तारखा जाहीर होतील.

# विद्यार्थ्याचे हस्ताक्षर खराब संतप्त शिक्षिकेकडून चटके

■ मुंबई

**मालाड** पूर्वमधील एका खाजगी क्लासमध्ये आठ वर्षांच्या विद्यार्थ्याला केवळ हस्ताक्षर खराब असल्याच्या कारणावरून शिक्षिकेकडून मेणबत्तीचे चटके दिल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. या प्रकरणी संबंधित शिक्षिकेविरोधात कुरार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

पिंपरी पाडा येथे राहणाऱ्या ५० वर्षीय व्यक्तींच्या आठ वर्षांच्या मुलासोबत हा प्रकार घडला. संबंधित मुलगा मालाड पूर्वेतील एका खाजगी क्लासमध्ये जात होता.मंगळवारी रात्री ९ वाजताच्या सुमारास शिक्षिकेने तक्रारदाराला फोन करून क्लास संपला आहे, मुलाला घेऊन जा असे सांगितले. त्याचबरोबर मुलगा सतत रडत असल्याचे सांगितले. तक्रारदाराच्या मोठ्या मुलीने क्लासमध्ये जाऊन त्याला घरी आणले. त्यानंतर आईने त्या मुलाचे हात पाहिल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. मुलाने आईला सांगितले की, क्लासमध्ये हस्ताक्षर चांगले नसल्याच्या कारणाने शिक्षिकेने आधी मारले आणि हातावर मेणबत्तीचे चटके दिले.

# नवी मुंबई महापालिकेवर शरद पवार गटाचा मोर्चा

■ मुंबई

**नवी** मुंबईतील प्रकल्पग्रस्तांची फसवणूक आणि सिडकोच्या महागड्या गृहनिर्माण योजनेविरोधात शरद पवार गटाने आज नवी मुंबई महानगरपालिका आणि सिडको मुख्यालयावर धडक मोर्चा काढला. या मोर्चाचे नेतृत्व प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी केले.

सीवूड्स सेक्टर ५० येथील गंगारामशेठ तांडेल चौकातून सुरू झालेला मोर्चा सिडको आणि महापालिका मुख्यालयावर जाऊन धडकला. मोर्चात मोठ्या संख्येने स्थानिक प्रकल्पग्रस्त, माथाडी कामगार, अल्प उत्पन्न गटातील नागरिक आणि झोपडपट्टीवासी सहभागी झाले होते. नवी मुंबईत सरकारकडून प्रकल्पग्रस्तांची फसवणूक केली जात आहे. सिडकोने २६ हजार घरांची लॉटरी काढली. मात्र त्या घरांची किंमत भरमसाठ असल्यामुळे सर्वसामान्यांना घर घेणे शक्य नाही. झोपडपट्टीवासीयांना वाढीव बांधकामप्रकरणी सिडको व नवी मुंबई महापालिकेने नोटीस बजावली आहे, ती चुकीची आहे, असा आरोप आंदोलकांनी केला.

# तुळजाई मासेमारी बोटीचे अवशेष सासवणे किनाऱ्यावर आढळले

■ उरण

**उरण** तालुक्यातील करंजा बंदरातून समुद्रात निघालेली तुळजाई ही मच्छीमार बोट २६ जुलै रोजी सकाळी बुडाल्यानंतर दोन दिवसांनी तिचे अवशेष सासवणे किनाऱ्यावर आढळून आले. या दुर्घटनेने बेकायदेशीर मासेमारी, प्रशासनाचे दुर्लक्ष आणि मासेमारांच्या सुरक्षेतील हलगर्जीपणा यावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. खांदेरी किल्ल्याजवळ भरतीच्या प्रचंड लाटांमुळे तुळजाई बोट दोन भागांत तुटली आणि समुद्रात बुडाली. बोटीवर आठ खलाशी होते. त्यापैकी पाच जण डेकवर होते त्यांनी समुद्रात उड्या घेऊन लाटांशी झुंज देत आपले प्राण वाचवले. मात्र, केबिनमध्ये अडकलेले नरेश शेलार, धीरज कोळी आणि मुकेश पाटील या तिघांचा मृत्यू झाला. दुर्घटनेनंतर तुळजाई बोटीचा एक तुकडा सासवणे किनाऱ्यावर वाहून आला. त्या अवस्थेवरून बोट आणि त्यावरील खलाश्यांनी कोणत्या भीषण प्रसंगाला सामोरे जावे लागले असेल, याचा अंदाज येतो.

# थेट निलंबनास राजपत्रित अधिकारी महासंघाचा विरोध

■ मुंबई

**राजपत्रित** अधिकारी महासंघाने राज्यात विविध विभागांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या विनाचौकशी होणाऱ्या निलंबनास विरोध दर्शविला. ज्यांच्यावर कारवाई करायची आहे, त्यांना भूमिका मांडण्याची संधी दिली पाहिजे, अशी मागणी संघटनेने मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री आणि मुख्य सचिवांकडे केली. विधिमंडळाच्या नुकत्याच झालेल्या अधिवेशनात विरोधी, सत्ताधारी आमदारांनी अधिकाऱ्यांच्या गैरव्यवहार, घोटाळे, शिस्तभंगाची विविध प्रकरणे उपस्थित केली होती. काही जणांनी गैरव्यवहाराचे पुरावेही सादर केले. यापूर्वी चौकशीतील निष्कर्षांचे हवालेही दिले. त्यातील काही प्रकरणावर शासनाची बाजू मांडताना मंत्र्यांनी ११ अधिकारी, कर्मचाऱ्यांना निलंबित करण्याची घोषणा केली.

# गणेशोत्सवासाठी मध्य रेल्वेच्या ४४ अतिरिक्त विशेष गाड्या

**दिवा-चिपळूण-दिवा मेमूच्या आणखी २ सेवा**

■ मुंबई

**गणपती- गौरी** सणानिमित्त कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांसाठी मध्य रेल्वे अतिरिक्त विशेष २५० गणपती ट्रेनव्यतिरिक्त आणखी ४४ विशेष ट्रेन चालवणार आहे. दिवा-चिपळूण-दिवा मेमू दैनिक अनारक्षित विशेष ट्रेनच्या आणखी २ सेवा चालवण्यात येणार आहेत. त्यामुळे गणेशोत्सव काळात २९६ विशेष ट्रेन गणेशभक्तांच्या सेवेत धावणार आहेत. लोकमान्य टिळक टर्मिनस-सावंतवाडी रोड-लोकमान्य टिळक टर्मिनस द्वैसाप्ताहिक विशेष ट्रेनच्या एकूण ८ सेवा चालविण्यात येणार आहेत. ही ट्रेन २८ ऑगस्ट,३१ ऑगस्ट, ४ सप्टेंबर व ७ सप्टेंबर रोजी लोकमान्य टिळक टर्मिनस येथून सकाळी ८.४५ वाजता सुटेल आणि त्याच दिवशी रात्री १०.२० वाजता सावंतवाडी येथे पोहोचेल.या गाडीच्या ४ सेवा चालविण्यात येतील. ही गाडी परतीच्या प्रवासात २८ ऑगस्ट,३१ ऑगस्ट, ४ सप्टेंबर आणि ७ सप्टेंबर रोजी सावंतवाडी येथून रात्री ११.२० वाजता सुटेल व दुसऱ्या दिवशी दुपारी १२.३० वाजता लोकमान्य टिळक टर्मिनस येथे



पोहचणाऱ्या या गाडीचे आरक्षण ३ ऑगस्टपासून होईल. दैनिक अनारक्षित विशेष ट्रेनच्या २ अतिरिक्त फेऱ्या चालवण्यात येणार आहेत. दिवा-चिपळूण विशेष ट्रेनची १ फेरी आणि चिपळूण-दिवा विशेष ट्रेनची १ फेरी वाढवली आहे.

# विद्याविहार उड्डाणपुलाचे काम पुढील वर्षाअखेरीस पूर्ण करणार

**पालिका अतिरिक्त आयुक्तांची माहिती**

■ मुंबई

**पूर्व** उपनगरातील विद्याविहार रेल्वे स्थानकावरून जाणारा पूर्व आणि पश्चिम यांना जोडणारा उड्डाणपूल उभारण्याचे काम महापालिकेच्यावतीने सुरू आहे.हे संपूर्ण काम पुढच्या वर्षी ३१ मे २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. तरीही या पुलाच्या पूर्व बाजूकडील सर्व कामे ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. तसेच प्रकल्पामुळे बाधित नागरिकांना पर्यायी घरे दिली जाणार आहेत,अशी माहिती अतिरिक्त



पालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर यांनी दिली.

बांगर यांनी नुकताच या प्रकल्प कामाचा पालिका मुख्यालयातील बैठकीत आढावा घेतला, त्यावेळी अतिरिक्त आयुक्त अभिजीत बांगर यांनी सांगितले की, पश्चिम बाजूकडील बाधित बांधकामांची पुनर्वसन प्रक्रिया पूर्ण करून पावसाळ्यानंतर पाडली जातील.त्यानंतर,पुढील ५ महिन्यांत पुलाची उर्वरित कामे जलद गतीने मार्गी लागतील. प्रकल्पामुळे बाधित व्यक्तींचे पर्यायी घरे देऊन पुनर्वसन केले जाईल. त्यासाठी कालमर्यादा निश्चित करावी,असे स्पष्ट निर्देश दिले आहेत.'एन' विभाग हद्दीत, घाटकोपर परिसरात पूर्वेकडील रामचंद्र चेंबूरकर मार्ग आणि पश्चिमेकडील लालबहादूर शास्त्री मार्ग यांना जोडण्यासाठी विद्याविहार रेल्वे स्थानक रुळांवरून जाणारा उड्डाणपूल पालिकेच्या पूल विभागाच्यावतीने बांधण्यात येत आहे.

# अमरावतीत जागेच्या वादातून महिलेला जबर मारहाण

■ अमरावती

**अमरावतीतील** वलगाव पोलीस स्थानकाच्या हद्दीतील विर्शी गावामध्ये गावातील जागेच्या वादातून एका महिलेला ३ व्यक्तींनी जबर मारहाण केली. शारदा बाभुळकर असे पीडित महिलेचे नाव आहे. गावातील जागेच्या वादातून शारदा यांची ३ पुरुषांसोबत बाचाबाची झाली. त्यानंतर हा वाद वाढून हाणामारीला सुरुवात झाली. यावेळी ३ पुरुषांनी शारदा यांना जबर मारहाण केली. या मारहाणीचा व्हिडिओ सध्या समाज माध्यमांवर व्हायरल होत आहे. या व्हिडिओत शारदा काठीने स्वत:चा बचाव करताना दिसत आहेत. तर, ३ पुरूष शारदा यांचे केस धरून त्यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करत आहेत. या प्रकरणी वलगाव पोलिसात ४ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# आजारी वृद्ध दाम्पत्याचे एकाच दिवशी निधन

■ चिपळूण

**चिपळूण** तालुक्यातील निवळी येथे एका आजारी असलेल्या वृद्ध दाम्पत्याने एकाच दिवशी प्राण सोडला. विशेष म्हणजे, या दोघांनी आपले अंतिम विधी चिपळूणमधील रामतीर्थ स्मशानभूमीत करावेत, असे आधीच लिहून ठेवले होते. त्यानुसार त्यांचे अंत्यसंस्कार करण्यात आले. मनोहर श्रीपतराव सुर्वे (९१) व संगीता मनोहर सुर्वे (८१) असे या वृद्ध पती-पत्नीचे नाव आहे. मनोहर यांनी १९९२ मध्ये रिझर्व्ह बँकेतून सेवानिवृत्ती घेतली होती. त्यानंतर ते आपल्या निवळी गावी आले. पती-पत्नीने निवळीमध्ये शेती व सामाजिक काम सुरू केले. मुलगा विनायक मुंबईमध्ये खासगी नोकरीत, तर दोन्ही मुली मिनाक्षी व नलिनी अविवाहित आहेत. काही दिवसांपासून हे दोघे आजारी होते. मुलगा महिन्यातून एक-दोनदा गावी येत असे. रविवारी विनायक यांची तब्येत खालावली व त्यांना एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले तर पत्नी संगीता यांनाही सावर्डे येथील एका रुग्णालयात दाखल करण्यात आले. पत्नीची प्रकृती नाजूक असल्याने त्यांना मुंबईला अधिक उपचारासाठी घेऊन जायचे ठरले. नातेवाईकांनी रुग्णवाहिकेची व्यवस्था केली होती आणि विनायक सावर्डे येथे येण्याची प्रतीक्षा सुरू होती; मात्र सकाळी सव्वा नऊ वाजता मनोहर यांचे निधन झाले. आपल्या पतीच्या निधनाचे वृत्त समजताच पत्नी संगिता यांना दुःख सहन न झाल्याने त्यांनीही दुपारी सव्वा बारा वाजता प्राण सोडला. दोघांच्या निधनाने सुर्वे कुटुंबियांवर शोककळा पसरली.

# पुण्यात मानाच्या मिरवणुकीत दोन गणपती मंडळांचा समावेश

■ पुणे

**गणेशोत्सवाच्या** पार्श्वभूमीवर पुण्यातील विसर्जन मिरवणुकीसंदर्भात गणेश मंडळांनी नियोजन सुरू केले आहे. यावर्षी मानाच्या पाच गणपतींनंतर आणखी दोन गणेशोत्सव मंडळांनीही मिरवणुकीत सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे.

यंदा अनंत चतुर्दशीच्या दिवशी पुण्यातील मानाचे पाच गणपतींची मिरवणूक मार्गस्थ झाल्यानंतर त्यांच्या मागे अखिल मंडई मंडळ आणि श्रीमंत भाऊसाहेब रंगारी या दोन गणेशोत्सव मंडळांनी सहभाग घेण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत संबंधित मंडळांच्या अध्यक्षांनी आज पत्रकार परिषद घेऊन माहिती दिली. अखिल मंडई मंडळाचे अध्यक्ष अण्णा थोरात म्हणाले की, ७ सप्टेंबर रोजी दुपारी १२.३७ वाजता चंद्रग्रहण सुरू होत असल्याने, त्या आधी म्हणजे दुपारी १२ वाजण्यापूर्वी सर्व मूर्तींचे विसर्जन पूर्ण होणे आवश्यक आहे. ग्रहणकाळ धार्मिकदृष्ट्या स्पर्शयोग्य नसल्यामुळे विसर्जन लवकर संपवण्यासाठी मंडळांनी एकत्र येत महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

# कोठडीतील मृत्यू रोखण्यासाठी कारागृहात पॅनिक बटण

■ मुंबई

**राज्यातील** कारागृहाच्या कोठडीत होणारे मृत्यू रोखण्यासाठी कारागृहात पॅनिक बटण बसवले जाणार आहे, अशी माहिती राज्य शासनाने उच्च न्यायालयात दिली. कोठडीतील मृत्यू रोखण्यासाठी राज्य शासनाने केलेल्या उपाययोजनांची माहिती सरकारी वकील मानपुंवर देशमुख यांनी मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे व न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठासमोर देत त्याचा अहवाल सादर केला.

या अहवालात कारागृहात बसवल्या जाणाऱ्या पॅनिक बटणचा तपशील देण्यात आला आहे. तसेच कोठडीतील मृत्यू रोखण्यासाठी करण्यात आलेल्या अन्य प्रतिबंधात्मक उपाययोजनांची सविस्तर माहिती दिली आहे. २००८ मध्ये कारागृहात कैद्यांना योग्य त्या सुविधा देण्यात याव्यात यासाठी एक फौजदारी जनहित याचिका दाखल झाली होती. या जनहित याचिकेची दखल घेत न्यायालयाने कैद्यांना पुरेशा सुविधा देण्याचे निर्देश राज्य शासनाला दिले होते. त्यानुसार हा अहवाल न्यायालयात सादर करण्यात आला. त्याची नोंद करून घेत न्यायालयाने ही फौजदारी जनहित याचिका निकाली काढली. कोठडीतील मृत्यूचा तपास योग्य प्रकारे केला जातो. तशा सूचना तपास अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. राज्यातील सर्व ६० कारागृहांत व पोलीस ठाण्यांत सीसीटीव्ही बसविले आहेत, असे सरकारी वकील देशमुख यांनी न्यायालयाला सांगितले.

# पालकांबाबत अश्लील वक्तव्यामुळे वादात सापडलेल्या रैनाचे पुनरागमन

■ मुंबई

**इंडियाज** गॉट लेटेंट या युट्यूब शोमध्ये पालकांबाबत केलेल्या अश्लील विधानामुळे अडचणीत सापडलेला युट्यूबर आणि स्टँड-अप कॉमेडियन समय रैना लवकरच नव्या शोसह भारतात पुनरागमन करत आहे. रैनाच्या शोमधील एका भागात सहभागी रणवीर अलाहाबादियाने पालकांबाबत केलेल्या अश्लील विधानामुळे प्रतिक्रिया उमटल्या होत्या.अनेक राज्यांमध्ये रैना, शोमधील इतर सहभागींच्या विरोधात तक्रारी दाखल करण्यात आल्या. या वादानंतर रैनाने भारतातील सर्व दौरे रद्द करून परदेशात कार्यक्रम सुरू केले. या निर्णयामुळे चाहते निराश झाले होते आणि त्याच्या पुनरागमनाची आतुरतेने वाट पाहत होते. अखेर त्याने समय रैना : स्टिल अलाइव्ह अँड अनफिल्टर्ड या नावाने भारतात पुन्हा शो करत असल्याची घोषणा केली.

# रवीच्या हुशार मुली



**बॉलीवूडचा** अभिनेता आणि भोजपुरी चित्रपटांचा राजा म्हणून ओळखला जाणारा अभिनेता रवी किशनला हिंदी चित्रपटसृष्टीने आतापर्यंत कधी फारसे गंभीर घेतले नाही. सुरुवातीच्या काळात तर गरीबांचा मिथुन चक्रवर्ती म्हणून त्याला अनेक लहान बजेटच्या सिनेमांमध्ये काम करावे लागले. त्यामुळेच तो कधी हिरो बनू शकला नाही. जेव्हा भोजपुरी सिनेमासृष्टीमध्ये मोठ्या प्रमाणावर चित्रपट बनू लागले, तेव्हा रवीने त्या सिनेमांना अधिक प्राधान्य दिले. रवी किशन एक चांगला अभिनेता आहे. मिळालेली भूमिका तो प्रामाणिकपणे करत असतो. गेल्या तीन–चार वर्षांत रवीला हिंदी चित्रपटांमध्ये देखील चांगल्या भूमिका मिळू लागल्या आहेत. 'लापता लेडीज' मधील त्याच्या अभिनयाची प्रशंसा झाली. आज प्रदर्शित होत असलेल्या 'सन ऑफ सरदार २' मध्ये देखील तो आहे. पण इथे त्याच्याविषयी नाही, तर त्याच्या मुलींविषयीची माहिती आम्ही शेअर करत आहोत. १९९३ साली विवाह झालेल्या रवीला तीन मुली आणि एक मुलगा आहे. त्याची मोठी मुलगी तनिष्का शुक्ला मार्केटिंग जगात नाव कमवत आहे. तर दुसरी मुलगी रिवाने वडिलांप्रमाणेच अभिनय क्षेत्राची निवड केली आहे. तिने २०२० मध्ये 'सब कुशल मंगल' या सिनेमाद्वारे चित्रपटक्षेत्रात पदार्पण केले आहे. रवीची तिसरी मुलगी इशिता शुक्ला देशसेवा करु इच्छिते. त्यामुळे ती एनसीसीमध्ये सहभागी झाली असून तिची स्निपर(गुप्तहेर नेमबाज) बनण्याची इच्छा आहे.

# राज का रागावला?



**माजी पती** अभिनेता नागा चैतन्यसोबत घटस्फोट घेतल्यानंतर अभिनेत्री सामंथा रुथ प्रभूचे नाव दिग्दर्शक राज निदिमोरूसोबत जोडले गेले आहे. नागा चैतन्य गेल्या वर्षी अभिनेत्री शोभिता धुलिपाला सोबत विवाहबद्ध झाला, परंतु सामंथा आणि राज यांच्या विवाहाविषयी कोणतीच घडामोड होताना दिसत नाही. याचे एक मुख्य कारण म्हणजे राज निदिमोरू आधीच विवाहित आहे. गेल्या काही काळामध्ये राज आणि सामंथा यांना अनेकदा एकत्र पाहण्यात आले आहे. कधी ही जोडी क्रीडा मैदानातील समारंभात एकत्र दिसली तर कधी मंदिरात. आता पुन्हा दोघांना एकमेकांसोबत बघण्यात आले आहे. परंतु यावेळी राज फार रागावलेल्या मूडमध्ये असल्याचे दिसून आले. झाले असे की, परवा रात्री सामंथा रुथ प्रभू आणि राज निदिमोरू एकत्र मुंबईतील एका रेस्टॉरंटमधून बाहेर येताना दिसले. त्यांच्या चेहऱ्यावरून लक्षात येत होते की, दोघांनीही डिनर डेट आनंदात घालवली आहे. दोघेही कॅज्युअल लूकमध्ये होते. सामंथाने काळा आणि सफेद स्वेटर्स परिधान केला होता. तिचे केस मोकळे होते आणि साधी नाजूक ज्वेलरी तिने घातली होती, तर राजने डेनिम जीन्स, काळा टीशर्ट आणि ऑलिव्ह ग्रीन रंगाचा शर्ट परिधान केला होता.

गम्मत म्हणजे दोघेजण एकत्र रेस्टॉरंटमधून बाहेर पडले नाहीतय सामंथा आधी येऊन कारमध्ये बसली, तर नंतर राज आला. मात्र तो गाडीमध्ये बसताच त्याला मीडिया कर्मचाऱ्यांनी घेरले. मीडिया आपल्याला कॅमेऱ्यामध्ये कैद करत आहेत हे कळताच राज त्यांच्याकडे रागाने पाहू लागला. ही घटना ज्या कॅमेऱ्यामध्ये कैद झाली आहे, त्या व्हिडिओखाली लिहिण्यात आले आहे की, सामंथाच्या तथाकथित ब्वॉयफ्रेंडचा पत्रकारांना रागीट लूक.

# परिणीता पुनर्प्रदर्शित ?



**२० वर्षांपूर्वी**, २००५ मध्ये, अभिनेत्री विद्या बालनच्या अभिनय कारकिर्दीला कलाटणी देणारा 'परिणीता' हा चित्रपट प्रदर्शित झाला होता. या चित्रपटामध्ये संजय दत्त आणि सैफ अली खान यांच्या देखील मुख्य भूमिका होत्या. आता 'परिणीता' पुन्हा चित्रपटगृहामध्ये प्रदर्शित केला जाणार आहे. सध्या जुने चित्रपट पुनर्प्रदर्शित करण्याचा ट्रेंड सुरू झाला असून अनेक निर्मात्यांना त्याचा फायदा झाला आहे. काही पूर्वी न चाललेल्या चित्रपटांनी पुन्हा प्रदर्शित झाल्यानंतर चांगली कमाई केली आहे. परिणीताच्या बाबतीत सांगायचे तर, बंगालचे लोकप्रिय लेखक शरतचंद्र चट्टोपाध्याय यांच्या बंगाली कादंबरीवर आधारित हा चित्रपट निर्माता विधू विनोद चोप्रा यांनी निर्माण केला होता व त्याचे दिग्दर्शन प्रदीप सरकार यांनी केले होते. 'परिणीता' २९ ऑगस्टला आपल्या प्रदर्शनाची २० वर्षे पूर्ण करत आहे. त्याचे औचित्य साधत हा सिनेमा येत्या २९ ऑगस्टला सिनेमागृहांमध्ये पुन्हा प्रदर्शित केला जाणार आहे. केवळ चित्रपटाने वीस वर्ष पूर्ण केली म्हणून नव्हे, तर निर्माता–दिग्दर्शक विधू विनोद चोप्रा यांच्या चित्रपट कारकिर्दीला पन्नास वर्षे पूर्ण होत असल्याने मोठ्या स्तरावर या दोन्ही घटना साजऱ्या करण्यात येणार आहेत. त्यासाठी एक खास आयोजन करण्यात येणार असून त्याची तयारी लवकरच सुरू होईल. परिणीता ८के रिझोल्यूशन स्वरूपात मोठ्या मल्टीप्लेक्स पीव्हीआर आणि 'आयनॉक्स'मध्ये प्रदर्शित केला जाणार आहे.

# शाहिद लॉर्ड्सवर

**प्रेक्षकांनी** अभिनेता शाहिद कपूरला मोठ्या पडद्यावर क्रिकेट खेळताना पाहिले आहे. २०२२ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'जर्सी' या सिनेमामध्ये त्याने क्रिकेटरची भूमिका साकार केली होती. मात्र आता शाहिदने वास्तविक जीवनामध्येही क्रिकेटची बॅट फिरवली आहे, आणि ती देखील 'क्रिकेटचे माहेरघर' म्हणजेच लंडनच्या लॉर्ड्स मैदानावर. हो, नुकताच शाहिद कपूर लंडनच्या लॉर्ड्स मैदानात क्रिकेट खेळला. यावेळी त्याची पत्नी मीरा राजपूत देखील हजर होती. सोशल मीडियावर शाहिदचे क्रिकेट खेळतानाचे फोटो खूप व्हायरल होत आहेत. त्याला क्रिकेटच्या गणवेशामध्ये बघून लोक खुश होत आहेत. इंग्लंडचा माजी खेळाडू स्टीव्हन फिनसोबतचा शाहिदचा फोटो देखील व्हायरल झाला आहे. लॉर्ड्स क्रिकेट मैदानाच्या अधिकृत एक्स हॅंडलवरून शाहिदचे क्रिकेट खेळतानाचे फोटो शेअर करण्यात आले आहेत. तो मजेत आणि मस्तीमध्ये क्रिकेट खेळताना दिसत आहे. या फोटोंखाली लिहिण्यात आले आहे, 'आज क्रिकेट के घर में शाहिद कपूर का खेलना अद्‌भुत है.'

शाहिदनेही आपल्या इंस्टाग्राम अकाऊंटवर हे फोटो शेअर केले आहेत. त्याने फोटोंखाली लिहिले आहे की, 'काय दिवस होता!'



# माझ्या जावयाचे अनेक स्त्रियांसोबत संबंध...

**संजय कपूरच्या** निधनानंतर करिष्मा कपूर आपल्या या माजी पतीच्या प्रॉपर्टीमध्ये आपला हिस्सा मागत असल्याचे वृत्त नुकतेच आम्ही वाचकांसह शेअर केले होते. करिश्माने संजयशी घटस्फोट घेतल्यानंतर तिची खूप बदनामी झाली होती. दोघांनी एकमेकांवर वाट्टेल ते आरोप लावले होते. संजयने तर केवळ पैशांच्या हव्यासापोटी करिश्माने आपल्याशी विवाह केला असल्याचा आरोप केला होता. परंतु त्यावेळी आपल्या मुलीचे समर्थन करत रणधीर कपूर मीडियासमोर आले होते. त्यावेळी त्यांनी संजय कपूरविषयी केलेले वक्तव्य आता पुन्हा एकदा सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. त्यांनी तेव्हा काय म्हटले होते? त्यांनी सांगितले होते की, लोक आम्हांला ओळखतात. कारण आम्ही कपूर आहोत. आम्हांला ना पैशांची आवश्यकता आहे आणि ना यासाठी आम्ही कुणाच्या पाठीमागे धावत असतो. आम्हाला केवळ पैसाच नाही तर कला सुद्धा मिळाली आहे. संजय एक तिसऱ्या दर्जाचा माणूस आहे. माझी कधीच इच्छा नव्हती की करिश्माने त्याच्याशी लग्न करावे. संजयने कधीच आपल्या पत्नीची पर्वा केली नाही. तो करिश्माला नेहमी त्रास देत असे आणि घटस्फोट घेण्यापूर्वी त्याचे अनेक स्त्रियांसोबत संबंध होते. संपूर्ण दिल्ली याविषयी जाणते. त्यामुळे मला अधिक काही सांगायची आवश्यकता नाही.

# वीकेण्डला काय बघाल ?

जुलै महिना मनोरंजनाचा महिना ठरला. या महिन्यात अनेक चित्रपट आणि वेबसीरिज प्रदर्शित झाल्या. परंतु त्या महिन्याची सुरुवात बॉक्स ऑफिसवर अगदी संथपणे झाली होती. 'मेट्रो इन दिनों' पासून ते 'निकिता रॉय' यासारख्या मोठ्या सिनेमांना जबरदस्त अपयश सहन करावे लागले. तर दुसऱ्या बाजूला अहान पांडे आणि अनित पड्डा या नवोदित कलाकारांच्या 'सैयारा' ने बॉक्स ऑफिसचे समीकरण बदलून टाकले. आता ऑगस्ट महिन्याची सुरुवात शानदारपणे होणार अशी आशा करू या आणि आजपासून सुरु होत असलेल्या ऑगस्टच्या पहिल्याच आठवड्यात तुमच्यासाठी काय करमणूक आहे, त्यावर एक नजर...

## सिनेमागृहात प्रदर्शित होणारे चित्रपट

### सन ऑफ सरदार २

आज अजय देवगण आणि मृणाल ठाकूर यांचा 'सन ऑफ सरदार २' प्रदर्शित होत आहे. हा सिनेमा खरं तर २५ जुलै रोजी प्रदर्शित होणार होता, मात्र ''सैयारा'' च्या प्रदर्शनामुळे अजय देवगणने आपल्या 'सन ऑफ सरदार २' चे प्रदर्शन लांबवले. याचे कारण म्हणजे २०१२ मध्ये यशराज फिल्म्सचा 'जब तक है जान' आणि अजय देवगणचा 'सन ऑफ सरदार' एकाच दिवशी प्रदर्शित झाले होते आणि त्यावेळी सिनेमागृहांच्या



संख्येवरून यशराज फिल्म्स व अजय देवगण यांच्यामध्ये वाद निर्माण झाला होता. आता 'सन ऑफ सरदार २' ची टक्कर होत आहे 'धडक २' सह.

**''सन ऑफ सरदार'' चे कथानक**

अनेक वर्ष वेगळे राहिल्यानंतर जस्सी आपली पत्नीसह तडजोड करण्यासाठी स्कॉटलंड जातो. परंतु तिथल्या गर्दीतील गोंधळामध्ये एका शीख लग्नामध्ये अडकतो आणि मग अनेक गमतीजमती घडतात. या सिनेमामध्ये अजय देवगणसह मृणाल ठाकुर, संजय मिश्रा, रवी किशन, दीपक डोबरियाल, चंकी पांडे, शरत सक्सेना, विंदू दारा सिंग आणि मुकुल देव यासारखे कलाकार आहेत. या सिनेमाचे दिग्दर्शन विजय कुमार अरोरा यांनी केले आहे.

### धडक २

हा सिनेमा २०१८ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'धडक' या सिनेमाचा सिक्वेल आहे, आणि तो त्याच वर्षी प्रदर्शित झालेल्या 'परियेरुम पेरुमल' या तमिळ सिनेमाचा रिमेक आहे. ''धडक'' मध्ये जान्हवी कपूर आणि इशान खट्टर यांनी काम केले होते. ''धडक २'' मध्ये सिद्धांत चतुर्वेदी आणि तृप्ती डिमरी आहेत. हा सिनेमा शाजिया इक्बाल यांनी दिग्दर्शित केला आहे. चित्रपटामध्ये जातीयवाद आणि सामाजिक भेदभाव या मुद्द्यांवर भाष्य करण्यात आले आहे. यातील प्रेमकथा या गोष्टींचा सामना करताना दिसेल.

**कथानक**

या चित्रपटाची कथा नीलेश (सिद्धांत चतुर्वेदी) आणि विधी (तृप्ती डिमरी) यांच्या अवतीभोवती फिरते. दोघेही कॉलेजमध्ये शिकत असताना



एकमेकांच्या प्रेमात पडतात. नीलेशला जातीभेदाचा सामना करावा लागतो, कारण त्याचा प्रवेश आरक्षण कोट्यातून झाला आहे. नीलेश आणि विधी कसे सामाजिक अडचणी आणि कौटुंबिक दबाव यांचा सामना करत आपले प्रेम सफल करण्याचा प्रयत्न करतात हे चित्रपटामध्ये दाखवण्यात आले आहे.

### किंगडम

गौतम तिन्ननुरी दिग्दर्शित आणि विजय देवरकोंडा, सत्यदेव, भाग्यश्री बोरसे यांचा हा सिनेमा



काल सिनेमागृहामध्ये प्रदर्शित झाला. विजय देवरकोंडाने एका दमदार पोलीस अधिकाऱ्याची भूमिका केली आहे.

### द नेकेड गन

हा एक कॉमेडी चित्रपट सिक्वेल आहे, ज्याचा पहिला भाग १९८८ मध्ये प्रदर्शित झाला होता. हा सिनेमा लेफ्टिनेंट फ्रॅंक ड्रेबिन (लेस्ली नीलसन)



विषयी आहे. फ्रॅंक एक मूर्ख आणि बावळट पोलीस आहे, जो एक खतरनाक प्रकरण सोडवण्याचा प्रयत्न करतो. इंग्लंडची महाराणी एलिझाबेथ दुसरी, अमेरिकेच्या दौऱ्यावर येत असताना एक अतिश्रीमंत व्यापारी, विन्सेंट लुडविग, तिच्या हत्येचा कट रचतो. परंतु लेफ्टिनेंट फ्रॅंक ड्रेबिन हा कट उजेडात आणतो. इंग्रजीसह हिंदीमध्ये देखील हा सिनेमा पाहता येईल.

### जान अभी बाकी है

हा सिनेमा आज प्रदर्शित होत आहे. ही एक प्रेमकथा आहे, जी सर्वसामान्य रोमांसने सुरु



होऊन आत्मशोधाच्या यात्रेत रुपांतरित होते. या सिनेमामध्ये मकरंद देशपांडे आणि बृजेन्द्र काला यांच्यासारखे ज्येष्ठ अनुभवी कलाकारांसह प्रांजल शांडिल्य, स्वप्निल सिंग, राजेश जैस आणि रोहित पाठक आदी कलाकार आहेत. या चित्रपटाचे दिग्दर्शक सत्यजीत आहेत.

### अजेय: द अनटोल्ड स्टोरी ऑफ अ योगी

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या जीवनावर आधारित हा सिनेमा आज प्रदर्शित होत आहे. रवींद्र गौतम दिग्दर्शित हा सिनेमा शांतनू गुप्ता



यांचे पुस्तक 'द मॉन्क हू बिकेम चीफ मिनिस्टर' वरून बेतला आहे. या सिनेमामध्ये अनंत जोशीने योगी आदित्यनाथ यांची व्यक्तिरेखा साकार केली आहे. महंतपासून प्रभावशाली राजकीय नेता बनण्याचा योगी यांचा प्रवास यामध्ये पाहायला मिळेल. हा सिनेमा हिंदीसह तेलुगू, तमिळ, कन्नड आणि मल्याळमसह आणखी काही भाषांमध्ये प्रदर्शित होत आहे. या सिनेमामध्ये परेश रावल आणि दिनेश लाल यादव यांच्या सुध्दा महत्त्वाच्या भूमिका आहेत.

## ओटीटीवर काय ?

### पति पत्नी और पंगा

कलर्स टीव्हीवर 'पती पत्नी और पंगा' हा नवा शो उद्या २ ऑगस्ट रोजी प्रदर्शित होत आहे.



हा शो प्रेक्षक कलर्स आणि जिओ हॉटस्टारवर देखील पाहू शकतात. या शोमध्ये ७ जोडपी सहभागी होणार आहेत, ज्यांना आपल्या नातेसंबंधांची अग्निपरीक्षा पार करावी लागेल.

### हाऊसफुल ५



खिलाडी अक्षय कुमार व अभिषेक बच्चन यांचा मल्टीस्टारर कॉमेडी चित्रपट 'हाऊसफुल ५' आज प्राइम व्हिडिओवर प्रदर्शित होत आहे. हा सिनेमा बघण्यासाठी पैसे भरावे लागतील.

### छोरियां चली गांव



रविवार ३ ऑगस्ट रोजी झी टीव्ही आणि झी ५ वर एक नवा रिॲलिटी शो सुरु होत आहे. यामध्ये टीव्हीवरील लोकप्रिय अभिनेत्री गावातील लाइफस्टाइलमध्ये स्वत:ला कशा ॲडजेस्ट करतात आणि राहतात हे पहायला मिळेल.

### माय ऑक्सफर्ड इयर

हा अमेरिकन रोमँटिक कॉमेडी चित्रपट उद्या २ ऑगस्ट रोजी नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होत आहे. या सिनेमाचे दिग्दर्शन इयान मॉरिस यांनी केले असून एलिसन बर्नेट आणि मेलिसा ओसबोर्न यांनी लिहिलेला हा



सिनेमा जूलिया व्हेलन यांच्या याच शीर्षकाच्या कादंबरीवर आधारित आहे. सोफिया कार्सन आणि कोरी माइलक्रिस्ट यामध्ये प्रमुख भूमिका आहेत.

### बियॉण्ड द बार



ही कोरियन सिरीज उद्या नेटफ्लिक्सवर येत आहे. एका लॉ कंपनीमध्ये एक नवी महिला वकील म्हणून रुजू होते. आत्मविश्वास असलेली ही महिला अत्यंत प्रामाणिक आहे. त्यामुळे काय घटना घडतात ते पाहणे मनोरंजक ठरेल. या सिरीजचे १२ भाग आहेत.

### लीन

ही कॉमेडी सीरिज नेटफ्लिक्सवर काल प्रदर्शित झाली आहे. पतीच्या निधनानंतर लीन मॉर्गन ही कॉमेडी अभिनेत्री आपल्या कुटुंबासह नवीन आयुष्य सुरु करते.



## या आठवड्यात प्रदर्शित झालेल्या काही मालिका व शो

### क्योंकि सास भी कभी बहू थी २

स्मृती इराणी आणि अमर उपाध्याय अभिनित 'क्योंकि सास भी कभी बहू थी' या लोकप्रिय



मालिकेचा दुसरा सीझन तब्बल २५ वर्षांनी २९ जुलै रोजी प्रदर्शित झाला असून तो जिओहॉटस्टारवर देखील पाहता येईल.

### कन्वर्सेशन्स विद अ किलर: द सन ऑफ सॅम टेप्स

ही तीन भागांची सत्य घटनेवर आधारित गुन्हेगारी विषयावरची डॉक्यू सीरिज ३० जुलै रोजी नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झाली आहे. 'सॉन ऑफ सॅम' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या डेव्हिड बर्कोविट्स अमेरिकन सीरियल किलरच्या विकृत मेंदूची चिकित्सा केली जाते. त्याने १९७६ आणि १९७७ मध्ये न्यूयॉर्क शहरात अंदाधुंद गोळीबार करून ६ लोकांचे प्राण घेतले आणि ७ जणांना जखमी केले. १९८० मध्ये घटिका सुधार संस्थेमध्ये रेकॉर्ड केलेल्या व पूर्वी कधीही न ऐकलेल्या ऑडिओ मुलाखतींचा वापर करून ही सीरिज बनवण्यात आली.


### ग्लासहार्ट

मियो वाकागी यांच्या कादंबरीवर आधारित ही जपानी सीरिज ३१ जुलै रोजी नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झाली आहे. यामध्ये अकाने सॅजो नावाच्या एका विद्यार्थिनीच्या ड्रमरची कथा पहायला मिळते. तिला अचानक बॅण्डमधून काढले जाते तेव्हा कथा एक वेगळी कलाटणी घेते.

### चीफ ऑफ वॉर

ही अमेरिकन सीरिज Apple TV+ वर आजपासून प्रदर्शित होत आहे. विदेशी यात्रेवरून घरी परतलेल्या एका महान योध्याची कथा यामध्ये पहायला मिळेल.

# नवाकाळ शब्दकोडे-१३२९



**आडवे शब्द –**

२. दबाव ३. शोध, छडा ५. मनोहर, रम्य ९. पायजमा ११. कांदा १३. नौका १४. नियोजन, बेत रचणे १५. भाजणीचे धपाटे १८. दहा १९. लज्जतदार २१. घराण्यात जन्मलेला २२. सारण भरून केली जाणारी रोटी २४. फिरस्ता, गोसावी २५. दुधातली बंगाली मिठाई २७. खिन्न करणारे वातावरण ३०. मुंबईचे एक उपनगर ३१. स्तुतिपाठक, खुशामत करणारा ३२. रक्षा, राख ३४. जाळणे, अग्निसंस्कार ३६. विपुल, भरपूर ३७. न्यारा, निराळा ३८. संपूर्ण, सकल ४०. टोळी ४१. अवांतर, इतर ४४. नवी पालवी, तारुण्याचा बहर ४६. निश्चय, प्रतिज्ञा ४७. मानी स्त्री ४९. अभिप्रेत नसलेला, चुकीचा ५१. शेंडी ५२. जपून ठेवणे ५४. दर्भाची अंगठी ५५. राजाचा प्रधान ५६. वेल, वल्लरी ५८. लागण, संसर्ग ५९. खेकडा, बारा राशीतील एक ६०. रामाचे वडील ६३. खडकांतील/डोंगरातील भेग, खबदड ६४. धमकावणी ६६. प्रयत्न न सोडणे, जिद्द ६७. खालच्या दर्जाचे ७०. अर्धा शेर किंवा एक पौंड ७१. चरण, पाय ७२. एक किंवा अधिक बिऱ्हाडे असलेले जुन्या पद्धतीचे घर ७३. युद्धभूमी ७५. जेमतेम, कसाबसा ७७. नाशवंत ७९. कामगारांचे आंदोलन ८०. देहूचे संत ८२. शहानिशा, खात्री करून घेणे ८५. विचित्रवीर्याची बायको, पांडूची आई ८७. उंची दर्जाचा शुभ्र पाषाण ९०. आरोळी ९२. उठाव ९३. जाणीवपूर्वक, लक्षात ठेवून ९७. रोख रक्कम ९८. स्त्रियांच्या कर्णभूषणांचा प्रकार ९९. गद्दारी, शत्रूला सामील होणे १००. पोट सुटलेला, तुंदिलतनू १०३. भिस्त १०४. ओंकार, मुलांचे एक नाव १०५. कुरघोडी १०६. सर्वांचे मत जुळून येणे

**उभे शब्द –**

१. एकूण, गोळाबेरीज २. उग्र वास ३. कुत्र्यासारखे तोंड असलेला वन्य पशू ४. तेजस्वी ५. पहारेकरी ६. माळेतील घटक, गोलक ७. कुवतीनुसार ८. डोक्याला मालीश १०. थंडी, शैत्य १२. त्रासदायक जावयाचे संबोधन १३. सर्व, संपूर्ण १६. भाडेकरार १७. दोषारोप १९. कोंबड्यांचे घर २०. कुमक २३. गाढव २६. मुस्लिमांचा सण २७. स्वैर पर्यटन २८. शमीचे झाड ३०. पृथ्वी, वसुंधरा ३३. आठवण, स्मृती ३४. मोठा नगारा ३५. लोणी ३६. उलगडा ३९. जंगल ४२. अर्धांगी, बायको ४३. वेळकाढूपणा ४५. मुळाक्षरे ४६. अतिशय लठ्ठ महिला ४८. स्वतःचे घर, परलोक ४९. आगामी काळ ५०. शक्ती, बल ५३. अपऱ्या नाकाची ५७. तंतू, वायर, केबल ५८. ओढूनताणून आणलेला संबंध ६१. हुतात्मा ६२. शीण, दमणूक ६५. सचोटी, धर्मपरायणता ६६. रोमांचकारी ६८. पहाटे दारासमोर जलसिंचन करून रांगोळी काढणे ६९. कुशाग्र बुद्धी ७१. वंचित, मुकलेला ७४. अमोघ उपाय, रामाने सोडलेला तीर ७६. वेळ मारून नेणारा खुलासा ७८. गाढव ८१. मातीचा प्रकार, गेरू ८३. लहान आकाराचे घोडे ८४. विश्व ८६. मनात आलेली कुशंका ८८. किल्ला ८९. तीन आसनी वाहन ९१. जनता, नगरवासी ९४. नोंदवही, टिपण ९५. सुईचे छिद्र ९६. कबूतर ९९. अनुरक्त, लुब्ध १०१. लक्ष्मी १०२. एकजूट, एकोपा •

**नवाकाळ कोडे क्रमांक १३२८चे उत्तर**

**आडवे शब्द :** १. अजब ४. दुजाभाव ७. उतारवय ११. जाजम १३. धोपटमार्ग १५. रहित १७. गवळण १८. वाम २०. नीरफणस २२. कातळ २४. तीज २६. लेचापेचा २८. हाटक २९. उरग ३०. नर्मदा ३१. क्षालन ३२. सरवा ३३. हेर ३४. मट्ठ ३५. पंक ३६. रया ३८. मामा ३९. ईहा ४१. कजाग ४४. चटकन ४६. रंभा ४७. वक्री ४९. मनमोहक ५१. लखलाभ ५३. वीर ५४. बिजागरी ५६. दिवा ५८. रेवा ६०. टन ६२. गवत ६४. बोट ६५. ललामभूत ६८. वट ६९. भला ४१. कलकल ७२. वीड ७३. गाफील ७४. आवाज ७६. कलश ७८. बार ८०. केसरी ८२. कोदंड ८४. कपिला ८६. बातमी ८७. सलग ८८. मिष ८९. चालना ९०. खबर ९१. थोरवी ९२. कंठा ९३. मुनी ९४. कप ९६. कपडे ९८. पारोसा १००. ईहा १०४. टिकाऊ १०६. रेघ १०८. लष्करच्या भाकरी भाजणे १०९. कसब १११. सारखा ११३. येणे ११४. लादी ११५. जाणे

**उभे शब्द :** १. अधोगती २. जप ३. बटवा ४. दुर्ग ५. भार ६. वहिनी ८. तारणहार ९. वग १०. यवस ११. जाणकार १२. मवाळ १४. मामलेदार १६. तरफ १९. उपेक्षा २१. सटवाई २३. तगमग २५. जनक २७. चालढकल २९. उरक ३२. समारंभ ३५. पंचम ३७. याचक ४०. हावरट ४२. जागोजाग ४३. कमोदिनी ४५. नखरेल ४८. भरीत ५०. हवा ५२. लावालावी ५५. गवगवा ५७. विटकर ५९. प्रभू ६१. नवलकोल ६३. कुंभकर्ण ६४. बोलबाला ६६. मडके ६७. तगारी ७०. लाल ७४. आड ७५. जल्लोष ७७. शकल ७९. वितरक ८१. सफर ८३. दंग ८५. पिनाक ८६. बाब ८८. मिठाई ८९. चानी ९१. थोडे ९३. मुबलक ९५. परभारे ९७. पराजय ९८. पाऊस ९९. सारे १०१. हाय खाणे १०२. सुरभी १०३. किरीट १०५. काकणे १०७. घसा ११०. बला ११२. रजा



परळच्या सेंट रेजिस हॉटेलमध्ये २१-२२ जुलै रोजी झालेल्या आंतरराष्ट्रीय खरेदीदार-विक्रेता बैठकीत ए. के. मुनशी योजना संस्थेच्या जे. टी. शेठ मंदबुद्धी विकास केंद्रातील प्रशिक्षणार्थ्यांनी तयार केलेल्या विक्रीयोग्य वस्तूंचे प्रदर्शन करण्यात आले. महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ व भारतीय निर्यात संघटना महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या या कार्यक्रमाचे उद्घाटन मंत्री उदय सामंत यांनी केले. कार्यक्रमात सुमारे ५० देशांतील प्रतिनिधींनी सहभाग घेतला. प्रशिक्षणार्थ्यांनी तयार केलेल्या ज्यूट बॅग्स परदेशी पाहुण्यांना भेट म्हणून देण्यात आल्या, ज्यामुळे भविष्यात निर्यातीच्या संधी वाढण्याची शक्यता आहे.

## कोल्हापूरमधील फॉरेन्सिक लॅबच्या पत्रव्यवहाराची माहिती सादर करा

**उच्च न्यायालयाचे पोलिसांना आदेश**

मुंबई

**मालवण** येथील राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्यानंतर शिल्पकार-ठेकेदार जयदीप आपटे याच्याकडून जप्त केलेल्या इलेक्ट्रॉनिक गॅझेट्ससंदर्भात कोल्हापूर फॉरेन्सिक लॅबशी केलेल्या शेवटच्या पत्रव्यवहाराची माहिती सादर करा, असे निर्देश उच्च न्यायालयाने मालवण पोलिसांना दिले.

१४ ऑगस्टपर्यंत संबंधित माहिती सादर करण्यासाठी न्यायालयाने पोलिसांना वेळ दिला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा उभारणीतील शिल्पकार जयदीप आपटेने उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. पोलिसांनी तपासादरम्यान जप्त केलेला लॅपटॉप आणि मोबाईल फोन परत करण्यात यावा, त्यासाठी न्यायालयाने निर्देश द्यावेत, अशी विनंती आपटेने याचिकेतून केली आहे. त्याच्या याचिकेवर न्यायमूर्ती एस. एम. मोडक यांच्या एकलपीठासमोर सुनावणी झाली.

यावेळी याचिकाकर्ता आपटेच्या वतीने ॲड. गणेश सोवनी यांनी, तर राज्य सरकारच्या वतीने विशेष सरकारी वकिल संगीता शिंदे यांनी बाजू मांडली. २.४४ कोटी रुपये खर्चून राजकोट किल्ल्यावर ३५ फूट उंचीचा पुतळा उभारण्यात आला होता. त्या पुतळ्याचा लोकार्पण सोहळा डिसेंबर २०२३ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पार पडला होता. मात्र ६ ऑगस्ट २०२४ रोजी पुतळा अचानक कोसळला. पुतळा उभारणीचे काम निकृष्ट झाल्याचा आरोप करण्यात आल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या तक्रारीवरून सिंधुदुर्ग पोलिसांनी भारतीय न्याय संहिता, २०२३ आणि सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान कायद्याअंतर्गत जयदीप आपटेविरुद्ध निष्काळजीपणा व इतर गुन्ह्यांसाठी गुन्हा दाखल केला होता. पुढील तपासादरम्यान आपटेला अटक केल्यानंतर त्याच्या कल्याण येथील घरातून मोबाईल फोन आणि लॅपटॉप जप्त करण्यात आला होता. ती इलेक्ट्रॉनिक उपकरणे परत करण्याचे निर्देश देण्यासाठी आपटेने सत्र न्यायालयात धाव घेतली होती. तथापि, सत्र न्यायालयाने ९ मे २०२५ रोजी त्याची याचिका फेटाळून लावली. त्यानंतर त्याने उच्च न्यायालयात दाद मागितली आहे.

**जाहिर सूचना**

जनतेला येथे मोठ्या प्रमाणात सूचना देण्यात येत आहे की, माझे अशिल श्री. तारिक रझा, नॅश जॉबिट प्लेसमेंट प्रायव्हेट लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक, ज्यांचे कार्यालय २२६, एनबीसी कॉम्प्लेक्स, प्लॉट क्र.४३, आयसीआयसीआय बँकेसमोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई, महाराष्ट्र ४००६१४ येथे आहे, त्यांनी दि.२८.१२.२०२३ रोजी परदेशी नियोक्त्यांसह भारतीय कामगारांच्या नियुक्तीसाठी भरती व्यवसायासाठी परराष्ट्र मंत्रालयाकडून इमिग्रेशन कायदा, १९८३ च्या कलम १० अंतर्गत प्रमाणपत्र क्र.बी-२११४/बिहार/कॉम/१०००+/५/१०४८४/२०२३ प्राप्त केले आहे. परराष्ट्र मंत्रालयाने जारी केलेला परवाना केवळ माझ्या अशिलांच्या नावावर आहे आणि तो अहस्तांतरणीय आहे. माझ्या अशिलांच्या लक्षात आले आहे की, नॅश जॉबिट प्लेसमेंट प्रायव्हेट लिमिटेडचे सह-संचालक श्री. अब्दुर रहमान अकबर हे कंपनीच्या फायद्याव्यतिरिक्त इतर कारणांसाठी परवाना वापरत आहेत. हा परवाना अहस्तांतरणीय असल्याने, श्री. अब्दुर रहमान अकबर आणि त्यांचे कोणतेही सहकारी किंवा संबंधित संस्थांना या परवान्याच्या आधारे कोणतेही प्रतिनिधित्व करण्याचा किंवा कोणत्याही व्यवसायात सहभागी होण्याचा अधिकार किंवा गुंतण्याचा अधिकार नाही. जनतेला कळविण्यात येते की नॅश जॉबिट प्लेसमेंट प्रायव्हेट लिमिटेडचे वर नमूद केलेल्या पत्त्याव्यतिरिक्त महाराष्ट्रात दुसरे कोणतेही कार्यालय नाही. पुढे कळविण्यात येते की नॅश जॉबिट प्लेसमेंट प्रायव्हेट लिमिटेड येथे नमूद केलेल्या पत्त्यावरील त्यांची कॉर्पोरेट शाखा बंद करण्याच्या प्रक्रियेत आहे. म्हणून जनतेला कळविण्यात येते की २८.१२.२०२३ च्या परवान्यासंदर्भात श्री. अब्दुर रहमान अकबर किंवा त्यांचे सहकारी किंवा कोणत्याही संबंधित संस्थांशी कोणताही व्यवहार करू नये किंवा त्यांच्याशी कोणताही करार करू नये; सदर परवान्यासंदर्भात असा कोणताही व्यवहार आणि/किंवा व्यवस्था माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. श्री. अब्दुर रहमान अकबर किंवा त्यांच्या सहकाऱ्यांसोबत किंवा परदेशी नियोक्त्यांसह भारतीय कामगारांच्या तैनातीसाठी कोणत्याही संबंधित संस्थांसोबत कोणत्याही करारात सहभागी होणारे कोणीही खर्च आणि परिणामांबाबत स्वतःच्या जोखमीवर असे करतील, जे कृपया लक्षात ठेवा.

**दिनांक: ०१.०८.२०२५**
**ॲड. रमीझ शेख**
**कार्यालय क्र.६बी, पहिला मजला,**
**ओल्ड ओरिएंटल बिल्डिंग, एन.एम. रोड,**
**फोर्ट, मुंबई- ४००००१.**
**मोबाईल: ८८८८२९४१११**
**ईमेल: adv.ramiz@gmail.com**

**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given to the public at large that our client proposes to purchase Flat No. 201, 2nd Floor, B-Wing, in Sea Shell Apartment Co-operative Housing Society Ltd., on land bearing CTS Nos. 1228, 1289, and 1289-A, Village Versova, Seven Bungalows Road, Andheri (West), Mumbai–400061, from Mr. Joginder Singh Gujaral, holder of Share Certificate No. 33, comprising 5 shares (Nos. 166 to 170) under Membership No. 33 corresponding to aforementioned flat.

Any person(s) claiming any right, title, interest, or objection in respect of the said flat and/or shares is hereby required to submit the same in writing, along with supporting documents, to the undersigned within 14 (fourteen) days from the date of this notice. Failing such intimation within the stipulated period, it shall be conclusively presumed that no adverse claim, right, title, interest, or demand exists over the said property, and the proposed transaction shall proceed unopposed. Any subsequent claims shall be deemed waived and barred

**Date: 31.07.2025** **Issued by:**
**Vrudhi Legal and Associates**
**Adv. Latesh Faria**
**Shop No. 1, Magan Mahal,**
**Andheri court lane, M. V. Road,**
**Andheri (East), Mumbai – 400069**
**Mobile: 9869556829**

**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given to the public at large that our client proposes to purchase Flat No. 202, 2nd Floor, B-Wing, in Sea Shell Apartment Co-operative Housing Society Ltd., on land bearing CTS Nos. 1228, 1289, and 1289-A, Village Versova, Seven Bungalows Road, Andheri (West), Mumbai–400061, from Mr. Joginder Singh Gujaral, holder of Share Certificate No. 34, comprising 5 shares (Nos. 171 to 175) under Membership No. 34 corresponding to aforementioned flat. Any person(s) claiming any right, title, interest, or objection in respect of the said flat and/or shares is hereby required to submit the same in writing, along with supporting documents, to the undersigned within 14 (fourteen) days from the date of this notice. Failing such intimation within the stipulated period, it shall be conclusively presumed that no adverse claim, right, title, interest, or demand exists over the said property, and the proposed transaction shall proceed unopposed. Any subsequent claims shall be deemed waived and barred.

**Date: 31.07.2025** **Issued by:**
**Vrudhi Legal and Associates**
**Adv. Latesh Faria**
**Shop No. 1, Magan Mahal,**
**Andheri court lane, M. V. Road,**
**Andheri (East), Mumbai – 400069**
**Mobile: 9869556829**

## अमेरिका-पाक तेल करार! ट्रम्पचा भारताला दुसरा झटका

पान १ वरून

ट्रम्प यांनी कालच भारतावर २५ टक्के आयातशुल्क लागू करण्याबरोबर रशियासोबत व्यापार करण्याची शिक्षा म्हणून भारताला दंड आकारण्याची घोषणा केली होतीआज त्यांनी आणखी एक पोस्ट करून भारताच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रयत्न केला.

या पोस्टमध्ये त्यांनी म्हटले की, भारत आणि रशिया यांच्यात काय सुरू आहे, याची मला मुळीच फिकीर नाही. हे दोन देश आपापल्या मृत्यूपंथाला लागलेल्या अर्थव्यवस्था मिळून रसातळाला नेत आहेत. आमचा भारताशी फारसा व्यापार नाही. भारत आमच्या मालावर जगातील सर्वात जास्त आयात शुल्क लावतो. त्याप्रमाणे रशियासोबत अमेरिकेचा फारसा व्यापार नाही. हे असेच चालू द्या. रशियाचे अपयशी माजी राष्ट्राध्यक्ष मेदवेदेव यांना सांगायला पाहिजे की, ते स्वतःला आजही अध्यक्ष समजतात. ते एका भयंकर शेवटाकडे वाटचाल करत आहेत.

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाची सुत्रे दुसऱ्यांदा हाती घेतल्यापासून ट्रम्प यांनी जगभरातील देशांवर आयातशुल्क वाढीचा बडगा उगारला. त्यांच्या या अस्त्रामुळे जगाची व्यापारी समीकरणे बिघडण्याची शक्यता स्पष्ट दिसू लागल्याने अनेक देशांनी ट्रम्प यांची आयातशुल्कात सवलत देण्यासाठी मिनतवाऱ्या केल्या. त्यानंतर ट्रम्प यांनी आयात शुल्कवाढीस ३१ जुलैपर्यंत स्थगिती दिली. दरम्यानच्या काळात ट्रम्प यांनी अनेक देशांवर व्यापारी करारासाठी दबाव टाकला. भारताबरोबरही अमेरिकेला व्यापार करार करायचा होता. या करारासाठी चर्चेच्या काही फेऱ्यादेखील झाल्या. मात्र ट्रम्प यांनी दिलेल्या ३१ जुलैपर्यंतच्या मुदतीत कराराला अंतिम स्वरूप देता आले नाही. त्यामुळे संतापलेल्या ट्रम्प यांनी भारतावर दबाव वाढवण्यासाठी पाकिस्तानला रसद पुरवण्याची भूमिका घेतली आहे. ट्रम्प यांच्या या दादागिरीवर भारत सरकारनेअगदीच बोटचेपेपणाची प्रतिक्रिया दिली आहे. ट्रम्प यांनी लागू केलेल्या २५ टक्के आयात शुल्कामुळे भारताच्या व्यापारावर किती आणि कसा परिणाम होईल, याचा आम्ही अभ्यास करत आहोत, अशी अधिकृत प्रतिक्रिया आज भारत सरकारच्या वतीने देण्यात आली.

## खासगी वैद्यकीय महाविद्यालयांचे १० टक्के ईडब्ल्यूएस आरक्षण रद्द

पान १ वरून

सरकारने हा निर्णय मागे न घेतल्यास न्यायालयात जाण्याचा इशारा पालकांनी दिला होता. दोन दिवसांपूर्वी पालक आणि कार्यकर्त्यांच्या प्रतिनिधीमंडळाने वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांची भेट घेऊन, यासंदर्भातील नाराजी मांडली होती. या चर्चेनंतर विभागाने काल आरक्षण धोरणावर नव्याने खुलासा केला.

यावेळी जागा वाढवल्याशिवाय ईडब्ल्यूएस आरक्षणाची अंमलबजावणी होणार नसल्याचे आणि हे केंद्र सरकारच्या २०१९ मधील धोरणाशी सुसंगत असल्याचे वैद्यकीय शिक्षण विभागाने स्पष्ट केले.

## शहांच्या नेतृत्वात एनआयए अपयशी! पृथ्वीराज चव्हाणांचा घणाघात

मुंबई

**मालेगाव** बॉम्बस्फोट प्रकरणाच्या निकालानंतर गृहमंत्री अमित शहा यांच्या नेतृत्वात एनआयए संस्था अपयशी ठरत आहे, असा घणाघात माजी मुख्यमंत्री व काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी केला.

माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरण २००८ चे आहे. अमित शहा यांच्या नेतृत्वात जोपर्यंत या यंत्रणा काम करतात, तोपर्यंत असे निकाल अपेक्षित आहेत. काँग्रेसने माफी मागावी या मुख्यमंत्र्यांच्या मागणीवर ते म्हणाले की, मुख्यमंत्री काहीही म्हणतील. काँग्रेसच्या माफीचा काय संबंध आहे? भगवा आमच्यासाठी एक राष्ट्रभक्तीचा रंग आहे. त्यामुळे तो शब्द वापरू नका. दहशतवादाला जात धर्म नसतो. नथुराम गोडसेने गोळी मारताना धर्म बदलला होता का? दहशतवादी हा गुन्हेगार आहे. त्याला शिक्षा झाली पाहिजे. पहलगाम हल्ला झाल्यानंतर आरोपी सापडले नाहीत, मुंबई लोकल साखळी स्फोटात पुराव्याअभावी आरोपी निर्दोष सुटले. मालेगाव स्फोटप्रकरणी तेच झाले.

**मध्य रेल्वे**
**मुंबई विभाग**
**निविदा सूचना क्र. सीडब्ल्यूई/एमटीएन/८५२५६२७४/२०२५**
**नियत दि. २८.०८.२०२५**

निविदा क्र. - ८५२५६२७४, निविदा शीर्षक - १) ब्रेक कॅलिपर (लेवेरेज प्रमाण २:१७) भाग क्र. डी १२७५५०-६०० परिमाण ०२ नग. २) ब्रेक सिलिंडर पीबीईसी भाग क्र. ४एफ १३०२०० परिमाण ०१ नग आणि भाग क्र. ४एफ १३०१९९ परिमाण ०१ नग फक्त एफटीआरटीआयएल बनावटीचे (पीएसी) समाविष्ट असलेले संच, परिमाण - ६० संच, नियत दिनांक - २८.०८.२०२५, मूल्य - २४५६७५२९.

SUN 318 उप मुख्य सामग्री व्यवस्थापक (सीडब्ल्यूई)

अनाधिकृत रूप से रेल लाइन को पार करना दंडनीय अपराध है

## खेवलकरांच्या अडचणी वाढणार? फोनमध्ये आक्षेपार्ह चॅट व फोटो

पान १ वरून- सापडली असून त्याचा तपास करण्यासाठी आणखी पोलीस कोठडी आवश्यक आहे.

खेवलकर यांचे वकिल विजय ठोंबरे यांनी न्यायालयात जोरदार प्रतिवाद केला. त्यांनी म्हटले की, प्रांजल खेवलकर यांच्या कोठडीची काहीही गरज नाही. पोलीस न्यायालयाची फसवणूक करत आहेत. आज जे न्यायालायात सांगितले जात आहे ते खोटे आहे. माल चाहिए हा मेसेज आज कुठून आला? असा मेसेज पहिल्याच दिवशी का दाखवला नाही? या प्रकरणात इशा सिंगला पेरले आहे. प्रांजल आणि त्या लोकांमध्ये काहीही संबंध नाहीत. हा एक ट्रॅप आहे. त्यांच्या वैयक्तिक व्हिडिओचा या प्रकरणाशी आणि अंमली पदार्थ कायद्याशी काहीही संबंध नाही. हे व्हिडिओ केवळ खेवलकरांची बदनामी करण्यासाठी वापरले जात आहेत. जे अंमली पदार्थ सापडले त्याचे वजन करण्यात आलेले नाही, ते कुठून आले माहीत नाही . फोटो आणि व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी कोर्टासमोर दिली जात आहे . हे पोलीस कसे काय करू शकतात? खोटे पुरावे न्यायालयात सादर करून कोठडी मागितली जात आहे.

**नाशिक महानगरपालिका, नाशिक**
**सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग, पाणी पुरवठा**
**जाहिर निविदा सुचना क्र. ०८ (सन २०२५-२६)**

नाशिक महानगरपालिक, नाशिक सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग पाणी पुरवठा विभागाच्या मुकणे धरण पंपिंग स्टेशन येथे पंपिंग क्षमता वाढविणे, विल्होळी येथे २७४ द.ल.लि. क्षमतेचा जलशुध्दीकरण केंद्र उभारणे तसेच विल्होळी जलशुध्दीकरण केंद्र ते साधुग्राम पर्यंत मुख्य गुरुत्ववाहिनी टाकणे, याकामांची जाहिर ई निविदा निविदा सुचना क्र.०८ (सन २०२५-२६) दिनांक ३०/०७/२०२५ पासुन दिनांक २०/०८/२०२५ रोजी ३.०० वाजेपावेता मा.शासनाचे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिसेल. निविदा स्विकृतीचा अंतीम दि. २०/०८/२०२५ राहील.

टीप- यापुढील सर्व आवश्यक सुचना/शुध्दीपत्रक हे Online website वर प्रसिध्द करणेत येतील.

स्वाक्षरीत /-
अधीक्षक अभियंता
सार्व. आरोग्य अभियांत्रिकी विभाग,
पाणी पुरवठा
नाशिक महानगरपालिका, नाशिक

स्वाक्षरीत /-
आयुक्त तथा प्रशासक
नाशिक महानगरपालिक, नाशिक

जनसंपर्क/जा.क्र./१८७/२०२५
दि. ३०/०७/२०२५

सर्व नागरिकांनी पाणी काटकसरीने वापरावे.

**SBI**
**भारतीय स्टेट बँक**
**कॉर्पोरेट सेंटर, स्टेट बँक भवन, मादाम कामा मार्ग, मुंबई – ४०००२१**

**सूचना**

भागधारकांच्या हे निदर्शनास आणून दिले जात आहे की एसबीआयच्या रु. १० दर्शनी मूल्याच्या भागाचे रु. १ मध्ये विभाजन झाल्याच्या अनुषंगाने, बँकेद्वारे निर्गमित केलेल्या रु. १० दर्शनी मूल्य असलेल्या भाग प्रमाणपत्रांची वैधता दिनांक २२ नोव्हेंबर २०१४ पासून समाप्त झाली आहे. याविषयीची अधिसूचना भारतीय राजपत्रात दिनांक ०५.११.२०१४ या दिवशी प्रसिद्ध करण्यात आली होती. या अनुषंगाने सर्व हेतूंकरिता, या सूचनेत दिले गेलेले भाग तपशील हे रु. १ दर्शनी मूल्य असणाऱ्या भाग प्रमाणपत्रांचे आहेत. याद्वारे सूचना देण्यात येत आहे की बँकेच्या खालील नमूद केलेल्या प्रतिभूतींचे भाग प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) यथायोग्य पूर्ण झालेल्या हस्तांतरण विलेखा (विलेखां) सह / शिवाय, उक्त भागाचे यथाविधि नोंदणीकृत धारक/ धारकांकडून हरवली/ गहाळ झाली आहेत आणि त्यांनी त्यांच्या नावे प्रतिलिपी भाग प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) निर्गमित करण्याकरिता बँकेकडे अर्ज केला आहे. उक्त भागासंबंधी कोणत्याही व्यक्तीचा दावा असल्यास त्यांनी तो दावा बँकेचे ट्रान्सफर एजंट मेसर्स केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड, सेलेनियम, टॉवर बी, प्लॉट क्रमांक ३१ आणि ३२, फाइनेंसियल डिस्ट्रिक्ट, नानकरामगुडा, हैदराबाद, तेलंगणा – ५०० ०३२ (इमेल आयडी: einward.ris@kfintech.com) यांच्याकडे या दिवसापासून ७ दिवसांच्या आत दाखल करावा, अन्यथा पुढील सूचनेशिवाय बँक प्रतिलिपी भाग प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) निर्गमित करण्याची कार्यवाही सुरु करेल.

**भारतीय स्टेट बँक**

| अनु क्र. | फोलियो क्र. | धारकाचे नाव | समभाग संख्या | प्रमाणपत्र क्रमांक | | विभिन्न क्रमांक | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पासून | पर्यंत | पासून | पर्यंत |
| १ | ०१५७११६६ | भुवनेश्वरी अरुण गौडार<br>अरुण सिद्दप्पा गौडार | १००० | १४१११९ | १४१११९ | ७४१७०३३९७१ | ७४१७०३४९७० |
| २ | ०१५७११६५ | अरुण सिद्दप्पा गौडार<br>भुवनेश्वरी अरुण गौडार | १००० | १४१११८ | १४१११८ | ७४१७०३२९७१ | ७४१७०३३९७० |
| ३ | ०१०८३३११ | मीना चल्ला<br>नीलम चल्ला<br>सुलोचना चल्ला | ६५० | ११४७४५ | ११४७४५ | ७४०३६५०२७१ | ७४०३६५०९२० |
| ४ | ००८७४८९८ | अवधनाम रामा गोपाल<br>अवधनाम अन्नपूर्णा देवी | ६९० | ९०५५७ | ९०५५८ | ७३९५३५७३२१ | ७३९५३५८०१० |
| ५ | ००८५९९२१ | मृदुला<br>निर्मल कुमार | ७०० | ८५६४८ | ८५६४८ | ७३९४२००६०१ | ७३९४२०१३०० |
| ६ | ००९०५३८० | सुनील कुमार गुप्ता | ८५० | १०१५२१ | १०१५२१ | ७३९७९९२१८१ | ७३९७९९३०३० |

**वरील आकडे रु. १/- दर्शनी मूल्याच्या वर्तमान समभागांच्या समभाग विभाजनानंतरचे (अभिलेख तारीख २१.११.२०१४) तपशील दर्शवतात.**

**स्थळ:** मुंबई
**दिनांक:** ०१.०८.२०२५
समभागांची संख्या: **४८९०**
स.प्रमाणपत्रांची संख्या: **७**
महाव्यवस्थापक (शेअर्स व बॉण्ड्स)

**PUBLIC NOTICE**

NOTICE is hereby given that my clients (1) MR. MUKESH TRIBHUVANDAS SANGHAVI, (2) MRS. RITA MUKESH SANGHAVI, are the present owner of Flat No. 8, admeasuring 480 sq. ft. Carpet area equivalent to 44.61 sq.mtrs. Carpet area or thereabouts located on 3rd Floor of the building known as RAMANIYA Co-operative Housing Society Ltd, situated at Vrindavan Building, Sarojini Naidu Road, Mulund (West), Mumbai- 400 080, (hereinafter referred to as "the said Flat") and holding 10 Shares bearing distinctive Nos. 36 to 40 (both inclusive) entered in the Share Certificate No. 8. (Said Shares"). The original copy of Agreement for sale made on April 1994, in respect of the said Flat made between MRS. ROSY GEORGE, and (1) MR. CHAMPAKLAL HARGOVINDAS SALOT, (2) SMT. RASILABEN CHAMPAKLAL SALOT is lost/ misplaced and even after the diligent search the same is not traceable. Any person/s in custody of the said original copy of Agreement for sale made on April 1994, or having claim/right against the said Flat are required to make the same known in writing with documentary evidence to the undersigned at his office at 26/A, Shree Heramb CHS ltd, M.P Road, Mulund (East), Mumbai 400 081, within Fourteen (14) days from the date hereof, failing which, it will be presumed that no person has any claim against the said Flat and the said Flat is free from encumbrances. Further no claims against the said Flat shall be entertained and my client shall be free to deal with the said Flat as per his own discretion.

**AMRUTA TILLU (DAMLE)**
**Advocate**

**Date :- 01-08-2025**
**Place :- Mumbai**

## राज ठाकरेंचा मच्छीमारांसाठी मुख्यमंत्र्यांना फोन



**मुंबई -** मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना फोन केला. काही दिवसांपूर्वी ससून डॉक आणि गिरगाव चौपाटी परिसरातील मच्छिमार कोळी बांधवांनी राज ठाकरे यांची शिवतीर्थ निवासस्थानी भेट घेतली होती. यावेळी त्यांच्या विविध समस्या मांडत न्याय मिळवण्यासाठी हस्तक्षेपाची विनंती केली. राज यांनी त्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून लवकरच तोडगा काढण्याचे आश्वासन दिले होते. याच संदर्भात त्यांनी हा फोन होता. यावर मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक भावना व्यक्त केल्या.

# साखळी बॉम्बस्फोटानंतर मालेगाव स्फोटातील सर्व आरोपी निर्दोष! एकही पुरावा नाही

पान १ वरून- जात आहे. न्यायालयाने आरोपींना निर्दोष ठरवले, पण ६ मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी २ लाख रुपये आणि जखमींना प्रत्येकी ५० हजार रूपये मदत देण्याचा सरकारला आदेश दिला.

हा निकाल देताना विशेष एनआयए न्यायालयाचे न्यायाधीश ए. के. लाहोटी यांनी आरोपी साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर, ले. कर्नल प्रसाद पुरोहित , मेजर रमेश उपाध्याय (निवृत्त), अजय राहिरकर, सुधाकर द्विवेदी, सुधाकर चतुर्वेदी आणि समीर कुलकर्णी यांची पुराव्याअभावी सुटका केली. यावेळी न्यायालयाने नमूद केले की सरकारी पक्ष कोणताही ठोस आणि विश्वासार्ह पुरावा सादर करण्यात अपयशी ठरले. केवळ नैतिक आधारावर शिक्षा करता येत नाही. त्यामुळे सर्व आरोपींना संशयाचा फायदा दिला जात आहे.

या निर्णयावर पिडीतांच्या वकील शाहीद नदीम यांनी नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले की,आरोपींची सुटका झाली असली तरी आम्ही उच्च न्यायालयात जाणार आहोत. पुरावे नाहीत म्हणून ते सुटले, तपास यंत्रणा सबळ पुरावे देऊ शकली नाही. मालेगावमध्ये बॉम्बस्फोट झाला होता हे सिद्ध झाले. कारण यापूर्वी आरोपी मालेगावमध्ये बॉम्बस्फोटच झाला नाही असे सांगत होते. पण न्यायालयाने बॉम्बस्फोट झाला हे स्पष्ट केले. एमआयएमचे प्रमुख ओवेसी म्हणाले की,या स्फोटात सहा नमाजी ठार झाले आणि १०० हून अधिक जखमी झाले. त्यांचा धर्म लक्षात घेऊनच ते लक्ष्य ठरले होते.मुंबई ट्रेन बॉम्बस्फोटातील आरोपींच्या निर्दोष सुटकेवर स्थगिती मागणारे मोदी आणि फडणवीस या निकालाविरोधात अपील करतील का?एनआयए किंवा एटीएसच्या अधिकाऱ्यांना त्यांच्या दोषपूर्ण तपासासाठी जबाबदार धरले जाईल का?२०१६ मध्ये सरकारी वकील रोहिणी सालियन यांनी सांगितले होते की एनआयएने आरोपींबद्दल सौम्य भूमिका घेण्यास सांगितले होते. २०१७ मध्ये साध्वी प्रज्ञा यांना निर्दोष करण्याचा प्रयत्न झाला आणि तीच व्यक्ती २०१९ मध्ये भाजपा खासदार झाली. दहशतवादाविरोधात कठोर सरकार असल्याचा दावा करणाऱ्या भाजपाने एका दहशतवादी आरोपीला खासदार केले, हे जग विसरणार नाही.

या निकालानंतर साध्वी प्रज्ञा सिंह ठाकूर भावूक झाल्या. त्या म्हणाल्या की,मला जेव्हा तपास यंत्रणांनी बोलावले, तेव्हा मी सहकार्याच्या भावनेने गेले होते. पण पोलिसांनी मला कोठडीत ठेवून अपमान केला, मारहाण केली.संपूर्ण आयुष्य संन्यासी म्हणून जगले, पण समाजाने मला वाईट नजरेने पाहिले . माझ्यावरून भगव्या रंगाला कलंकित केले. आज १७ वर्षांनंतर पहिल्यांदा मी आनंदी आहे. भगव्याचा आणि हिंदुत्वाचा विजय झाला. माझा समाजात अपमान झाला. ते भगवा आतंकवाद बोलले, पण आज भगव्याचा विजय झाला आणि हिंदुत्वाचा विजय झाला.

कर्नल प्रसाद पुरोहित म्हणाले की,१७ वर्षे शिक्षा भोगली. जामिनावर असूनही त्रास सहन करावा लागला. अधिकारांचा दुरुपयोग करून आमच्यावर अन्याय झाला. यंत्रणांना मला दोषी धरायचे नाही, सत्तेचा गैरवापर झाला. संस्था वाईट नसतात, पण त्यातील काही लोक कायद्याचा गैरवापर करतात. देशाची पायाभूत रचना मजबूत हवी. न्यायालयाने सामान्य जनतेचा व्यवस्थेवेरील विश्वास पुन्हा निर्माण केला. भाजपा नेत्या उमा भारती यांनी प्रज्ञा सिंह ठाकूर यांचे अभिनंदन केले. तर सरसंघचालक मोहन भागात यांनी या निकालातून मालेगाव स्फोटाशी संघाचा संबंध नसल्याचे स्पष्ट झाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आतंकवाद भगवा न कभी था, ना है, ना कभी रहेगा! अशी एक्सपोस्ट केली. तर प्रतिक्रिया देतांना त्यांनी काँग्रेसवर टीकास्त्र डागले. ते म्हणाले की, राष्ट्रवादी व काँग्रेस तत्कालिन सरकारने भगवा दहशतवाद आणि हिंदू दहशतवाद असे चुकीचे चित्र निर्माण करण्याचा कट रचला होता. मालेगाव खटला त्या दृष्टिकोनातूनच तयार केला आणि आज तो कट उघड झाला.फक्त विशिष्ट धर्माच्या मतपेटीसाठी काँग्रेसने हा प्रपंच केला आणि सर्व हिंदूंना दहशतवादी ठरवण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी काँग्रेसने देशाची माफी मागावी.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की,१७ वर्षांच्या दीर्घ लढाईनंतर न्यायालयाने सत्याला मान्यता दिली. उशीर झाला तरी सत्याचा पराभव होत नाही. हे पुन्हा सिद्ध झाले.कर्नल पुरोहित, साध्वी प्रज्ञा यांच्यावर खोटे आरोप लावून देशभक्तांना तुरुंगात डांबले. त्यांना मानसिक व शारीरिक छळ सहन करावा लागला. हा अन्याय हिंदू जनता कधीही विसरणार नाही. यावर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, पहिली गोष्ट म्हणजे बॉम्बस्फोट झाला, त्याचे ठिकाणही आहे. या स्फोटात लोकांचा मृत्यू झाला. जर बॉम्बस्फोट झाला तर त्यातील आरोपी गेले कुठे हा स्वाभाविक प्रश्न अनुत्तरीत आहे. जे दोषी असतील त्यांना पकडले पाहिजे, त्यांना शिक्षा होणे या दृष्टीने सरकार पुढे काय करणार हा प्रश्न आहे. शहीद हेमंत करकरे यांनी या प्रकरणाचे धागेदोरे शोधले होते, त्याचे पुढे काय झाले. त्यामुळे आता स्फोटातील आरोपींना शोधले पाहिजे. ही सरकारची जबाबदारी आहे.

२९ सप्टेंबर २००८ रोजी नाशिक जिल्ह्यातील मालेगाव शहरातील मुस्लिमबहुल भागात रमजान महिन्यात स्फोट झाला होता. या स्फोटात सहा जण ठार झाले आणि १०० हून अधिक जखमी झाले.या प्रकरणाची सुरुवातीची चौकशी महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) केली. त्यामध्ये आणि एकूण १२ आरोपींना अटक केली होती. एटीएसने या स्फोटामागे अभिनव भारत या हिंदुत्ववादी संघटनेचा हा कट असल्याचा आरोप केला होता. आरोपींवर युएपीए आणि मकोका अंतर्गत गुन्हे दाखल केले. २०१० मध्ये ही चौकशी राष्ट्रीय तपास संस्थेकडे (एनआयए) सोपवली. एनआयएने २०१६ मध्ये पुरवणी आरोपपत्र सादर करत काही आरोपींच्या विरोधातील पुरावे अपुरे असल्याचे नमूद केले आणि मकोका लागू न करण्याची शिफारस केली. डिसेंबर २०१७ मध्ये विशेष न्यायालयाने सात आरोपींवर स्फोटक पदार्थ कायद्यान्वये खटला चालवण्याचे आदेश दिले. इतर दोन आरोपींवर फक्त शस्त्र कायद्यांतर्गत वेगळ्या खटल्यात सुनावणी झाली. तर तिघांना पुराव्याअभावी निर्दोष सोडले. डिसेंबर २०१८ मध्ये खटल्याला सुरुवात झाली. सरकार पक्षाने ३२३ साक्षीदार तपासले, यातील ३४ जणांनी साक्ष बदलली तर ३० हून अधिक साक्षीदारांचा मृत्यू खटल्याच्या दरम्यान झाला. संशयित सुधाकर द्विवेदी यांनी स्फोटच झाला नसल्याचा दावा केला होता. त्यामुळे १०० हून अधिक पीडित आणि जखमी साक्षीदारांची सखोल चौकशी झाली. एप्रिल २०२४ मध्ये अंतिम युक्तिवाद पूर्ण झाल्यानंतर न्यायालयाने निर्णय राखून ठेवला होता तो आज दिला.

### करकरेंचे पुरावे भक्कम!

एस. एम. मुश्रीफांचा दावा शहीद पोलीस अधिकारी हेमंत करकरे यांच्या मार्गदर्शनात एटीएसने २००८ मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणात दाखल केलेल्या आरोपपत्रात नमूद केलेले पुरावे शास्त्रीय आणि भक्कम होते. असा दावा माजी पोलीस अधिकारी आणि हू किल्ड करकरे पुस्तकाचे लेखक शमशुद्दीन मुश्रीफ यांनी केला.ते म्हणाले की, करकरे यांच्या पुराव्यांवरून कथित आरोपींचा कट आमच्या दृष्टीने सिद्ध होतो. मात्र न्यायालयाने याकडे कोणत्या दृष्टीने पाहिले, याबद्दल कल्पना नाही.

### करकरे यांनी सादर केलेले पुरावे

पान १ वरून

दोघांना ताबडतोब आरडीएक्स देण्याच्या सूचना दिल्या.

४) उज्जैन येथे ऑगस्ट २००८ मध्ये चौथी बैठक झाली. त्यावेळी कर्नल पुरोहित यांनी राकेश धावडे यांना रामचंद्र आणि संदीप यांना पुण्यात आरडीएक्स देण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार दोघेही ८ ते ११ ऑगस्ट पुण्यात राहिले. त्याठिकाणी त्यांनी आरडीएक्स घेतले.

५) त्यानंतर २९ सप्टेंबर २००८ रोजी बॉम्बस्फोट झाला. या चारही बैठकींचे ऑडिओ आणि व्हिडिओ रेकॉर्डिंग दयानंद पांडे यांनी स्वत: केले आहे आणि हे त्यांच्याच लॅपटॉपवर आहे. ते पुरावा म्हणून सादर करण्यात आले. हा शास्त्रीय आणि भक्कम पुरावा आहे .

६) आरोपींच्या फोनचा तपशील काढला तेव्हा ते त्या काळात एकमेकांच्या सतत संपर्कात होते आणि धावडे यांनी बॉम्ब तयार करण्याचे त्यांना प्रशिक्षण दिले होते.

७) फरीदाबाद येथे जानेवारी २००८ मध्ये बैठक झाली होती. ही बैठक मालेगाव बॉम्बस्फोट संबंधित नव्हती. पण अभिनव भारतच्या धोरणांबाबत होती. त्या बैठकीत कर्नल पुरोहित म्हणतात की,जे सरकार स्थापन झालेले आहे ते आपण उलथून टाकले पाहिजे. वेदावर आधारित हिंदूराष्ट्राची स्थापना केली पाहिजे.परंतु याचा अंमल करणे थेट शक्य नसल्याने आम्ही इस्त्राईल, नेपाळ आणि नागा बंडखोर यांची मदत घेत आहोत.त्याच बैठकीत मेजर उपाध्याय यांनी सांगितले होते की, देशात होणारे बॉम्बस्फोट आणि मुस्लीम अटकेच्या घटना कोणी मुस्लीम नाही तर आमचेच लोक करत आहेत. कोणता स्फोट कोण करते हे कर्नलला माहित आहे. याचे त्यांनीच काढलेले ऑडीओ आणि व्हिडिओ न्यायालयाकडे आहेत.

८) या स्फोटात ज्या बाईकवर स्फोट झाला त्या मोटरसायकलच्या तपासात तिचा चेसी नंबर आणि इंजिन नंबर बदलल्याचे आढळले . करकरे यांनी कंपनीकडून खरा चेसी नंबर मिळवला. त्यातून ती मोटरसायकल प्रज्ञा सिंह ठाकूर यांची असल्याचे स्पष्ट झाले.

९) आरडीएक्स पुरोहित यांनी पुरवल्याचा प्रत्यक्ष पुरावा नाही असे कोर्ट म्हणाले . यावर मुश्रीफ म्हणतात की आरडीएक्स प्रत्यक्ष देतानाचा पुरावा असूच शकत नाही . बैठकांच्या चित्रीकरणातून त्यांचा संवाद आहे त्यातून ते स्पष्ट होते.

### न्यायालयाने नोंदवलेली निरीक्षणे

पान १ वरून

१२) जखमींची संख्या ९५ होती. त्यामुळे बनावट जखमी प्रमाणपत्र आणि फेरफार झाल्याचा संशय आहे.

१३) फक्त संशयाच्या आधारावर आरोपींना शिक्षा देऊ शकत नाही.

## पोर्श प्रकरणी आरोपीच्या पित्याचा जामीन फेटाळला

■ पुणे

**पुण्याच्या** कल्याणीनगरमध्ये पोर्श कार अपघात प्रकरणातील अल्पवयीन आरोपीच्या पित्याचा जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळला. आपल्या आईच्या पाठीच्या मणक्याला दुखापत झाली असून शस्त्रक्रिया करण्याची गरज आहे, असे कारण आरोपीचा पिता विशाल अगरवाल याने जामिनाचा अर्ज करताना दिले होते. मात्र सरकार पक्षाच्या वकिलांनी त्याला विरोध केला होता.

कल्याणीनगरमध्ये १९ मे २०२४ रोजी पहाटे ३.२० वाजताच्या दरम्यान वेदांत अगरवाल (१७) या अल्पवयीन मुलाने पोर्श कार वेगाने चालवत एका मोटरसायकलला जोरदार धडक दिली होती. या धडकेत मोटारसायकलवरील एक महिला व एका पुरुषाचा मृत्यू झाला.

अपघात झाला तेव्हा वेदांत अगरवाल हा अल्पवयीन असल्याने त्याचा खटला बाल न्याय मंडळाकडे वर्ग करण्यात आला. त्याच्यावर मद्यपान करून वाहन चालवल्याचा संशय होता. त्यामुळे त्याच्या रक्ताचे नमुने ससून हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले असता अल्पवयीन आरोपीच्या आईने डॉक्टरांशी संगनमत करून रक्ताचे नमुने बदलले. तसेच पिता विशाल अगरवाल याने या गुन्ह्यातून वाचवण्यासाठी आरोपीला मदत केली.

या गुन्ह्यात अरोपीचा पिता विशाल अगरवाल अटकेत आहे. त्याने आपल्या आईच्या आजारपणाचे कारण देऊन तात्पुरत्या जामिनाची मागणी केली होती.

## निवासी डॉक्टरांचा मागण्यांसाठी राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा

■ मुंबई

**वैद्यकीय** शिक्षण आणि संशोधन महासंचलनालयाकडून (डीएमईआर) वरिष्ठ निवासी डॉक्टरांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष होत असल्याच्या निषेधार्थ राज्यव्यापी आंदोलन करण्याचा इशारा महाराष्ट्र निवासी डॉक्टर असोसिएशनने (एमएसआरडीए) दिला आहे.

विद्यावेतन मिळण्यास विलंब, वेतनामधील तफावत आणि रजेबाबतचे स्पष्ट धोरण नसल्याबद्दल एमएसआरडीएने पत्राद्वारे तीव्र नापसंती व्यक्त केली आहे. ग्रँट मेडिकल कॉलेज तसेच अंबरनाथ आणि चंद्रपूर मेडिकल कॉलेजमधील निवासी डॉक्टरांना मे महिन्यापासूनचे विद्यावेतन अद्याप मिळालेले नाही. अशाच प्रकारे अन्य वैद्यकीय महाविद्यालयांमध्येही दोन-तीन महिने विद्यावेतन थकवणे ही सामान्य बाब झाली आहे,असे पत्रात म्हटले आहे.

## टोरेस प्रकरणी 'जागल्या'विरुध्द खटला चालणार नाही

■ मुंबई

**टोरेस** घोटाळ्याचे बिंग फोडणारे चार्टर्ड अकाउंटंट अभिषेक गुप्ता यांना विशेष पीएमएलए न्यायालयाने मोठाच दिलासा दिला आहे. या प्रकरणी न्यायालयाने गुप्ता यांचे नाव आरोपींच्या यादीतून वगळले.विशेष न्यायाधीश आर. बी. रोटे यांनी हा निकाल दिला. या गुन्ह्यात कोणत्याही टप्प्यावर, कोणत्याही प्रकारे गुप्ता यांचा सहभाग होता असा कोणताही पुरावा पोलिसांनी सादर केलेला नाही. त्यामुळे गुप्ता यांची या प्रकरणात मर्यादित भूमिका पाहता त्यांच्याविरूध्द पीएमएलए कायद्यान्वये खटला चालविला जाऊ शकत नाही, असे न्या. रोटे यांनी सांगितले.





**AMALNER :** Vikas lottery & Gen. store : 8999612300 | **AHILYANAGAR :** Lucky lottery - 9423792145, Tulsi Lottery Agency - 9921198992 | **ANDHERI :** Megastar Distributor - 9967250008 **AMARAVATI :** New Hindustan Lottery - 7507867972 | **BORIWALI :** Diamond Corporation - 8657436773 | **BHAYANDER :** Balaji Sankari Agency - 9833213081 | **CHANDRAPUR :** Mahalaxmi Agency - 94221 36124/7558215696 | **DADAR :** Shree Ganesh Enterprises - 9870017798, Shree Siddhi Samarth Agency - 93261 96320, Ambika Lottery - 70457 19586, Shree Enterprise - 8422996345 | **DHULE :** Agarwal Lottery Agency - 9422706933 / 8766776900 | **GOREGAON :** Vishesh Distributers - 7900123332, Lambodar Enterprises - 9819224257, Multistar Distributor - 9930425378 | **GONDIA :** R.K. Lottery Mandi - 9325116868 | **GIRGAON :** Trimurti Lottery Agency - 9773373267, B.V. Kothavale - 9820629401| **ICHALKARANJI :** Maharaja Associates- 9028485789, Maharaja LotteryCentre-9764662643/ 9158729426 | **JALGAON :** Vyas Agency - 9890056854, Baheti Lottery - 9420389239 | **KOLHAPUR :** Mahavir Lottery Agency - 9822248473, 7066275145 | **KALYAN :** Prince Lottery - 9819574813 | **KALBADEVI :** Mewad Agency - 9833253514 | **KHAMGAON :** Matoshree Enterprises - 9922813194 | **MUMBAI :** Prince Agency - 9833748152 | **NERUL :** Shree Ganesh Krupa Agency - 9920116957 | **NAGPUR :** Lottery Bhandar - 9764688000, Balaji Marketing - 9371034883, Siraj Enterprises - 9822472123 | **NANDED :** Jagdamba Lottery Centre - 8956486986 , Prasad Enterprises - 9421908570, Shree Sai Krupa Lottery Agency - 9822767566, | **NASHIK :** Chirag Enterprises - 9168199999 | **SAMBHAJI NAGAR :** Rukmini Enterprises - 9822899520/8007059111, Komal Agency - 9370224810 | **SOLAPUR :** Barad Lottery Agency - 9420545869/9850501313 | **PANVEL :** Phatak Enterprises - 9167552882 | **PUNE :** Shri Gurudev Datta Lot. Agency - 9518591612, Parihar Enterprises - 9422517486, Kamal Agency - 830492061, Amit Lottery Agency - 9422087688 | **SANGLI :** Kishor M Shah - 8055204763 / 552529044 | **SATARA :** Samrat Agency - 8805277966 | **YAWATMAL :** New Jai ambe Lottery Bhandar - 9421844726

अधिक जानकारी के लिए कॉल करें (टोल फ्री) - 1800 266 0088

Mumbai - 7845816714 / 8754562382 / 7845827316 / 7845827314 / 8928588642 /7397776862 /9372275063
Sales Executive - Pune - 7845523543, Solapur - 8805060191, Kolhapur - 8010103915 / 9922431881, Amravati - 7498162774, Nagpur - 9922090691 / 7845819432/ 7845827259


## ट्रम्पसमोर नरेंद्र मोदींची शरणागती खासदार संजय राऊत यांचा घणाघात

■ मुंबई



**अमेरिकेचे** राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर पंचवीस टक्के आयात शुल्क लागू करण्याची घोषणा करताच शिवसेना ठाकरे गटाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी केंद्रातील मोदी सरकारवर कडाडून हल्ला चढवला. अब की बार ट्रम्प सरकार, नमस्ते ट्रम्प असे कार्यक्रम सरकारी पैशाने आयोजित करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी आता गायब झाले आहेत. त्यांची वाचा बसली आहे. त्यांच्या सरकारने ट्रम्प यांच्यासमोर सपशेल शेपूट घातले आहे, अशा शब्दात राऊत यांनी मोदी सरकारवर घणाघाती टीका केली.

ट्रम्प आपले चांगले मित्र आहेत असे पंतप्रधान मोदी येता-जाता सांगत होते. जणू काही ट्रम्प आणि मोदी साबरमतीतील बालपणीचे सवंगडी असल्याचे चित्र मोदी रंगवत होते. त्याच मोदींच्या मित्राने भारतावर आशिया खंडातील अन्य देशांच्या तुलनेने सर्वात जास्त आयात शुल्क लावले. त्याचबरोबर रशियासोबत व्यापार करतो म्हणून भारताला दंडित करण्याची धमकीही दिली. ट्रम्प यांच्या या दादागिरीवर मोदी, परराष्ट्र मंत्री एस जयशंकर, गृहमंत्री अमित शहा अवाक्षर बोलायला तयार नाहीत.

## निठारी हत्याकांडात आरोपी निर्दोष निकालाच्या विरोधातील याचिका फेटाळली

■ नवी दिल्ली

२००५-०६ साली नॉयडातील निठारी हत्याकांडातील आरोपींच्या निर्दोष मुक्ततेला आव्हान देणारी सीबीआयची याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली. या हत्याकांडातील आरोपी मोनिंदर सिंग पंढेर आणि त्याचा नोकर सुरेंदर कोली यांना कनिष्ठ न्यायालयाने दोषी ठरवून फाशीची शिक्षा सुनावली होती. मात्र अलाहाबाद उच्च न्यायालयाने त्यांची निर्दोष मुक्तता केली. अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या या निकालाला सीबीआयने आव्हान दिले होते.

मात्र सरन्यायाधीश भूषण गवई , न्या. सतीश चंद्र शर्मा आणि न्या. के विनोद चंद्रन यांच्या त्रिसदस्यीय खंडपीठाने सीबीआय आणि या हत्याकांडात बळी गेलेल्यांच्या नातेवाईकांनी केलेल्या १४ याचिका फेटाळून लावल्या.

अलाहाबाद उच्च न्यायालयाने ऑक्टोबर २०२३ मध्ये दिलेल्या या निकालात सुरेंदर कोली याला १२ गुन्ह्यांमध्ये तर मोनिंदर सिंग पंढेर याला दोन गुन्ह्यांमध्ये निर्दोष ठरवले होते. सरकारी पक्ष आरोपींवरील गुन्हे सिध्द करण्यासाठी ठोस पुरावे सादर करण्यात अपयशी ठरल्याने आरोपींचा गुन्हा निर्विवादपणे सिध्द होत नाही,असे महत्वपूर्ण निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने हा निकाल देताना नोंदविले.

## बार्बी डिझायनर जोडीचा इटलीत अपघातात मृत्यू

■ मिलान

**सुप्रसिद्ध** बार्बी डिझायनर जोडी मारियो पगलीनो आणि जियानी ग्रोसी यांचा एका भीषण अपघातात मृत्यू झाला. इटलीतील ट्युरिन-मिलान महामार्गावर ८२ वर्षीय वृद्ध चालकाच्या कारने त्यांच्या गाडीला धडक दिल्याने ही दुर्दैवी घटना घडली.

या अपघातात त्यांच्या सोबत असलेले बँक कर्मचारी ॲमोडियो व्हॅलेरिओ जिउर्नी यांचाही जागीच मृत्यू झाला, तर त्यांच्या पत्नी सिल्व्हिया मोरामॅक्रो या गंभीर जखमी असून, त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तसेच दुसऱ्या कारमधील चालक एगीडिओ सेरियानो (८२ ) याचाही या अपघातात मृत्यू झाला. बार्बीच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाउंटवरून या घटनेबाबत तीव्र दुःख व्यक्त करण्यात आले.

## मुंबईत शुटिंगसाठी सवलत द्या भोजपुरी निर्मात्याची मागणी

### मनसेचा विरोध

■ मुंबई

**राज्यात** मराठी आणि हिंदी भाषेवरून वाद सुरू असताना एका भोजपुरी चित्रपट निर्मात्याने चक्क मुंबईतील गोरेगावच्या चित्र नगरीत (फिल्मसिटी) भोजपुरी चित्रपटाचे चित्रिकरण करण्यासाठी मराठी चित्रपटांप्रमाणे भाड्यामध्ये सवलत देण्याची मागणी केली. या मागणीला मनसेच्या वतीने जोरदार विरोध करण्यात आला. भोजपुरी चित्रपट निर्मात्यांनी आपल्या राज्यात जाऊन ही मागणी करावी, असे मनसेच्या नेत्याने सांगितले.

चित्रनगरीतील चित्रपट आणि लघुपटांच्या चित्रिकरणाचे व्यवस्थापन मुंबई महानगर पालिका पाहाते. चित्रिकरणासाठी पालिका जागेचे आणि अन्य सोयी सुविधांचे भाडे आकारते. महाराष्ट्रात मराठी भाषेला प्राधान्य देण्याच्या उद्देशाने मराठी चित्रपटांना भाड्यामध्ये सवलत दिली जाते. यासंदर्भात पालिकेच्या वतीने चित्रपट उद्योगाशी संबंधित लोकांची एक बैठक बोलावली होती. या बैठकीत मराठी चित्रपटांप्रमाणे भोजपुरी चित्रपटांच्या चित्रिकरणालादेखील पालिकेने सवलत द्यावी,अशी मागणी भोजपुरी चित्रपट निर्माता कमर हाजी पुरी यांनी केली. त्यांच्या या मागणीवर मनसेचे नेते संदिप देशपांडे यांनी कडाडून विरोध केला. पुरी यांनी अशी मागणी उत्तर प्रदेशमध्ये जाऊन करावी, असे देशपांडे म्हणाले.

## मध्य रेल्वेची वाहतूक पुन्हा विस्कळीत

■ मुंबई

**मध्य** रेल्वेची लोकल सेवा आज पुन्हा एकदा विस्कळीत झाली. लोकल सकाळच्या गर्दीच्या वेळेत २० ते २५ मिनिटे उशिराने धावत होत्या. त्यामुळे प्रवाशांना स्थानकांवर ताटकळत उभे राहावे लागले. अंबरनाथहून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसकडे जाणारी लोकल तब्बल २० मिनिटे उशिराने धावली. त्यानंतर जलद मार्गावरील सर्वच लोकल सुमारे २५ मिनिटे उशिराने धावत होत्या. तर धीम्या मार्गावरही अनेक लोकल गाड्या उशिराने धावत होत्या. त्यामुळे कामावर जाणाऱ्या प्रवाशांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागला. काल बदलापूर आणि वांगणी स्थानकांदरम्यान रेल्वे रुळाला तडे गेल्याने मध्य रेल्वेची वाहतूक विस्कळीत झाली होती.